Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख ५ माहे जून सन १९१६ ई० [ अंक २२

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नं १

---

### अस्सल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळया**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रण करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

---

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

---

### नोटीस

नादार मुकदमा नंबर १७४ सन १९१२

विद्यमान सबजज साहेब बहादूर कोर्ट खामगांव

अर्जदार

रामरतन जमनादास मारवाडी रा. खामगांव

विरुद्ध पक्षकार

जव्हारमल हरकचंद मारवाडी रा. धामणगांव स्टेशन जि. उमरावती यांस:—

तुमचा मुकदमा आमचे कोर्टांत आकोल्याहून ट्रॅन्सफर होऊन आला आहे. त्याची चौकशीची तारीख २९ माहे ७ सन १९१६ ची नेमली आहे. तरी तुह्मी आपले सर्व जबाबासह वरील तारखेस सकाळीं १० वाजतां हजर राहावें. कळावें. तारीख १३ माहे ५ सन १९१६

१ टीपः— आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्या निशी दिले.

सही
R. N. Trivedi
सबजज
खामगांव

नो. नं. १९१

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, पात भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरिता करावयाच्या अर्जाचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तार्टें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शेभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट दिसण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर

नो नं ६

---

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह**
**पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रह्लादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण-मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मोरिझम प्रयोग, विधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रही ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया. ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

## नोटीस

केशव वा सूर्यभान पा. रा. बेलखेड

यांसः—

श्री हनुमान संस्थान बेलखेड याचे वहिवाटदार बाबुजी यादवजी पा. व पूर्णाजी वा बाबुजी पा. रा. बेलखेड ता. मुर्तिजापूर यांचे कडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे जवळ पंचासमक्ष वरील संस्थानचा माल जनावरें विक्री केली त्याजबद्दल रकम एकंदर रुपये ११४ एकशे चवदा ही रकम तुह्मी गांवां-तील शाहाजोग व विश्वासूक ऐपतदार व रकम लागेल तेव्हां द्याल असें असल्यावरून वरील रकम धरवर ठेविली ही रकम संस्थानाकरितां जरूर पाहिजे आहे. व ती मागितली असतां चाळवाचाळवी करितां हे तुमचे सारख्या योग्य मनुष्यास योग्य नाहीं. व देवाचा पैसा आहे, त्यांजबद्दल आपण अखेरीस आह्मास नोटिस दण भाग आणिले तरी ही नोटिस पावल्यापासून नोटिशीचे खर्चासह वरील रकम ८ आठ दिवसाचे आंत व्याजासह आणून द्यावी. असें न केल्यास तुमचेवर रीतीप्रमाणें दावा करून सर्व प्रकारें खर्चासह रकम वसूल केली जाईल. ता. २४-५-१६ इ. दस्तुर वासुदेव वामन शेंदुर्णीकर पि. रा. आकोला

सही

१ बाबुजी वा यादोजी पा.
रा. मौजे बेलखेड द. खुद
१ पूर्णाजी वा बाबुजी द. खुद
नो. नं. १९२

## नोटीस

रा. रा. लक्ष्मण गोविंद देवरनकर रा. उमरावती

यांसः—

खालीं सही करणार दवलतराव बनाजी तिडके रा. सांगवी ता. मुर्तिजापूर जि. आकोला नोटिस देतो ऐसाजे कीं, तुमचे मजकडे गहाणाचे कर्ज असल्या कारणानें तुह्मी मजपासून गहाणाचे व्याज आगाऊ कापून घेऊन तुह्मी मजला व्याजाची रकम पांच महिन्याचे व्याज वजा देऊन बाकीची रकम तुमचे घरीं घेऊन आलो होतो. ते रुपये तुह्मी घेतले नाहीं. सबब तुह्मी फि-र्याद केल्यास कोर्ट खर्चाची जबाबदारी मजवर नाहीं. व तुमचे रकमेस मी पुढें व्याज देणार नाहीं. कळावें. ता ३०-५-१६ दस्तुर भगवंतराव मटाजी तायडे

सही

१ दौलत बनाची तिडके द. खु०
नो० नं० १९३

## नोटीस

मोतीराम वा सखाराम कोळी राहणार लोहार ता. बाळापूर जि. आकोला

नोटिस देणार कवती मर्द मोतीराम कोळी राहणार हातरुण ता. बाळापूर इज-कडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमच्याशीं माझे लग्न होऊन १०।१२ वर्षे झालीं व त्यानंतर शहाणी झाल्यास ही २ वर्षे झालीं. शहाणी झाल्यानंतर माझे आईबापानीं तुमच्या गांवीं ह्मणजे लोहार येथें मला आणून पोचविले. व तेथील पाटील पांडे यांचे समक्ष व इतर पंचासमक्ष तुमचे स्वाधीन करून दिले. परंतु तुह्मी मला न वागवितां व मारून हाणून घराचे बाहेर काढून दिलें. व नंतर मी घरीं आले, त्यानंतर तुह्मी मला नेले नाहीं यावरून असें दिसतें कीं, तुमचा मला वागविण्याचा विचार नाहीं. तरी ही नोटिस देण्यांत येते कीं, नोटिस पावल्या-पासून ८ दिवसाचे आंत मला तुह्मी घेऊन जावे. तसें न केल्यास ही नोटिस फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन व नवरे-पणाचा तुमचा मजवर हक्क राहणार नाहीं. या नोटिशीचा खर्च व तुमच्या हयगयीमुळें इतर होणारा खर्च तुमचेवर पडेल. कळावें. ता. ३१-५-१६

सही

कवती मर्द मोतीराम कोळी निशाणी
बांगडी राहणार लोहार दस्तुर बालु
वा शामजी कोळी राहणार
बुसर दस्तुर खुद
नो० नं० १९४

## नोटीस

उकर्डासींग वा हिरासींग जात खगर धंदा शेती व नौकरी आणि धुळसींग वा देवलालसींग जात खगर धंदा शेती व नौकरी उभयता राहणार आकोला

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीशीचा जबाब देण्यांत येतो कीं तुमची तारीख २२-५-१६ च्या वऱ्हाडसमाचार पत्रांतली नोटीस आह्मास पावली. तुह्मी आमचे पासून मौजे सांगळूद ता आकोला येथील शेत सेंर्वे नंबर ९६ एकर ३४४८ गुंठे आकार रुपये ८८८१३४९ पांच वर्षा साठीं दरसाल २०० रु. स्वामित्वानें वहीतीस घेतले होते ही गोष्ट आम्हास कबूल आहे. परंतु ज्या वेळेस तुह्मी पट्टा करून नोंदून दिला त्या वेळेस सदहू शेतासंबंधी सर्व प्रकारची हकीकत तुह्मास पूर्णपणें माहीत होती व आह्मी ही तुह्मास सांगीतली होती अशी स्थिती असतांना आह्मी तुह्मास फसविले व तुमचे नुकसान झाले हें तुमचें विधान बेकायदेशीरपणाचे व बे-जबाबदारपणाचें दिसतें. त्याचप्रमाणें दरसाल आमचे रुपयाची पूर्ण फेड होई तोंपर्यंत पिकावर आमची मालकी व ताबा राहील व स्वामित्वाच्या रुपयाची जर फेड झाली नाहीं तर पुढील सालच्या पिकावर आमचा हक्क नाहीं शेताची किस्तगारी आह्मी करूं अशा तऱ्हेच्या पट्याच्या मुख्य शर्ती असतांना तुह्मी गेल्या सालीं शेत वाहिले परंतु स्वामित्वाच्या २०० रुपया पैकीं फक्त ५० रुपये आह्मास दिले. व बाकीचे रुपये आह्मी तुमच्या जवळ वेळोवेळीं मागीतले असतां तुह्मी चाळवा चाळव केली व आज तागाईत आह्मास रुपये दिले नाहींत व त्या सालचे सर्व पिक ही तुह्मी आह्मास न कळत त्यावर आमचा ताबा असतांना तुह्मी लांबविले. शेताची किस्तगारी तुह्मी चांगली केली नाहीं. व येणे प्रमाणें तुह्मी पट्याच्या मुख्य शर्ती जाणून बुजून मोडल्या आहे. सबब तुमचा सदहू शेत वहीत करण्याचा कोणतेही प्रकारचा हक्क राहिला नाहीं. त्याच प्रमाणें आमचे गेल्या सालचे स्वामित्वाबद्दलचे राहिलेले रुपये १५० आह्मास ८ दिवसांचे आंत आणून द्यावे न दिल्यास आह्मास कायदेशीर इलाज करणें भाग पडेल कळावे तारीख २४-५-१६

सही

गणेश बळवंत दिगंबर. द. खुद
नो. नं. १९५

## राजीनामा.

खालीं सही करणार याज कडून कळविण्यांत येते कीं:— अज्ञान गणपतलाल लक्ष्मीनारायण यांचे कडून मी ट्रस्टी असोन मी तुमच्या सर्वानुमतानें तुह्मापैकीं व जानकीराम यांस मुखत्यारपत्र नेमून दिले व सर्व तुह्मापैकीं आपसांत लढाई करून काम बरोबर चालविले नाहीं सबब सर्व मुखत्यारास नोटीसही दिल्या होत्या कीं कागजपत्र सर्व आकोल्यास मुकुंदलाल जवळ आणून द्या. तरी आपण नोटीस न घेतां कागजपत्र हीं अद्याप आणिले नाहींत. जर मुखत्यारावर फिर्याद करावी तर मी चोपडे मुक्कामीं ५ पांच वर्षां पासोन राहत असोन माझे जिवास आठ दिवसापासोन चांगले लागत नाहीं. माझे हातपाय दुखतात, तोंड सुजलें आहे व अन्न धकत नाहीं व परसाकडे लागली आहे व पायही आकडले आहे. तर येथून ६० कोस पर्यंत माझी येण्याची शक्ती नाहीं. माझा जिव घाबरतो सबब तुह्मास जातवाल्यास ट्रस्टी यांस कळविण्यांत येते कीं माझा हाच राजिनामा समजोन तुह्मी कोणी दुसरे नेमून काम चालवावे. कामकाज न चालवाल तर याबद्दल मी जबाबदार नाहीं व माझे कडून जे मुखत्यार आहेत ते रद्द आहेत. कारण ते माझ्या सांगणेप्रमाणें चालत नाहींत व सर्व इस्टेट पूर्वीं पासोन रामुलाल व सर्व मुखत्याराचे स्वाधीनच आहे. पूर्वीं पासोन माझे स्वाधीन कांहींच नाहीं. या करितां तुह्मास कळविलें त्यांचीं नांवें खालील प्रमाणें.

१ मुलाची आई बनुबाई जवजे लक्ष्मीनारायण रा. पातुर्डेकर

२ मुलाच्या आईचा बाप विठ्ठलदास बाळमुकुंद रा. उमरावतीकर

३ मुलाचा मावसा बनसीलाल हिरालाल अगरवाले रा. शीरपूर जि. पूर्व खानदेश

४ मुलांचे आतेभाऊ रामुलाल व बनसीलाल व देवलाल हे ट्रस्टी आहेत व हरलाल हे ट्रस्टी आहेत. तरी या सर्वांस कळविण्यांत येते कीं सर्वानुमतें कोणी नवीन ट्रस्टीक नेमून अगर सरकारांत इस्टेट देऊन कांहीं तरी सोय करावी. मी या बाबत कोणतेही प्रकारें जबाबदार नाहीं हाच माझा राजिनामा आहे कळावें सही ता. २५ माहे एप्रिल सन १९१६

सही

गोपुलाल मुखलालजी द. खुद
नो. नं. १९६

## जाहीर नोटीस

गांवचे व परगांवचे लोकांस कळविण्यांत येते कीं, ता. १२ एप्रिल सन १९१५ इ. रोजीं खालीं सही करणार यांस दगडु वा॥ श्रावण भोर व शामु वा॥ दगडु भोर रा. सुकोड ता. आकोला यांनीं मौजे कानडो ता. आकोला येथील स्थावरचे गहाणखत रुपये ६०० सहाश्याचे करून देऊन नोंदून दिलें. सदर्हु दस्तैवज गहाळ झाला आहे. कोणास मिळाल्यास तो आणून दिल्यास दोन रुपये इनाम देऊं. करितां नोटिशीनें जाहिर केलें आहे कळावें. ता० २३ मे सन १९१६ इ.

सही

हरसुखदास रांदड मालक चतुर्भुज
हरसुखदास द. खुद
नो० नं० १९७

## नोटीस

नादार मुकद्दमा नंबर १७४ सन १९१२

विद्यमान सबजज्ज साहेब बहादूर कोर्ट खामगांव

अर्जदार

रामरतन जमनादास मारवाडी रा. खामगांव

विरुद्ध पक्षकार

जियालाल खुबीराम मारवाडी रा. मुंबई काळबादेवी रोड यांसः—

तुमचा मुकद्दमा आमचे कोर्टांत आको-ल्याहून ट्रॅन्सफर होऊन आला आहे. त्याची चौकशीची तारीख २९ माहे ७ सन १९१६ ची नेमली आहे. तरी तह्मी आपलें सर्व जबाबासह वरील तारखेस सकाळीं १० वाजतां हजर राहावे. कळावें. तारीख १३ माहे ५ सन १९१६

१ टीपः— आमच्या सहीनिशी व को-र्टाच्या शिक्या निशी दिले.

सही
R. N. Trivedi
सबजज्ज
खामगांव

नो. नं. १९८

## फोटोग्राफीचा क्लास.

एक महिन्याचा अभ्यासक्रम (कोर्स) सदर कोर्सची फी रुपये २५. हा क्लास आगष्ट ता. १ रोजीं सुरू होईल. ह्यांत फोटोग्राफीची सांगोपांग माहिती देण्याची व्यवस्था केली आहे. शिकणारांनीं तारीख १५ जुलैचे आंत प्रवेश फी रु. १ भरून नांवें नोंदवावीं. कोर्सची फी क्लासचे सुरवा-तीस सबंध द्यावी लागेल. विशेष माहिती पत्रद्वारें अगर भेटीअंतीं मिळेल.

सही
G. W. Shidore
फोटोग्राफिक् स्टुडियो
आकोला

नो० नं० १८९

वऱ्हाडसमाचार

मिति जेष्ठ शुद्ध ४ शके १८३८

## हिंदुस्थानांतलें शास्त्रीय शिक्षण.

सध्याच्या सर्व राष्ट्रीय व्यापारी स्पर्धेच्या काळांत शास्त्रीय ज्ञानांत प्रगति केल्यावांचून आपला निभाव लागावयाचा नाहीं ही गोष्ट विलायतेच्या लोकांना पूर्णपणें कळून चुकली आहे. इंग्रजी मुत्सद्दी, इंग्रजी व्यापारी, इंग्रजी शास्त्रज्ञ वगैरेंच्या भाषणांचा सगळा रोख पाहिला तर हा दिसतो कीं आतांपर्यंत आपल्या हातून चूक झाली ती झाली, पण युद्ध संपल्यानंतर तरी इंग्लंडांत शास्त्रज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करण्याचें शिक्षण मुलांना देणें हें आपलें आद्य कर्तव्य समजून त्या धोरणानें शाळांतील शिक्षणक्रम ठरवूं आणि शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराला शक्य तेवढें उत्तेजन देऊन त्या ज्ञानाच्या जोरावर ब्रिटिश साम्राज्याला लागणारा सर्व माल इंग्लंडांत तयार करून इंग्लंडचा व्यापार वाढविण्याची शक्य तेवढी खटपट करूं. इंग्लंड आतांच शास्त्रीय ज्ञानांत हिंदुस्थानाच्या पुढें तीन शतकें आहे असें ह्मटलें असतां आतिशयोक्ति होणार नाहीं. ज्या गोष्टी विलायतेंतत प्राथमिक शिक्षणाच्या क्रमांत लहान मुलें सहज शिकतात; त्या आमच्या इकडे कालेजांत ही शिकविल्या जात नाहींत. शास्त्रीय ज्ञान देणारें स्वतंत्र वाङ्मय आमच्या देशांत मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल आणि तें नसण्याला कारण लोकांत तशा ज्ञानाबद्दल अभिरुचि उत्पन्न झालेली नाहीं हें उघड आहे. अशा स्थितींत शास्त्रीय शिक्षणाचा प्रसार होऊन आमची औद्योगिक उन्नति होणें शक्य आहे काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आमच्या लोकांत बुद्धीचा अभाव किंवा शास्त्रीय ज्ञानाच्या ग्रहणाला लागणाऱ्या पात्रतेचा अभाव असता तर गोष्ट निराळी होती. पण तसा प्रकार खरोखर नाहीं हें अनेक संकटांना तोंड देऊन शास्त्रीय शिक्षणांत डोकें वर काढण्यांत पूर्णपणें यशस्वी झालेल्या डॉ० जे. सी. बोस, डॉ० पी. सी. रॉय, व त्यांचा शिष्यवर्ग यांच्या चरित्रावरून व त्यांनीं थोडक्या अवधींत करून दाखविलेल्या अपूर्व कामगिरीवरून सिद्ध झालें आहे. डॉ० जगदीशचंद्र बोस यांनीं बनारस हिंदु युनिव्हर्सिटीच्या स्थापनेच्या वेळीं आपल्या भाषणांत सांगितल्या प्रमाणें शास्त्रीय ज्ञान संपादण्याला दोन गोष्टींची मुख्य अवश्यकता असते. पैकीं पहिली गोष्ट ही कीं आपणाला शास्त्रीय ज्ञान संपादून कोणत्या मुकामाला जावयाचें, आपलें शास्त्रज्ञान विषयक ध्येय कोणतें तें कल्पनेनें दृष्टिगोचर करण्याचें बुद्धिसामर्थ्य पाहिजे. आणि दुसरी गोष्ट ह्मणजे तो मुक्काम गाठण्याला हळूं हळूं पायरी पायरीनें, नेटानें, उमेद न खचूं देतां पुढें पाऊल टाकण्याइतकी आक्रमणशक्ति अंगांत पाहिजे. पैकीं पहिली गोष्ट ह्मणजे बुद्धिसामर्थ्य आह्मा लोकांच्याठायीं पुरेसें आहे हें निर्विवाद आहे. जी वाण आहे ती दुसऱ्या गोष्टीची आहे. आमच्यांत शास्त्रीय ज्ञानाची महती जाणणारे व ती ओळखून आपलें सारें बुद्धिवैभव, सारा वेळ, सारें लक्ष, सारें आयुष्य त्या ज्ञानसंपादनांतच वेचण्यास तयार होणारे हरीचे लाल लाखांत एखादा दुसरा देखील सांपडणें मुष्कील आहे. असे खरे खरे शास्त्रज्ञानलोलुप विद्यार्थी दुर्मिळ खरे, तथापि अगदीं नाहींत असें नाहीं. डॉ० पी. सी. रॉय किंवा डॉ० बोस यांच्या सारख्यांच्या भोंवतीं असे विद्यार्थी थोडे तरी गोळा झाले कीं नाहींत? त्यांना आकर्षून घेण्याची शक्ति ज्यांचे ठायीं आहे अशीं विद्वान् माणसें वाढत जातील तसतशी अशा विद्यार्थ्यांची संख्या वाढत जाईल. सध्यां आमच्या शाळांतून व कॉलेजांतून शास्त्रीय विषयाचें शिक्षण देणारे शिक्षक व प्रोफेसर आहेत. पण खुद्द त्यांचेच ठायीं त्यांच्या विषयाविषयीं अनन्यभक्ति दिसून येत नाहीं, मग ते विद्यार्थ्यांना कसे आकर्षित करणार? जे थोडे शास्त्रज्ञानाचे भक्त आहेत त्यांच्या पाठीमागें इतर कामांचा असा लकडा लावून दिलेला आढळतो कीं सुटीचे दिवस शिवाय इतर दिवशीं त्यांना आपल्या प्रिय देवतेची आराधना करण्यास फुरसतच मिळत नाहीं. डॉ. पी. सी. रॉय सारख्या विद्याखात्यांत अनेक वर्षें काढलेल्या शास्त्रज्ञांनीं हा आपला अनुभव स्पष्टपणें सांगितला आहे बरें, इतकें ही करून एखाद्यानें आपल्या देवतेची आराधना चालवून तिला यत्किंचित् प्रसन्न करून घेतलेंच, तर त्याला जगांपुढें येण्याला दुसऱ्या अडचणी दत्त ह्मणून उभ्या च. तो अगोदर विद्वान् लोकांच्या तिरस्काराला व नंतर उपहासाला प्राप्त होतो. त्याचें ह्मणणें कोणी ऐकूनच घेत नाहीं; त्यानें नेट धरून कोणत्याना कोणत्या उपायानें जगापुढें आपले सिद्धांत मांडलेच, तर प्रथम उपहास नंतर विरोध, आणि शेवटीं गुणग्राहकता अशा निरनिराळ्या पायऱ्या चढून त्याला जावें लागतें. डॉ० जगदीशचंद्र बोस यांना हा खडतर अनुभव आलेलाच आहे. इतकी खडतर तपश्चर्या केल्यावांचून शास्त्रीय विषयांत पारंगत असलेल्या मंडळीच्या पसंतीचें शिक्का मोर्तब हल्लींच्या काळांत मिळत नाहीं. पण या तपश्चर्येच्या तीव्रतेला भिऊन चालावयाचें नाहीं. हिंदुस्थानाला जगांतल्या प्रमुख राष्ट्रांच्या मालिकेंत बसावयाचें असेल व ऐहिक उन्नति करून घ्यावयाची असेल तर ही सिद्धि प्राप्त करून घेण्यास अवश्य लागणारी तपश्चर्या करण्यास त्यानें तयार झालें पाहिजे. पूर्वींचे राजे लोक तपोधन ऋषींसाठीं तपोवनें निरुपद्रव होतील असें करणें आपलें कर्तव्य समजत. कारण, तसें करण्यानें ऋषींच्या तपाचा षष्ठांस आपणास मोबदल्यांत मिळेल अशी त्यांना लालुच वाटत असे, व हा षष्ठांस ते बहुमोल मानीत. हिंदुस्थानांत शास्त्रीय ज्ञानाच्या प्राप्तीसाठीं ऋषीसारखी तपश्चर्या करण्यास कोणी उद्युक्त झाले तर त्यांच्या त्या तपश्चर्येला अनुकूळ लागणारीं साधनें पुरविणें हें राजेरजवाडे व धनिक यांचें काम आहे. कारण त्यांच्या तपश्चर्येचा बराचसा अंश शास्त्रीयज्ञानाच्या उत्कर्षावरोबर होणाऱ्या आर्थिक उत्कर्षाच्या व धनवृद्धीच्या रूपानें सरकारला व भांडवलवाल्या कारखानदारांना मिळावयाचा आहे. तेव्हां असे तपोनिधि आपल्या राज्यांत होण्यासारखे कोणी आहेत काय याचा शोध करून कोणी असल्यास त्यांच्यासाठीं प्रयोगालयें बांधून देणें, व त्यांच्या निर्वाहापुरत्या शिष्यवृत्ति त्यांना देऊन शास्त्रीय तपःसिद्धीचे अंशभाक् होण्याची उमेद बाळगणें हें संस्थानिकांचें व सरकारचें, त्याचप्रमाणें धनिक वर्गाचें ही अवश्य कर्तव्य आहे. या लोकांनीं शास्त्रीय विषयावर सोपीं पुस्तकें लिहवून, वर्तमानपत्रें व मासिकें यांना मदत करून व इतर प्रकारें प्रोत्साहन देऊन देशांत शास्त्रज्ञानाचा प्रसार अवश्य केला पाहिजे. तसें होईल तरच आतां तरणोपाय आहे.

## संपत्तीचा सदुपयोग.

आमच्या लोकांत यज्ञ करण्याची चाल पूर्वी असे. हे यज्ञ ह्मणजे महत्कार्यासाठीं स्वार्थत्याग करण्यास शिकविण्याच्या शाळा असत. या यज्ञासाठीं ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिन्ही वर्गाच्या लोकांना आपापल्या परीनें स्वार्थत्याग करावा लागे. कालांतरानें या यज्ञांचें स्वरूप पालटलें, तरी त्या यज्ञांचें रहस्य अजून ही कांहीं थोड्याशा व्यक्तींच्या वर्तनांत प्रतिबिंबित झालेलें दिसतें. यज्ञांच्या पुण्यावर देशाचें सौभाग्य अवलंबून आहे ही पूर्वींची आमची समजूत अद्याप ही कायम आहे. स्वार्थत्यागावांचून कोणतीही उन्नति शक्य नाहीं ही सध्याची समजूत जितकी ज्यास्त प्रसृत होईल तितकें इष्टच आहे. या दृष्टीनें अमळनेरचे व्यापारी मि. प्रतापशेट व मि. वल्लभदास यांनीं एक लक्ष रुपयांची देणगी देऊन तत्वज्ञान विषयाचें अध्ययन करणारासाठीं ठेविलेल्या छात्रवृत्तींबद्दल आह्मी त्यांचें अभिनंदन करतों. त्यांनीं दाखविलेला स्वार्थत्याग सर्वथा अनुकरणीय आहे. मात्र त्यांची योजना सर्वथा निर्दोष ह्मणतां येत नाहीं. सध्या आमच्या देशाला विशेष अवश्यकता तत्वज्ञानाच्या अध्ययनाची नसून शास्त्रीय ज्ञानाची आहे ही गोष्ट ध्यानांत घेऊन सामान्य जनसमाजांत शास्त्रीय ज्ञानाचा फैलाव करण्याचे कामीं या देणगीचा उपयोग करण्यांत आला असता तर विशेष चांगलें झालें असतें. असो. या कामासाठीं दुसरे एखादे प्रताप शेट उभे राहतील अशी आह्मी आशा करतों.

## लोका सांगे ब्रह्मज्ञान!

ता. २८ मेच्या सुबोधपत्रिकेच्या इंग्रजी विभागांत कोणी एका लेखकानें शिरडीच्या साई बावांचे शिष्य दासगणू यांनीं 'आरती ज्ञानराजा' या सुप्रसिद्ध जुन्या आरतीचें कडवें फिरवून 'आरती साई बावा' असें त्याचें रुपांतर केल्याबद्दल दासगणूला दोष दिला आहे. या बाबतींत जर कोणी अधिक दोषाचे अधिकारी असतील तर ते प्रार्थनासमाजाचे सभासदच होत. हे पत्रिका कर्त्यांचे लक्षांत येऊं नये हें आश्चर्य आहे. त्या समाजाच्या 'प्रार्थना संगीतां'त एकनाथ, कबीर, ज्ञानदेव, तुकाराम वगैरे बहुतेक संतकवीचे हातपाय मोडून व त्यांच्या कवितेचे शब्द हवे तसे फिरविण्याची मुभा घेऊन प्रार्थनासंगीताचें बाड तयार करण्यांत आलें आहे. स्वतःच्या नाकांत शेंबूड असतां दुसऱ्याला घाणेरडा ह्मणण्याचें धारिष्ट्र अजब ह्मटलें पाहिजे.

## लेखचोर.

अलीकडे सुशिक्षितांत चोरी करण्याची प्रवृत्ति दिसूं लागली आहे व तिचा निषेध वारंवार करण्यांत येत असतांही तिचें नियमन होत नाहीं ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. ही चोरी द्रव्याची नसली ह्मणून चोरी नव्हे किंवा कमी तिरस्काराला पात्र आहे असें नाहीं. शिकलेले पुरुष व स्त्रिया लेखक ह्मणून घेण्याच्या इच्छेनें दुसऱ्याचे लेख फिरवून किंवा त्यांचे भाषांतर करून स्वतःच्या नांवावर प्रसिद्ध करूं लागले आहेत. ही प्रवृत्ति अत्यंत निंद्य आहे यांत शंका नाहीं. ही नाहींशी करण्यास उत्तम उपाय ह्मणजे अशी लेखचोरांची चोरी चवाठ्यावर आणून त्यांची छीः थू करणें हा आहे. मराठी पेक्षां हिंदी भाषेंतल्या मासिकांत व वर्तमानपत्रांत असे चोरीचे लेख ज्यास्त येतात. पण आश्चर्य हें कीं एक 'सरस्वती' खेरीज करून इतर हिंदी मासिकांतून अशा चोरीबद्दल तिरस्कार व्यक्त करणारे लेख न येतां उलट अशा लेखकांना प्रसिद्धीच्या रूपानें उत्तेजन देण्यांत येत असतें. भाषोन्नति चोरीवांचून होतच नसेल, तर अशा अनीतीच्या मार्गानं ती होण्यापेक्षां न झालेली बरी असें आह्मांस वाटतें.

## महायुद्धाची प्रगति.

प्रस्तुतचें युद्ध सगळ्या ज्योतिष्यांच्या आणि शास्त्रज्ञांच्या भविष्य वर्तविण्याच्या सामर्थ्याला पुरून उरलें आहे. थोड्याच दिवसांपूर्वी व्हर्डुनच्या लढाईच्या नाटकाचा अखेरचा अंक किंबहुना अखेरचाच प्रवेश संपत आला आहे असें युद्धकलाविशारदांचें मत ह्मणून अनेक इंग्रजी पत्रांनीं प्रसिद्ध केलें होतें. पण त्यानंतरच्या काळांत व्हर्डुनच्या लढाईचा रंग कोठेंच फिका पडलेला न दिसतां उलट दिवसेंदिवस तें नाटक मारुतीच्या शेपटासारखें लांबत चाललेलें दिसत आहे. गेल्या आठवड्यांतला जर्मन लोकांचा लढण्याचा आवेश कांहीं अपूर्व होता हें इंग्रज सुद्धां कबूल करतात. प्रस्तुतच्या युद्धांतली एकेक गोष्टच भारतीय युद्धाला मागें टाकणारी आहे. सगळें भारतीय युद्ध अठरा दिवसांत आटपलें. नुसती व्हर्डुनचीच लढाई घेतली तरी ती त्या युद्धाच्या चौपट मुदतीपर्यंत चालली आहे आणि अजूनही तिचा अंतिम काळ दृष्टिगोचर होत नाहीं. जर्मन कितीही आवेशानें प्राणहानीची पर्वा न करतां लढले तरी फ्रेंच त्यांना पुरून उरले आहेत. जर्म

युवराजाची या लढाईत नामुष्की झाल्यामुळें त्याची अब्रू राखण्यासाठीं जर्मन शत्रूच्या पलटणीवर लागोपाठ येऊन मृत्युमुखीं पडत आहेत. डुमॉंटचा किल्ला शत्रूंनीं मोठ्या शिकस्तीनें घेतला. पण त्यासाठीं रक्ताच्या नद्या वाहल्या सारखा जर्मनीला कोणता लाभ झाला ? आसपासच्या भागांतून त्यांनीं फ्रेंचांना हांकून लाविलें काय ? या प्रश्नाचें उत्तर 'नाहीं' असेंच देणें भाग आहे. मे अखेर जर्मन शत्रूंची निवळ व्हर्डुन व डुमॉंट जवळची प्राणहानि साडे तीन लक्षांवर गेली आहे असा अंदाज आहे. म्यूजच्या पश्चिम तीरावर ही त्यांचे हल्ले चालू आहेत. मॉर्ट हाम व म्यूज यांच्या मधून मार्ग काढण्याचा त्यांनीं प्रयत्न केला, आणि क्युमेरेस येथें ठाणें देण्यापुरती जागा त्यांनीं काबीज केली. पण फ्रेंचांनीं ती बहुतेक सगळी परत घेतली. म्यूजच्या पूर्व किनाऱ्यावर जर्मन केवळ स्वतःचा बचाव करून राहिले आहेत. पण सर्वांचें लक्ष व्हर्डुनकडे लागलें आहे. त्यांत जर्मनांना अपयश निश्चित आलें ह्मणजे लढाई संपलीच ह्मणावयाची. जय मिळाला तरी तो लहानसान कामाचा नाहीं, चांगला मोठाच पाहिजे. ब्रिटिश रणक्षेत्राकडे पाहिलें तर तेथें ही दोस्त राष्ट्रांचेंच वर्चस्व दिसते. ब्रिटिश फौज ९० मैलांवर पसरलेली आहे. आणि तिला फ्रेंच सेनापति जॉफ्रे याच्या धोरणाला सोडून न जातां त्याच्या अनुसंधानानेंच चालावें लागत आहे खंदकांतून शत्रूवर गोळ्यांचा वर्षाव सुरूच आहे. जरूर पडल्यास जनरल हेग फ्रेंचांची जागा घेऊन फ्रेंच सैन्याला व्हर्डुनकडे जाण्यासाठीं मोकळे करण्यास तयार राहतील.

## इटालियन रणक्षेत्र.

ट्रेंटिनो प्रांतांत इटलीच्या लोकांना मागें पाय घ्यावा लागला. आणि भविष्य काळावर मदार ठेवून त्यांनीं पडतें घेतलें हा तरी शहाणपणाच ह्मटला पाहिजे. कारण आतां कांहीं वेळ आस्ट्रियाची टुरटुर चालली आहे तोंपर्यंत जरा नरम घेऊन आपली बाजू भक्कम करण्यास इटालियन लोकांना आयती संधी मिळेल. इटलिच्या उत्तरभागाकडून शत्रूची स्वारी येण्याचा संभव नाहीं. कारण तो रस्ता बिकट असून रसद येण्यास फारच अडचणीचा आहे. अशा अडचणींतून शत्रूंनीं मार्ग काढण्याचा अविचार केला तर तो इटालियनांच्या पथ्यावरच पडेल. ट्रेंटिनो प्रांतांत माघार घ्यावी लागली याचा वचपा व्हालोना प्रांतांत आस्ट्रियनांवर चाल करून काढावयाचा इटालियनांचा विचार आहे अशी गप्प मध्यें उठली होती. पण ती गप्पच दिसते.

## बाल्कन रणक्षेत्र.

बाल्कनमध्यें दोस्त राष्ट्रांच्या फौजांनीं पुढें पाऊल टाकण्याचा समय अद्याप आला नाहीं. कारण, सगळें सार्वियन सैन्य अद्याप सालोनिका येथें जाऊन पोंचलें नाहीं. शत्रूचें सैन्य इटालियन व फ्रेंच रणक्षेत्राकडे कांहीं भाग पाठवावा लागल्यामुळें दुर्बळ झालें आहे अशी कल्पना केली तरी दाक्षिण आल्बानियामध्यें दोस्त राष्ट्रांनीं एकजुटीनें राहण्यांतच फायदा आहे. सार्वियन फौज सालोनिकाला सुरक्षितपणें पोंचावी ही गोष्ट बल्गेरियाला मस्तकशूळ उत्पन्न करीत असली पाहिजे. कारण त्यानें आपलें सैन्य ग्रीक हद्द ओलांडून पलीकडे नेली आहे. ग्रीसनें बल्गेरियाचें हें कृत्य मुकाट्यानें कसें घडूं दिलें याबद्दल वर्तमानपत्रांतून बरीच चर्चा चालली आहे. पण ग्रीसचें ह्मणणें आहे कीं तटस्थपणा जर खरोखर ठेवावयाचा, तर भांडणाऱ्या राष्ट्रांपैकीं एका पक्षाला फायदा द्यावयाचा व दुसऱ्याला नाहीं असा पक्षपात उपयोगाचा नाहीं.

## अमेरिका आणि दोस्त राष्ट्रें

तटस्थ राष्ट्रांच्या टपालासंबंधानें ब्रिटिश व फ्रेंच यांनीं स्वीकारलेली पद्धति अमेरिकेला गैरकायदा वाटल्यावरून अमेरिकेनें एका खलित्यांत त्या पद्धतीचा स्पष्टपणें निषेध केला आहे. यावर तसेंच जोरदार उत्तर ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांच्या कडून बाईलच असें मागील अनुभवावरून ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. यत्किंचित् आधारावर मोठें महाभारत रचावयाची खोड अमेरिकेला कशी आहे याचें उदाहरण लोकांच्या स्मरणांत ताजें आहेच. इंग्लंडनें सर्व जहाजी मार्ग बंद केल्यावरून अमेरिकेनें तटस्थराष्ट्रांच्या व्यापाराला ब्रिटननें हरकत केली असा एकच गिल्ला करून एक खलिता ब्रिटनला पाठविला होता. त्यावर सर एडवर्ड ग्रे यांनीं जें उत्तर पाठविलें तें इतकें मुद्देसुद व आंकडे वगैरेंच्या पुराव्यानें भरलेलें होतें कीं त्यावर अमेरिकेला निरुत्तरच व्हावें लागलें. त्या अनुभवानें तरी अमेरिका शहाणी होईल व पुनः असले भलते सलते आरोप भक्काम आधारावांचून करणार नाहीं असें वाटलें होतें. आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं जर्मनीनें केलेल्या नुकसानीबद्दल भरपाई मागतांना डा. विल्सन यांची लेखणी मात्र जोरानें शद्ब टाकीत चालत नाहीं.

## महमदी काशीयात्रा.

### ( लढाईमुळें बंदी )

प्रत्येक मुसलमान बंधूची श्रेष्ठयात्रा ह्मणजे मक्केची यात्रा होय. दरसाल हे यात्रेकरू घेऊन जाणाऱ्या आगबोटी संबंधानें मुंबई बंदरांत पुष्कळ शहानिशा होत असते. आणि यात्रेकरूंचा प्रवास सुखावह होण्याबद्दल एक मुंबई हज कमीटी ह्मणून नेमलेली आहे. एकंदर स्थिती लक्षांत घेऊन या कमीटीनें असा निर्णय केला आहे कीं यंदाचे वर्षी ही यात्रा बंद ठेवण्या इतकीं सबळ कारणें झालीं आहेत. सरासरीनें १५००० यात्रेकरू दरसाल हजला जातात. गेल्यासालीं हे फक्त २४०० च होते. पण तेवढ्यांची देखील मोठी ओढा झाली. अनाजाचा पुरवठा जेद्दा बंदरांत सरकारला पुरेसा चवितां आला नाहीं. लढाईमुळें केव्हां आगबोटी परत येतील याचाही नेम उरला नाहीं व त्यामुळें पुष्कळांना आपली सर्व मालमत्ता विकावी लागली आणि मुंबई बंदरांत पुष्कळसे अगदीं कंगाल होऊन आले. जेथें आपण तांदुळाच्या पोत्याला १६ रु. देऊं तेथें मक्केच्या जवळचे बंदर जेद्दा येथे ८५ रुपये पडत व केरोसिन तेलाच्या एका टिनाला १५ रु. पडत आणि या संकटाशिवाय जेद्दा येथें मनिआर्डरीनें पैसे पाठविण्याची ही सोय नाहीं. आणि तिकडे जे यात्रे करू मरतात त्यांची ब्रिटिश कॉन्सल मार्फत माहिती मिळविण्याची तजवीज ही हल्लीं उपलब्ध नाहीं. त्या शिवाय सध्यां जद्दाला जाणाऱ्या आगबोटींचाही कांहीं निश्चितपणा नाहीं व एखादी आगबोट गेलीच तर भाडेंही फार जबर द्यावें लागेल. तेव्हां मुंबईच्या हज कमीटीची आपल्या मुसलमान भाईस अशी विज्ञप्ती आहे कीं त्यांनीं यंदाचा यात्रेचा बेत पुढील वर्षावर सोपवावा.

## बादशहांचा संदेश.

विलायतेंतल्या सक्तीच्या लष्करी नोकरीच्या कायद्यास मंजुरी देतांना आपले परमपूज्य बादशहा श्रीमान् पंचम जार्ज यांनीं 'लोकांना संदेश' ह्मणून एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत ते ह्मणतात कीं सुधारणेच्या प्रीत्यर्थ सध्यांचें महान् युद्ध चाललें आहे त्यांत आपल्या देशच्या लष्करी साधनांना ज्यास्त यशस्वी करण्यासाठीं आपल्या प्रधानांच्या सल्ल्यानें १८ पासून ४१ वर्षें पर्यंत वयाच्या सशक्त माणसाला लष्करी नोकरींत सक्तीनें घेण्याची अवश्यकता मला दिसून आली आहे. हें युद्ध सुरू झाल्यापासून आतां पर्यंत ५०४१००० लोक स्वतःच्या खुषीनें सैन्यांत प्रविष्ट झाले. त्यांनीं अशा रीतीनें जो उच्च प्रकारचा देशाभिमान व जी आत्मसमर्पणाची तयारी दाखविली त्याबद्दल मी त्यांची प्रशंसा करतो. अशा प्रकारची मोठी राजसेवा इतिहासांत पूर्वीं कधीं घडलेली नाहीं, आणि भावी ब्रिटीश प्रजा या गोष्टीकडे अभिमानाच्या दृष्टीनेंच पाहत राहील. माझी खात्री आहे कीं प्रस्तुत प्रसंगी माझ्या प्रजेनें संकटाचे वेळीं जें अप्रतिम पाणी दाखविलें आहे तेंच पाणी सक्तीच्या लष्करी नोकरीमुळें त्यांच्यावर पडणारा स्वार्थत्यागाचा भार आनंदानें घेण्यास त्यांना प्रवृत्त करील, आणि त्या परमदयाळु परमेश्वराची कृपा आपणांस व आपल्या दोस्त राष्ट्रांस युरोपच्या स्वतंत्रतेसाठीं हातीं धरलेल्या प्रस्तुतच्या महायुद्धांत यशस्वी करील

## पाणतीर.

### ( प्रेस आक्टाचा विपरिणाम )

इंडियांत जा उत्कृष्ट आन्हिक पत्रें निघतात त्यामध्यें पाहिल्या प्रतीचें New India आहे. त्याचे संपादक श्रीमती बिझांटबाई आहेत. त्यांच्या सारख्या पासून दोन हजाराचा जामीन मागणें ह्मणजे कायद्याचा छळ होय. स्वराज्याची ध्वजा लावून चालणाऱ्या या वाड.मयी आगबोटीला पाणतीर छेडूं पहात आहे. नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्राकडूनही दोन हजारांचा जामीन मागण्यांत आला आहे. काल्पनिक गोष्टी खऱ्यापेक्षां सरकारला फार त्रास देतात.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः—** हवा शीतल, वारा गंधयुक्त व मेघ सजल अशी सामुग्री उष्णकालाचा ताप दूर करीत असून भावी पर्जन्य कालाविषयीं गोड गोड अनुमानें सुचवीत आहे. रोगराई नाहीं ह्मणण्या पेक्षां अस्तास जात चालली आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार डेपुटी कमिशनर हे पुण्याला लष्कर भरतीच्या संबंधांत थोड्या दिवसा करितां आज जाणार आहेत.

रा. रा. भगवतीचरण डुबे एक्झीक्युटिव इंजिनिअर, पश्चिम वऱ्हाड यांची बदली अलिशान चीफ कमिशनर यांच्या तैनातींत अंडर सेक्रेटरीच्या हुद्यावर झाल्या अन्वयें ते गेल्या शुक्रवारीं येथून रवाना झाले आज सरासरी पांच वर्षें येथें असून आपल्या सौजन्यानें ते लोकप्रिय असत त्यांची मुख्य कामगिरी ह्मणजे कापशी येथील तलावाच्या कामाची चालूं उभारणी होय. या कामीं त्यांनीं आपलें कौशल्य विशेष दाखविले असून काम पुरें होण्याला अजून वर्षभराचा काल लागेल.

रा. रा. एम. रामय्या एक्झीक्युटीव्ह इंजि. यांनीं पूर्व वऱ्हाडचा चार्ज घेतला.

आणि रा. रा. सुंदरलाल एक्झि. इंजि. हे या डिव्हीजनवर दाखल झाले आहेत.

रा. रा. पुंडरीक ज्ञानेश्वर जोशी यांस आफि. सब जज्ज करून आकोल्यास नेमण्यांत आलें.

रा. आर. ए. विलसन आफि. डे. क. बुलडाणा यास सहा आठवड्यांची हक्काची रजा देण्यांत आली असून त्यांच्या जागीं रा. रा. रौटन यांस खामगांवहून बदललें.

आनंदविलास सं. ना. मंडळी आकोला. श्रीराम थिएटरांत सोमवार ता.५ जून रात्रौ सं. शापसंभ्रम बुधवार ता. ७ जून सं. चंद्रसेना शनिवार ता. १० जून सं. धनुर्भंग हे प्रयोग करितील.

व्यवस्थापक ग. वि. वीरकर.

## नोटीस

तुळसाई मर्द बहादूरजी कराळे वा नागझीरी ता. खामगांव इस

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुं माझी सखी चुलती आहे. माझा चुलता ह्मणजे तुझा नवरा नामे बहादुरजी हे जिवंत असतांना त्यांनीं आपले सर्व जिनगीचे स्थावर जंगम मौजे नागझीरी व मनारखेडे ता खामगांव येथील ह्या इस्टेटीचे ता. २३-८-१९०९ इसवी रोजी माझे नांवचें मृत्युपत्र करून ठेविलें हे तुह्मास व बहूतेक सोयरे धायरे व तुझ्या उभयता मुली यमनी व चिनकी ह्यांना सुद्धा सर्वप्रकारें माहिती आहे. माझे चुलत्यास कोणाचे देणें नव्हतें व तुह्मास कर्ज काढण्याचें कारण नाहीं. तुह्मी हयांत आहे तो पर्यंत उपभोग घ्यावा तुह्मास जिनगीची कोणतेही प्रकारें. गहाण खरेदी किंवा कोणते प्रकारचा दस्तऐवज करण्याचा अधिकार नाहीं. हे तुह्मास या नोटीशीनें कळविले आहे व केल्यास तो रद्द आहे त्याच प्रमाणें सर्वांस जाहिर करण्यांत येते कीं आमचे चुलतीस किंवा चुलत बहिणीस सदरहू जिनगीचा व्यवहार खरेदी विक्री किंवा कोणते प्रकारचा दस्तऐवज करून देण्याचा अधिकार हक्क नाहीं तर कोणीही यांच्याशीं व्यवहार करूं नये केल्यास तो रद्द आहे कळावे ता. २५-५-१६ सही

१ सीवराम ईश्राम याची नि. रेघ दस्तुर कृष्णाजी केशव चापडगांवकर रा.

नो. नं. २०५ आकोला.

# नोटिस.

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, आकोला जिल्ह्यांतील सोबतच्या यादींत दर्शविलेले जिल्हा बोर्डाचे रस्ते, स्प्रिंगचे (कमानीचे) टांगे, किंवा गाड्या आणि ज्यांना चार बैला शिवाय जास्त बैल ओढण्याम लागत नाहींत, अशा सर्व साधारण गाड्या, या खेरीज दुसऱ्या कोणत्याही कामाकरीतां उपयोगात आणावयाचे नाहींत.

सोबत जोडलेल्या नमुन्यांत, आणि खालीं दिलेल्या नियमानुसार असलेला लेखी करारनामा जिल्हा बोर्डाचे चेअरमन, किंवा व्हाईस चेअरमन, यांनीं मंजूर केल्याशिवाय, साधारण गाड्यांतून किंवा, दोन जोड्यापेक्षा जास्त बैल ओढण्यास न लागणाऱ्या गाड्यातुन, नेलीं जाणार नाहींत, अशीं जड यंत्रें, किंवा शेतकीस लागणारि अवजारे, असल्या रस्त्यावरून जाणार नाहींत. स्थानिक सरकारच्या मंजुरातीनें एखाद्या विविक्षीत रस्त्यानें यांत्रिक सामान नेण्याची हमी घेतली असेल, अशा वेळीं, प्रत्येक रस्त्याची किंवा यंत्राची, वस्तुस्थिती पाहून, योग्य अशा फरका निशी, खालीं दर्शविलेल्या नियमा प्रमाणें एक परवाना, स्थानिक सरकारा कडूनच मिळेल.

(२) करारनाम्या शिवाय किंवा पूर्वीं सांगीतलेल्या परवान्याशिवाय, अगर दुसऱ्या कोणत्यांही रीतीनें, वर निर्दिष्ट केलेल्या, करारनाम्याच्या अटी मोडून, जिल्हा बोर्डाच्या रस्त्यावरून जड यंत्र किंवा नांगर, वखर वगैरे, सारखी, रस्त्यावर खुणा पाडणारीं आणि रस्ता खराब करणारिं, दुसरीं शेतीचीं अवजारें, कोणीही मनुष्य, नेतांना, किंवा, नेण्याचा प्रयत्न करित असताना, आढळला, तर त्यानें सदर्हू रस्त्याचा अन्यायानें उपयोग केला असें समजून, कायदेशीर रीतीनें त्याजवर खटला करण्यांत येईल.

## नियम

१ ज्या वेळीं जिल्हा बोर्डाचे ताब्यांत, असलेल्या रस्त्यावरून, एकामाग एक अशा जोडलेल्या साधारण गाड्यांतून किंवा ज्यांना ४ पेक्षां जास्त बैल ओढण्यास लागत नाहींत, अशा गाड्यांतून नेतां न येण्या सारखे जर जड यंत्र किंवा अवजारे नेण्याचा विचार असेल त्या वेळीं सदर्हू यंत्र अगर अवजारे नेणारे इसमास सोबत जोडलेल्या करारनाम्याच्या नमुन्यावर सही करावी लागेल.

२ असल्या प्रकारचे ओझे नेण्यास, परवानगी मागण्याकरितां, जिल्हा बोर्डाचे चेअरमन अगर व्हाईस चेअरमन यांज कडेस, ज्या दिवशीं प्रवास सुरुं होण्याचा असेल त्या पूर्वीं निदान २१ दिवस तरी अर्ज करावा. कांहीं विविक्षित प्रसंगीं चेअरमन किंवा व्हाईस चेअरमन २१ दिवसापेक्षा कमी मुदतींत केलेला अर्ज मंजूर करतील. परंतु ६ व्या नियमांत सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करण्यास पुरेसा वेळ मिळेल इतका अवकाश अर्ज दिल्यानंतर असावा. सदर्हू अर्जांत खालील मुद्यावर माहिती असावी.

(१) जो पदार्थ न्यावयाचा असेल त्याचे वजन (शक्य असेल तर रेल्वे रिसीटवरून द्यावे अगर एखादे सर्टीफिकीट द्यावे)
(२) ओझे न्यावयास उपयोगात आणावयाच्या गाडीचें वजन.
(३) वरील ओझे उचलण्या करितां एखाद्या एंजिनचा उपयोग करावयाचा असला तर त्याचें वजन.
(४) गाडीचीं व एंजिनचीं चाकें किती आहेत.
(५) गाडीच्या अगर एंजिनच्या चाकाच्या पट्ट्याचा व्यास व रुंदी.
(६) ज्या रस्त्यानें न्यावयाचें तो रस्ता व अंतर. ज्या ठिकाणाहून न्यावयाचें व जेथें न्यावयाचे त्या ठिकाणांचीं नांवें.
(७) ओझें नेण्याची तारीख.
(८) ओझ्या बरोबर जाणाऱ्या जबाबदार गृहस्थाचें नांव व पत्ता
(९) वळणाच्या आणि उताराच्या ठिकाणीं अपघात होऊं नये ह्या बाबतींत काय पूर्व तयारी केली आहे त्याचा तपशील.

(३) वजन व माप खालीं दर्शविलेल्या प्रमाणांत असावीं.

१ एका गाडीवर गाडीच्या वजनासुद्धां १६ टनापेक्षां जास्त ओझें असू नये.
२ चाकाचा व्यास १८ इंचां पेक्षां कमी असू नये.
३ ८ टना पेक्षां जास्त ओझें नेणाऱ्या गाड्यांच्या आखा मधील अंतर १० फुटापेक्षां कमी असू नये.

(४) जाण्याच्या गती संबंधानें आणि रात्रीं किंवा ज्या वेळीं ओझ्याच्या गाड्या नेण्यांत येतील त्या वेळीं घ्यावयाच्या खबरदारी संबंधानें खालील नियम पाळले पाहिजेत.

गाडीचा वेग दरतासास ४ मैलापेक्षां जास्त असू नये.
२ गाड्यांचा प्रवास सरासरी प्रत्येक दिवशीं १० मैलापेक्षां कमी असू नये.
३ कमींत कमी अर्धा रस्ता तरी रहदारीस राहील अशा रीतीनें रस्त्याच्या एका बाजूस रात्रीचेवेळेस गाड्या ओढून ठेवाव्यात.
४ अशा बाजूस ओढलेल्या गाड्यांना रात्रीच्यावेळीं पुढें २ व मागें २ असे दिवे असावेत.
५ जिल्हा बोर्डाचे चेअरमन अगर व्हाईसचेअरमन यांची परवानगी घेतल्याशिवाय, सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत प्रवास करूं नये. व अशी परवानगी फक्त जरूरीच्या वेळींच दिली जाईल.
सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत बाजूस ओढलेल्या गाड्याजवळ चौकीदार असावा.

(५) मोडतोडीच्या वेळीं खालील सूचनाकडे लक्ष द्यावें.

मोडतोड झाल्यास २४० तासाच्याआंत रस्ता साफ करण्याबद्दल मालक जबाबदार राहील,

२ मोडतोडीची बातमी अगदीं जवळच्या डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या अधिकाऱ्यास मालकाच्या एंजटानें तातडतोब द्यावी.

३ ओझें न्यावयास सोपें जावे ह्मणून सबल किंवा दुसरीं अवजारें, ज्याच्यायोगानें रस्ता खराब होण्याचा संभव आहे अशीं उपयोगांत आणूं नयेत.

(६) सोबतच्या नमुन्याप्रमाणें करारनामा करण्यापूर्वीं, चेअरमन अगर व्हाईसचेअरमन, यांनीं स्वतःची खात्री करून घ्यावी कीं ज्या रस्त्यावरून ओझें न्यावयाचे असेल त्या रस्त्यावरील पुलास त्या ओझे नेण्यापासून कांहीं एक धक्का पोहोचणार नाहीं; आणि त्यांच्यामतें जर असले पूल निरुपयोगी असले तर त्यांनीं ओझें वाहण्यास मनाई करावी व तसे त्या अर्जदारास कळवावे. त्यायोगानें जे पूल सुरक्षीत आहेत किंवा नाहीं याबद्दल कांहींच सांगितलें नाहीं अशा पूलावरून ओझें नेतांना, एंजिन किंवा दुसऱ्या कोण्याही यांत्रीक अवजारास नुकसान झालें तर जिल्हाबोर्ड त्याबद्दल कोणत्याही रीतीनें जबाबदार नाहीं.

जे ओझें न्यावयाचे आहे ते पूलावरून जाण्यासारखे नसल्यास, अर्जदारानें स्वतःच्या खर्चानें बाजूला रस्ते काढावेत. ओझे नेण्याच्यावेळीं रस्त्याचा भाग अगर रस्त्याच्या हद्दींतील जमीन खराब केली असेल तर तो भाग अगर ती जमीन पूर्वींप्रमाणें सुधारून देण्याची जबाबदारी अर्जदाराकडेच राहील.

(७) चेअरमन अगर व्हाईसचेअरमन ठरवितील ती रक्कम अर्जदारानें अमानत ठेवावी, पण अशी रक्कम रस्त्याच्या प्रत्येक मैलास २० रु. यापेक्षां ज्यास्त असू शकणार नाहीं. करारनाम्यान्वयें रस्ता दुरुस्त करण्यास लागणारी रक्कम या ठेवीच्या रकमेंतून वसूल करून राहिलेली रक्कम, ओझे नेण्याचे काम संपल्यावर परत केली जाईल. पण रस्त्याला किंवा रस्त्यासबंधीच असलेल्या दुसऱ्या कामास झालेलें नुकसान भरून काढण्यास जर ही रक्कम अपुरी असली तर, चेअरमन अगर व्हाईसचेअरमन, यांचेकडून हुकुम येतांच, १० दिवसाचे आंत जादा रक्कम अर्जदारास द्यावी लागेल. या बाबतींत अपील करावयाचे असल्यास मे. डेप्युटि कमिशनर साहेब यांचेकडेस करावे. व ते जो हुकूम देतील तोच अखेरचा समजला जाऊन पुढ अपील करू दिले जाणार नाहीं.

(८) दुसऱ्या नियमा प्रमाणें दिलेली कैफियत खोटी आहे असे जर चेअरमन अगर व्हाईस चेअरमन यांना वाटेल तर, त्यानें ठेवलेल्या अमानत रकमेस त्याला मुकावे लागेल. अशा वेळीं मे. डेप्युटिकमिशनर साहेब यांचेकडेस अपील करण्याची मुभा आहे.

सही
K. G. Damle
व्हाईस चेअरमन
जिल्हा बोर्ड आकोला

मेहरबान व्हाईसचेअरमन साहेब जिल्हा बोर्ड आकोला यांचे तर्फे सेक्रेटरी जिल्हा बोर्ड आकोला यासीं करारनामा लिहून दिला.

आज तारीख महिना सन
मी ———— राहणार ———— याजला
खालीं लिहिलेलें वजनदार सामान, संख्या वजन
खालीं दर्शविलेल्या गाड्या मधून

| संख्या | वजन | टायरची रुंदी | चाकाचा घेर | आंसामधील अतर |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | |

खालीं दिलेल्या जिल्हा बोर्डाच्या ताब्यातील रस्त्यावरून वाहून नेण्याची परवानगी मिळाली आहे.

रस्त्याचें नांव मैल
पासून पर्यंत.

सबब ह्या करारनाम्या सोबत जोडलेल्या नियमा बरहुकूम वागण्याचे ह्या लेखानें मी कबूल करितो व मी रुपये अमानत ठेवीत आहे त्या मधुन मजकडे निघणारी योग्य ती रक्कम मे. व्हाईस चेअरमन जिल्हा बोर्ड यांनीं वसूल करून घ्यावी. वसूल करावयाची रक्कम अमानत रकमेपेक्षां जास्त निघाल्यास सदर्हू रक्कम मला त्याबद्दल नोटिस मिळाल्यापासून दहा दिवसाचे आंत मी भरणा करून देण्यास तयार आहे.

ज्या रस्त्यानें मला माल नेण्याची परवानगी मिळाली आहे त्या रस्त्यावरील, खालीं दिलेले शिवाय करून, इतर पूल, मोऱ्या, फरशा, वगैरे योग्य तेवढें मजबूत वगैरे नसल्यामुळें जर माझें कांहीं नुकसान झालें तर त्या बदलची जबाबदारी जिल्हा बोर्ड आकोला यांचेवर न टाकितां तें मी जातीनें सोसण्यास तयार आहे. जो माल नेण्याची मला परवानगी मिळाली आहे तो माल वाहून नेण्याकारितां सुरक्षित नसलेले असे जे कांहीं पूल वगैरे मे. व्हाईस चेअरमन यांनीं खालीं दिले आहेत त्याचा उपयोग न करण्याचें मी कबूल करितो.

| मैल. | फर्लांग. | कामाचें वर्णन | |
|---|---|---|---|
| | | | |

ह्या करारनाम्याप्रमाणें जी रक्कम द्यावयाची ती रक्कम जर दिली नाहीं तर ती रक्कम सी. पी. ल्यांड रेव्हिन्यु आक्टाप्रमाणें ऐन काळीच्या वसूला प्रमाणें वसूल केली जाईल.

तारीख सही ———————— अर्जदार

तारीख ———————— साक्षीदार

तारीख ———————— साक्षीदार

सही व्हाईस चेअरमन जिल्हा बोर्ड आकोला.

### जिल्हा बोर्डाच्या ताब्यांतील रस्त्यांची यादी.

#### पहिल्या वर्गातील रस्ते

| | | मैल | फर्लांग |
|---|---|---|---|
| १ | पारस बाळापूर रस्ता | ६ | ० |
| २ | आकोला शिवनी रस्ता | २ | ६॥ |
| ३ | सांगवी ब्रॅांच रोड | १ | ० |
| ४ | वासीम कोंडाळा रस्ता | ० | ६ |
| ५ | पुसद अप्रोच रोड | १ | ५ |
| ६ | आकोला मलकापूर रस्ता | २ | २॥ |
| ७ | आकोला महान रस्ता | १८ | २॥ |
| ८ | आकोला रेल्वे स्टेशन रस्ता | ० | १ |
| ९ | मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन पासून ते गांवापावेतों रस्ता | ० | ७॥ |
| १० | मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन पासून ते काटनमार्केटच्या दक्षिणे कडचा रस्ता | ० | ३॥। |
| ११ | कुरम रेल्वे स्टेशन पासून ते कुरम गांवापर्यंतचा रस्ता | ३ | ० |
| १२ | काटेपूर्णा कुरणखेड रस्ता | १ | ३॥ |
| १३ | अनसिंग ब्रॅांच रोड | १ १/४४ | ० |
| १४ | आकोला गुडदी रस्ता | २ | २॥ |
| १५ | माना रेल्वे स्टेशन ते माना गांवापावेतों रस्ता | ० | ६॥ |

#### दुसरा वर्ग.

| | | मैल | फर्लांग |
|---|---|---|---|
| १६ | वाशीम आसोला रस्ता | १ | २॥ |
| १७ | बोरगांव गांवापासून ते स्टेशन पावेतों रस्ता | २ | ० |
| १८ | पारस रेल्वे स्टेशन पासून गांवात जाणारा रस्ता | ० | ७ |
| १९ | आकोला ड्राईव्ह रोड | २ | ० |
| २० | कापसी राजंदा रस्ता | २ २५/२६४ | ० |
| २१ | गायगांव निमकर्दा रस्ता | २॥ | ० |
| २२ | वाशीम रिसोड रस्ता | १२ | ० |

नो. नं. १८० व्हाईस चेअरमन डि. बोर्ड आकोला

## नोटीस

शिवराम वा हानुजी वानखेडे कुणबी रा. बेलखेडे ता मुर्तिजापूर

यांसः—

श्री हानुमान संस्थान बेलखेडे याचे वहिवाटदार बाबुजी वा यादवजी पा व नागोजी वा बाबुजी पा वस्ती बेलखेडे ता मुर्तिजापूर यांचे कडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे जवळ पंचा समक्ष वरील संस्थानचा माल वेळोवेळीं जनावरें विक्री करून त्याचे व्याज बदल एकंदर रक्कम रुपये ५०८ पांचशे आठ ही रक्कम तुम्ही गांवातील शहाजोग व विश्वासूक ऐपतदार म्हणून देवाची रक्कम लागेल तेव्हां द्याल असे ठरल्यावरून वरील रक्कम धरवर ठेविली. सदर रक्कम संस्थान करितां जरूर पाहिजे आहे व ती मागितली असतां चाळवाचाळवी करितां हे तुमचे सारख्या योग्य मनुष्यास योग्य नाहीं. हा देवाचा पैसा आहे, त्याज-बद्दल आपण आखेरीस आह्माला नोटिस देणें भाग आणिले. तरी ही नोटिस पावल्या-पासून नोटिस खर्चासह वरील रक्कम आठ दिवसाचे आंत व्याजासह आणून द्यावी. असें न केल्यास तुमचेवर रितीप्रमाणें दावा करून सर्व प्रकारे खर्चासह रक्कम वसूल केली जाईल. कळावें. द. वासुदेव वामन शेंदुर्णीकर पि. रा. आकोला ता० २४-३-१६ इ.

सही

बाबुजी वा यादोजी पा. वानखेडे

रा. बेलखेड द. खुद

१ सही पूर्णाजी वा बाबुजी दस्तुर खुद

नो. नं. १९९

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, माझा मुलगा नामे वामन बळवंत उर्फ शाहू जात ब्राह्मण वय अंदाज १६-१७ वर्षे, वर्ण गोरा, कद ठेंगणा, नाक नीट सरळ, राहण्याची शैली नाटकी, डोकींत थोडे थोडे बाल ठेवलेले, चित्रदर्शक संगित नाटक कंपनींत कांहीं दिवस होता. त्यास गाण्याचाही नाद आहे. अशा रंगानिशाणीचा मन नवळून ८-१० दिवसापासून रागाऊन गेला आहे. बडनेरा स्टेशनहून उमरावतीस गेल्याचा पत्ता लागतो. करितां त्याचा कोणी पत्ता लाऊन घरीं आणून दिल्यास लागणारें भाडें व इनाम रुपये १० दहा देईन कळावे ता० २४-५-१६ इ.

गोदावरीबाई जोशी पो. राजुरा ता. वाशीम मार्ग मेडशी

नो. नं. २००

## जाहिरात

जाहिर करण्यांत येते कीं यवतमाळ नादारी कोर्टात हरकचंद जोहारमल यांस नादार ठरविले आहे व आह्मांस त्याची इस्टेट विकण्यास वगैरे रिसीव्हर नेमले आहे त्या अन्वयें आह्मांस सदर्हू हरकचंद जोहारमल याचे खालील हुकुमनामे व खांदे-खत विकणें आहेत. तरी ज्यास विकत घेणें असेल त्यांनीं समक्ष अगर पत्रद्वारें किंमतीचा खुलासा करुन घ्यावा कळावें.

यादी

| | हुकुमनामा | | ऐन | कोर्ट खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | वि. स्मा. कोर्ट उमरावती दि. मु. नंबर | २८४८/१९१० | ८६१ | ९०८३ |
| २ | सदर्हू ,, | १२४९/१९१३ | १४३८१० | २१८५६ |
| ३ | सदर्हू ,, | १३१५/१९१३ | .२६८ | व खर्च |
| ४ | खांदेखत एक धनको हरकचंद जोहारमल | | | |

ऋणको

भिकाजी वल्लद चिमणाजी व बळीराम वल्लद भिकाजी मुदल रुपये तीनशे हे उभयता राहणार धामणगांव तालुका चांदूर.

येणें प्रमाणें माल विकणें आहे कळावे तारीख २९-५-१९१६ इ.

सही

दत्तात्रय कृष्णाजी काणे रिसिव्हर

नो. नं. २०१

## जाहिर नोटीस

खालीं सही करणारा कडून सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं, मौजे राजेगांव प्र० आडगांव ता. आकोट जि. आकोला येथील राहणारी रेणुकी मर्द शिवराम गावंडे जात कुणबी हल्लीवस्ती निमखेड ता दर्यापूर व मोनाई मर्द शिवराम गावंडे जात कुणबी हल्लीवस्ती शिरसोली प्र. वडनेरगंगाई ता. आ-कोट ह्या उभयता विधवा असून माझ्या घराण्यांतील आहेत. यांना संतान वगैरे कांहीं नाहीं, पांचेराशीं जी स्थावर जंगम मिळकत आहे ती वडिलोपार्जित आहे. त्याइस्टेटीपासून फक्त सदर्हू उभयता विधवा यांस अन्नवस्त्र घेण्याचा हक्क आहे. या शिवाय दुसरा कांहीं इस्टेट अफरातफर करण्याचा अधिकार नाहीं. त्यांचे पासून कोणी गहाण, किंवा खरेदी, किंवा पद्धानीं घेऊं नये. आणि त्या इस्टेटी-वर कोणी आपल्या पैशाचा बोजा लादूं नये. ह्या नोटिशीवर दुर्लक्ष केल्यास मिळकत दिलेल्या रकमेस जबाबदार राहणार नाहीं. कळावें. ता. २१-५-१९१६ इ०

सही

केडाजी वा परशराम पाटील राहणार राजेगांव ता. आकोट निशाणी मोहर

नो० नं० २०२

## नोटीस

जैराम वा कृष्णा चांभार अ. पा. बाप कृष्णा वा जानू चांभार व कृष्णा वा जानू चांभार रा. केळीवेळी ता. आकोट

यांसः—

नोटीस देणार जनी मर्द रावजी चांभार रा. केळीवेळी ता. आकोट नोटीस देते कीं माझा नवरा रावजी चांभार हा सुमारें १ महिना झाला मरण पावला. त्याचे वारस मी त्याची लग्नाची बायको व त्याच्या २ मुली हे वारस आहोत. तुह्मी कृष्णा चांभार हे आमचे लांबचे भाऊ बिरादर आहांत. माझे नवऱ्यानें मला दत्तक घेण्यास सांगीतले नाहीं. नवरा मेल्यावर माझा सुमारें ७००।८०० रुपयाचा कापूस घरी भरला होता तो तुह्मी व नामदेव पाटील यांनीं यशवंत पाटील यास विकून सर्व जण एकत्र होऊन कापसाचे किमतीची रक्कम मला न देतां अफरा तफरा करून खाऊन टाकून माझ्या मर्जी विरुद्ध व मजला भूलथाप देऊन विड्याचे पानांतून कांहीं मादक पदार्थ चारून मजला दहिहांडे येथे नेले व जैरामचे नांवचे दत्तकपत्र माझेकडून लिहून घेतेलें व त्यास माझे नवऱ्याचे दत्तक ह्मणून तुह्मी लबाडीनें वारस करून कागद रजिस्टर केला लिहिला. ही तुमची लबाडी आज ३।४ दिवस झाले मला माहित झाली आहे. करितां या नोटीशीनें कळवितें कीं मी जैराम यांस दत्तक घेतले नाहीं व कोणताही विधी केला नाहीं. माझी जिनगी खाण्याकरितां तुह्मी व नामदेव पाटील व तान्या चांभार वगैरे लबाड लोक मिळून फंद फितूर करीत आहां. जर तुह्मी माझे घरी याल अगर शेतात वगैरे याल तर मी तुमचेवर व तुह्मास सामील असलेले इसमावर फौजदारींत प्रकर्ण चालवीन. माझे नवऱ्याचे लोकांकडेस घेणे आहे ते तुह्मी वसूल करूं नये. केल्यास फौजदारीस पात्र व्हाल. तुह्मी दहिहांडे येथे जो कागद रजिष्टर केला आहे तो रद्द व बातल आहे ता. १-६-१६ सही

जनी मर्द रावजी चांभार

रा. केळीवेळी ता. आकोट

नी. हातची बांगडी.

नो. नं. २०३

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडस-माचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख १२ माहे जून सन १९१६ इ० [ अंक २३

# नोटिस.

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, आकोला जिल्ह्यांतील सोबतच्या यादींत दर्शविलेले जिल्हा बोर्डाचे रस्ते, स्प्रिंगचे (कमानीचे) टांगे, किंवा गाड्या आणि ज्यांना चार बैला शिवाय जास्त बैल ओढण्यास लागत नाहींत, अशा सर्व साधारण गाड्या, या खेरीज दुसऱ्या कोणत्याही कामाकरीतां उपयोगात आणावयाचे नाहींत.

सोबत जोडलेल्या नमुन्यांत, आणि खालीं दिलेल्या नियमानुसार असलेला लेखी करारनामा जिल्हा बोर्डाचे चेअरमन, किंवा व्हाईस चेअरमन, यांनीं मंजूर केल्याशिवाय, साधारण गाड्यांतून किंवा, दोन जोड्यापेक्षा जास्त बैल ओढण्यास न लागणाऱ्या गाड्यातुन, नेलीं जाणार नाहींत, अशीं जड यंत्रें, किंवा शेतकीस लागणारि अवजारे, असल्या रस्त्यावरून जाणार नाहींत. स्थानिक सरकारच्या मंजुरातीनें एखाद्या विविक्षीत रस्त्यानें यांत्रिक सामान नेण्याची हमी घेतली असेल, अशा वेळीं, प्रत्येक रस्त्याची किंवा यंत्राची, वस्तुस्थिती पाहून, योग्य अशा फरका निशी, खालीं दर्शविलेल्या नियमा प्रमाणें एक परवाना, स्थानिक सरकारा कडूनच मिळेल.

(२) करारनाम्या शिवाय किंवा पूर्वी सांगितलेल्या परवान्याशिवाय, अगर दुसऱ्या कोणत्यांही रीतीनें, वर निर्दिष्ट केलेल्या, करारनाम्याच्या अटी मोडून, जिल्हा बोर्डाच्या रस्त्यावरून जड यंत्र किंवा नांगर, वखर वगैरे, सारखी, रस्त्यावर खुणा पाडणारीं आणि रस्ता खराब करणारीं, दुसरीं शेतीचीं अवजारें, कोणीही मनुष्य, नेतांना, किंवा, नेण्याचा प्रयत्न करित असताना, आढळला, तर त्यानें सदर्हू रस्त्याचा अन्यायानें उपयोग केला असें समजून, कायदेशीर रीतीनें त्याजवर खटला करण्यांत येईल.

## नियम

१ ज्या वेळीं जिल्हा बोर्डाचे ताब्यांत, असलेल्या रस्त्यावरून, एकामाग एक अशा जोडलेल्या साधारण गाड्यांतून किंवा ज्यांना ४ पेक्षां जास्त बैल ओढण्यास लागत नाहींत, अशा गाड्यांतून नेतां न येण्या सारखे जर जड यंत्र किंवा अवजारे नेण्याचा विचार असेल त्या वेळीं सदर्हू यंत्र अगर अवजारे नेणारे इसमास सोबत जोडलेल्या करारनाम्याच्या नमुन्यावर सही करावी लागेल.

२ असल्या प्रकारचे ओझे नेण्यास, परवानगी मागण्याकरितां, जिल्हा बोर्डाचे चेअरमन अगर व्हाईस चेअरमन यांज कडेस, ज्या दिवशीं प्रवास सुरुं होण्याचा असेल त्या पूर्वी निदान २१ दिवस तरी अर्ज करावा. कांहीं विविक्षित प्रसंगीं चेअरमन किंवा व्हाईस चेअरमन २१ दिवसापेक्षा कमी मुदतींत केलेला अर्ज मंजूर करतील. परंतु ६ व्या नियमांत सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करण्यास पुरेसा वेळ मिळेल इतका अवकाश अर्ज दिल्यानंतर असावा. सदर्हू अर्जांत खालील मुद्यावर माहिती असावी.

(१) जो पदार्थ न्यावयाचा असेल त्याचे वजन (शक्य असेल तर रेल्वे रिसीटवरून द्यावे अगर एखादे सर्टीफिकीट द्यावे)

(२) ओझे न्यावयास उपयोगात आणावयाच्या गाडीचें वजन.

(३) वरील ओझे उचलण्या करितां एखाद्या एंजिनचा उपयेग करावयाचा असला तर त्याचें वजन.

(४) गाडीचीं व एंजिनचीं चाकें किती आहेत.

(५) गाडीच्या अगर एंजिनच्या चाकाच्या पट्याचा व्यास व रुंदी.

(६) ज्या रस्त्यानें न्यावयाचें तो रस्ता व अंतर. ज्या ठिकाणाहून न्यावयाचें व जेथें न्यावयाचे त्या ठिकाणांचीं नांवें.

(७) ओझें नेण्याची तारीख.

(८) ओझ्या बरोबर जाणाऱ्या जबाबदार गृहस्थाचें नांव व पत्ता.

(९) वळणाच्या आणि उताराच्या ठिकाणीं अपघात होऊं नये ह्या बाबतींत काय पूर्व तयारी केली आहे त्याचा तपशील.

(३) वजन व माप खालीं दर्शविलेल्या प्रमाणांत असावीं.

१ एका गाडीवर गाडीच्या वजनासुद्धां १६ टनापेक्षां जास्त ओझें असू नये.

२ चाकाचा व्यास १८ इंचां पेक्षां कमी असू नये.

३ ८ टना पेक्षां जास्त ओझें नेणाऱ्या गाड्यांच्या आखा मधील अंतर १० फुटापेक्षां कमी असू नये.

(४) जाण्याच्या गती संबंधानें आणि रात्रीं किंवा ज्या वेळीं ओझ्याच्या गाड्या नेण्यांत येतील त्या वेळीं घ्यावयाच्या खबरदारी संबंधानें खालील नियम पाळले पाहिजेत.

गाडीचा वेग दरतासास ४ मैलापेक्षां जास्त असू नये.

२ गाड्यांचा प्रवास सरासरी प्रत्येक दिवशीं १० मैलापेक्षां कमी असू नये

३ कमींत कमी अर्धा रस्ता तरी रहदारीस राहील अशा रीतीनें रस्त्याच्या एका बाजूस रात्रीचेवेळेस गाड्या ओढून ठेवाव्यात.

४ अशा बाजूस ओढलेल्या गाड्यांना रात्रीच्यावेळीं पुढें २ व मागें २ असे दिवे असावेत.

५ जिल्हा बोर्डाचे चेअरमन अगर व्हाईसचेअरमन यांची परवानगी घेतल्याशिवाय, सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत प्रवास करूं नये. व अशी परवानगी फक्त जरूरीच्या वेळींच दिली जाईल.

सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत बाजूस ओढलेल्या गाड्याजवळ चौकीदार असावा.

(५) मोडतोडीच्या वेळीं खालील सूचनाकडे लक्ष द्यावें.

मोडतोड झाल्यास २४० तासाच्याआंत रस्ता साफ करण्याबद्दल मालक जबाबदार राहील,

२ मोडतोडीची बातमी अगदीं जवळच्या डिस्ट्रिक्ट बोर्डाच्या अधिकाऱ्यास मालकाच्या एजंटानें ताबडतोब द्यावी.

३ ओझें न्यावयास सोपें जावे ह्मणून सबल किंवा दुसरीं अवजारें, ज्याच्यायोगानें रस्ता खराब होण्याचा संभव आहे अशीं उपयोगांत आणूं नयेत.

(६) सोबतच्या नमुन्याप्रमाणें करारनामा करण्यापूर्वी, चेअरमन अगर व्हाईसचेअरमन यांनीं स्वतःची खात्री करून घ्यावी कीं ज्या रस्त्यावरून ओझें न्यावयाचे असेल त रस्त्यावरील पुलास त्या ओझे नेण्यापासून कांहीं एक धक्का पोहोचणार नाहीं; आ त्यांच्यामतें जर असले पूल निरुपयोगी असले तर त्यांनीं ओझें वाहण्यास मनाई करा व तसे त्या अर्जदारास कळवावे. त्यायोगानें जे पूल सुरक्षीत आहेत किंवा नाहीं याबद कांहींच सांगितलें नाहीं अशा पूलावरून ओझें नेतांना, एंजिन किंवा दुसऱ्या कोण्या यांत्रीक अवजारास नुकसान झालें तर जिल्हाबोर्ड त्याबद्दल कोणत्याही रीतीनें जबाबद नाहीं.

जे ओझें न्यावयाचे आहे ते पूलावरून जाण्यासारखे नसल्यास, अर्जदारानें स्वतः खर्चानें बाजूला रस्ते काढावेत. ओझे नेण्याच्यावेळीं रस्त्याचा भाग अगर रस्त्याच्या ह तींल जमीन खराब केली असेल तर तो भाग अगर ती जमीन पूर्वीप्रमाणें सुधा देण्याची जबाबदारी अर्जदाराकडेच राहील.

(७) चेअरमन अगर व्हाईसचेअरमन ठरवितील ती रक्कम अर्जदारानें अमानत ठेवा पण अशी रक्कम रस्त्याच्या प्रत्येक मैलास २० रु. यापेक्षां ज्यास्त असू शकणार न करारनाम्यान्वयें रस्ता दुरुस्त करण्यास लागणारी रक्कम या ठेवीच्या रकमेंतून करून राहिलेली रक्कम, ओझे नेण्याचे काम संपल्यावर परत केली जाईल. पण रस्त्य किंवा रस्त्यासंबंधीच असलेल्या दुसऱ्या कामास झालेलें नुकसान भरून काढण्यास ही रक्कम अपुरी असली तर, चेअरमन अगर व्हाईसचेअरमन, यांचेकडून हुकुम येत १० दिवसाचे आंत जादा रक्कम अर्जदारास द्यावी लागेल. या बाबतींत अपील कराव असल्यास मे. डेप्युटि कमिशनर साहेब यांचेकडेस करावे. व ते जो हुकूम देतील अखेरचा समजला जाऊन पुढ अपील करू दिले जाणार नाहीं.

(८) दुसऱ्या नियमा प्रमाणें दिलेली कैफियत खोटी आहे असे जर चेअरमन अगर व चेअरमन यांना वाटेल तर, त्यानें ठेवलेल्या अमानत रकमेस त्याला मुकावे लागेल. वेळीं मे. डेप्युटिकमिशनर साहेब यांचेकडेस अपील करण्याची मुभा आहे.

सही

K. G. Damle

व्हाईस चेअरमन

जिल्हा बोर्ड आकोला

मेहरबान व्हाईसचेअरमन साहेब जिल्हा बोर्ड आकोला यांचे तर्फे सेक्रेटरी बोर्ड आकोला यासीं करारनामा लिहून दिला.

आज तारीख महिना सन

मी ———————— राहणार ————————

खालीं लिहिलेलें वजनदार सामान,

संख्या

खालीं दर्शविलेल्या गाड्या मधून

| संख्या | वजन | टायरची रुंदी | चाकाचा घेर | आंसामधील |
|---|---|---|---|---|
| | | | | |

खालीं दिलेल्या जिल्हा बोर्डाच्या ताब्यांतील रस्त्यावरून वाहून नेण्याची

ळाली आहे.

| रस्त्याचें नांव | मैल पासून | पर्यंत. |
|---|---|---|
| | | |

सबब ह्या करारनाम्या सोबत जोडलेल्या नियमा बरहुकूम वागण्याचे ह्या लेखानें कबूल करितो व मी रुपये अमानत ठेवीत आहे त्या मधुन मजकडे निघ री योग्य ती रक्कम मे. व्हाईस चेअरमन जिल्हा बोर्ड यांनीं वसूल करून घ्यावी. वसूल ावयाची रक्कम अमानत रकमेपेक्षां जास्त निघाल्यास सदहू रक्कम मला त्याबद्दल नोटिस ळाल्यापासून दहा दिवसाचे आंत मी भरणा करून देण्यास तयार आहे.

ज्या रस्त्यानें मला माल नेण्याची परवानगी मिळाली आहे त्या रस्त्यावरील, खालीं ल्ले शिवाय करून, इतर पूल, मोऱ्या, फरशा, वगैरे योग्य तेवढें मजबूत वगैरे नस- ामुळें जर माझें कांहीं नुकसान झालें तर त्या बद्दलची जबाबदारी जिल्हा बोर्ड आकोला चेवर न टाकितां तें मी जातीनें सोसण्यास तयार आहे. जो माल नेण्याची मला वानगी मिळाली आहे तो माल वाहून नेण्याकारितां सुरक्षित नसलेले असे जे कांहीं वगैरे मे. व्हाईस चेअरमन यांनीं खालीं दिले आहेत त्याचा उपयोग न करण्याचें कबूल करितो.

| मैल. | फर्लांग | कामाचें वर्णन | |
|---|---|---|---|
| | | | |

ह्या करारनाम्याप्रमाणें जी रक्कम द्यावयाची ती रक्कम जर दिली नाहीं तर ती क्म सी. पी. ल्यांड रेव्हिन्यु आक्टाप्रमाणें ऐन काळीच्या वसूला प्रमाणें वसूल केली जाईल.

तारीख सही ——— अर्जदार

तारीख ——— साक्षीदार

तारीख ——— साक्षीदार

सही व्हाईस चेअरमन जिल्हा बोर्ड आकोला.

### जिल्हा बोर्डाच्या ताब्यांतील रस्त्यांची यादी.

#### पहिल्या वर्गातील रस्ते

| | | मैल | | फर्लांग |
|---|---|---|---|---|
| १ | पारस बाळापूर रस्ता | ६ | | ० |
| २ | आकोला शिवनी रस्ता | २ | | ६॥ |
| ३ | सांगवी ब्रँाच रोड | १ | | ० |
| ४ | वासीम कोंडाळा रस्ता | ० | | ६ |
| ५ | पुसद अप्रोच रोड | १ | | ५ |
| ६ | आकोला मलकापूर रस्ता | २ | | २॥ |
| ७ | आकोला महान रस्ता | १८ | | २॥ |
| ८ | आकोला रेल्वे स्टेशन रस्ता | ० | | १ |
| ९ | मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन पासून ते गांवापावेतों रस्ता | ० | | ७॥ |
| १० | मुर्तिजापूर रेल्वे स्टेशन पासून ते काटनमार्केटच्या दक्षिणे कडचा रस्ता | ० | | ३॥। |
| ११ | कुरम रेल्वे स्टेशन पासून ते कुरम गांवापर्यंतचा रस्ता | ३ | | ० |
| १२ | काटेपूर्णा कुरणखेड रस्ता | १ | | ३॥ |
| १३ | अनसिंग ब्रँाच रोड | १ | १/४४ | ० |
| १४ | आकोला गुडदी रस्ता | २ | | २॥ |
| १५ | माना रेल्वे स्टेशन ते माना गांवापावेतों रस्ता | ० | | ६॥ |

#### दुसरा वर्ग.

| | | मैल | | फर्लांग |
|---|---|---|---|---|
| १६ | वाशीम आसोला रस्ता | १ | | २॥ |
| १७ | बोरगांव गांवापासून ते स्टेशन पावेतों रस्ता | २ | | ० |
| १८ | पारस रेल्वे स्टेशन पासून गांवात जाणारा रस्ता | ० | | ७ |
| १९ | आकोला ड्राईव्ह रोड | २ | | ० |
| २० | कापसी रामंदा रस्ता | २ | २५/२६४ | ० |
| २१ | गायगांव निमकर्दा रस्ता | २॥ | | ० |
| २२ | वाशीम रिसोड रस्ता | १२ | | ० |

नो. नं. १८० व्हाईस चेअरमन डि. बोर्ड आकोला


# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व बाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४


## नोटीस

नोटिस वेशमी नंतु मारवाडी दुकान पिंपळगांव इजारा प्रगणे माहूर ता० पुसद जि. यवतमाळ

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे कडून माझा नवरा नामें संभाजी वा॥ इराप्पा मुलंगे तांबोळी यांचे हातचे रुपये ४००० चारहजार व व्याज येणें आहे. ते रुपये आम्ही तुम्हास मागणी केली परंतु दिलें नाहींत. करितां या नोटिशीनें कळविले जाते कीं, ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे रुपये आणून द्यावेत आणि माझे आंगठ्याची पावती घ्यावी. तसें न कराल तर रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. व नोटिशीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल. अगर पूर्वींप्रमाणें हिशेब रुजू करावा. माझे माघारें तुम्ही दुसरे कोणास वसूल द्याल तर तो वसूल मी कबूल करणार नाहीं. करितां तुम्हास कळविलें आहे तरी रुपये द्यावेत व पावती घ्यावी. कळावें. ता. २१-५-१६ दस्तुर शंकर आत्माराम लीगदे

सही

निशानी बांगडी भिमा मर्द संभाजी मुलंगे तांबोळी हातची खुद रा० पिंपळगांव इजारा ता. पुसद जि. यवतमाळ

नो० नं० २०६

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, मौजे पिंपळगांव इजारा प्रगणे माहूर ता. पुसद जि. यवतमाळ येथें स्थावर घरें व जंगम इस्टेट जनावरें व मालटाल व वडद येथें शेतें ७ व विडूळ येथें ही घरें व शेत आहे. ही सर्व इस्टेट माझे नवऱ्यानीं स्वतः कमावली असून त्या इस्टेटीस माझे शिवाय दुसरा कोणी हक्कदार नाहीं कारण ती सर्व माझे नवऱ्यानींच स्वकष्टानें मिळविली आहे. तो मयत होऊन सहा महिने झाले करितां मीच वारस आहे. मी कांहीं दिवस आपले पुतण्यास जवळ धरले होते. परंतु लोकांचे फुसलावण्यानें तो बिघडला आहे. करितां त्याच्याशीं कोणी देवघेव करूं नये. केल्यास मी किंवा माझी इस्टेट जबाबदार नाहीं. करितां राजाराम गणु याशीं कोणत्याच प्रकारची देवघेव करूं नये. या इस्टेटीवर त्याचा मुळींच हक्क नाहीं. कळावें. ता. २१-५-१६इ. दस्तुर शंकर आत्माराम लिगदे

सही

नि॥ बांगडी भिमा मर्द संभाजी इचे हातची खुद रा. पिंपळगांव प्र० माहूर तालुका पुसद जिल्हा यवतमाळ

नो० नं० २०७

## पत्रव्यवहार.

### डिप्रेस्ड क्लासेस मिशन.

#### ( मध्यप्रांत व वऱ्हाड शाखा. )

१९१५ सालच्या रिपोर्टाचा सारांश कीं ही शाखा १९१३ सालीं नागपुरांत उघडली. या भागांत मांग लोक फारच थोडे असून महारांची संख्या फार मोठी आहे. महार लोकांची सांपत्तिक स्थिति बरी आहे. पुष्कळ लोक फळांचा व कापडाचा व्यापार करितात. शेतकी करणारे ही पुष्कळ लोक आहेत. कांहीं महारांची मोठी सावकारी चालते. मुरळ्या सोडण्याची चाल या लोकांत नाहीं. तथापी शिक्षण विषयक व नैतीक बाबतींत यांची स्थिती महाराष्ट्रांतील महारांसारखीच आहे. इतर भागांतील महारांच्या पोटजाती पेक्षां या भागांतील महारांच्या पोटजाती जास्त आहेत परस्परांत जेवण खाणही होत नाहीं. या लोकांकरितां ख्रिस्ती मिशनरी लोकांनीं प्रत्येक मोठ्या गांवांत शाळा उघडल्या आहेत. अमरावती जिल्ह्यांत या लोकांना बाटविण्यांत रोमन कॅथलिक मिशनरींना बरेंच यश आलें आहे. नागपूर म्युनसिपालटीच्या प्राथमिक शाळांमध्यें महाराचा एकही मुलगा नसून तीं सर्व मुलें मिशनरींच्या शाळामध्यें जातात. औषधोपचारासंबंधींही या लोकांविषयीं बरीच हयगय होते. बहुतेक लोक योग्य औषधोपचारावांचून मरतात. ही शाखा निघण्यापूर्वी नागपूरच्या इंग्रजी शाळांत महारांच्या मुलांस मनाई असे. पण आतां सर्वच हायस्कूलांत हीं मुलें घेतलीं जातात. हिस्लाप कॉलेज मध्यें एक मुलगा शिकत आहे इंग्रजी शाळांत महार लोकांची संख्या वाढत आहे. या भागांत सरकारी किंवा सार्वजनिक उद्योग शिक्षणाच्या चांगल्या संस्था नसल्यामुळें या लोकांना उद्योगशिक्षण मिळत नाहीं.

या शाखेकडून, बोर्डिंग हाऊस, दिवसाची शाळा, रात्रीच्या शाळा, दवाखाना, भजनसमाज. बायकांचा वर्ग व वाचनालय इतक्या संस्थां चालल्या आहेत. बाहेर गांवच्या मुलांना स्कॉलरशिपाही देण्यांत येतात. या शिवाय अमरावतीस तेथील स्थानिक कमिटीनें चालविलेल्या दोन शाळा आहेत. अमरावतीचे रा. गणेश अक्काजी गवई नावांचे महार गृहस्थ बहिष्कृत भारत नांवाचें वर्तमानपत्र चालवितात. वऱ्हाडांत प्रत्येक वर्षी महार परिषद भरते. आकोल्यास जानोजी नांवाच्या महार गृहस्थानें स्वतःच्या खर्चानें एक फ्री बोर्डींगहाउस चालविलें आहे. यवतमाळास रा. ब. मुंडल्यांनीं एक रात्रीची शाळा चालविली आहे. या भागांतील ५ मुलें मॅट्रिकच्या

परीक्षेस बसलीं आहेत. या शाखेचें काम मिशनचे जुने वर्कर मि. सैयद यांच्या कडे आहे.

---

वऱ्हाडसमाचार

मिति जेष्ठ शुद्ध ११ शके १८३८

## सुपरिणामगर्भ मागणी.

सरकारच्या हाताखालीं त्यांच्या नोकरां-करितां अनेक पायऱ्यांच्या अनेक जागा आहेत. वर्गवारीनें त्यांचीं निरनिराळीं खातीं ही झालीं आहेत. परंतु ज्या ज्या खात्यांचा लोकहिताशीं प्रत्यक्ष संबंध येतो तेवढ्याच खात्यांच्या सुधारणेबद्दल लोकांची अतिनम्र मागणी असते. सरकार प्रायः अशा मागण्याकडे दुर्लक्षही करीत नसते. दोन्हीही पक्षांच्या मुक्कामावर उभे राहून पहाणी केली असतां लोकांचें ह्मणणेंही न्याय्य दिसतें व सरकारचें अलक्षही रास्तच वाटतें. ह्मणून या फार दिवसाच्या वादाचा निरनिराळ्या स्थानिक सरकारांनीं निरनिराळ्या रितीनें निकालही लावला आहे. रेल्वे कारभाराबद्दल तक्रारी करावयाच्या ह्मणजे अर्थातच गार्ड व टिकेट कलेक्टर आणि गाडींत कोंबून खेचून भरणाऱ्या अंमलदारांच्या वर्तनाबद्दल तक्रार करण्याचा प्रसंग येतो. म्युनिसिपाल कारभाराबद्दल टीका करावयाची झाल्यास सार्वजनीक हिताहिताचे प्रश्न तडीस लावण्याचा ज्यांच्या हातीं अधिकार असेल त्यांचे वर्तनावर टीका करण्याचा प्रसंग येतो. सिमला अगर स्थानिक सरकारांच्या सेक्रेटरी आफीसमध्यें कोणत्या लायक अगर नालायक गृहस्थाला बढती मिळाली अगर कोणाच्या हक्काकडे दुर्लक्ष झालें या बद्दल रयतेनें फारसे ओरड केलेली ऐकूं येत नाहीं परंतु न्यायखातें आणि अंमलबजावणी खातें या दोन खात्याबद्दल रयतेस रात्रंदिवस चिंता असते. ती या दोन्ही खात्यांतही माणसांच्या खासगी वर्तनाबद्दल अगर योगक्षेमाबद्दल अगर त्यांस मिळणाऱ्या कमजास्त प्रशंसा अगर बढतीबद्दल नसते. तर त्यापासून मनुष्यदृष्टीनें शक्य तितका न्याय मिळावा इतक्या पुरतीच असते. न्यायखात्यांत एकवार अन्याय झाला तरी तो लोकांस दुःसह आणि हानीकारक वाटत नाहीं. कारण न्यायखात्यांत मिळणारा न्याय नेहमीं बिनचूक कायद्याच्या अगर एकवार निकाल लागलेल्या अभिप्रायावर अवलंबून असतो. दुसऱ्यानें निकाल लावून घेण्याचा पराभूत पक्षांना अधिकार असतो.

परंतु अंमलबजावणी खात्यास कायद्याचा प्रतिबंध फारच कमी असतो. प्रायः प्रत्येक मुकदम्यामध्यें नवीन नवीन भानगडी असतात. प्रत्येक मुकदम्यामध्यें दोनपक्षांचे परस्पर हक्क मिश्रित असतातच. आणि त्या शिवाय सरकारची शासन पद्धती, सरकारचें राज्यधोरण हीं ही मिश्रित झालेलीं असतात. ह्मणून बरेच प्रसंगीं सरकारच एकपक्ष व त्याच सरकाराजवळ दाद मागणारा दुसरा पक्ष अशी वस्तुस्थिती वारंवार आढळून येते. सरकारचा अंमल बजावणीचीं धोरणें व्यक्ति वैचित्र्यानें भिन्न भिन्न रितीनें प्रतिबिंबित झालेलीं दिसतात हें ही उघडच आहे. सरकारच्या अमल बजावणीचीं दोन अंगें आहेत. एक पोलीस आणि दुसरें सरकारचेच मुल्की व फौजदारी न्याय देणारे अधिकारी.

सरकारच्या न्यायखात्यांत आणि पोलीस खात्यांत सद्वर्तनाचेच लोक यावेत ह्मणून व सरकारनें लायक माणसांची भरती व्हावी याच उद्देशानें L. L. B. पास झालेल्या इसमा शिवाय न्यायखात्यांत लोक घ्यावयाचे नाहींत आणि सागर ट्रेनिंग क्लासांतून पास झालेल्या लोकांशिवाय होतां होईल तो गुन्ह्यांचा तपास लावण्याच्या कामीं लोकांस नेमावयाचें नाहीं असा सरकारनें ठराव ही केला आहे. या सरकारच्या धोरणाबद्दल रयत सरकारास जितका धन्यवाद देईल, तितका थोडाच होईल. पोलीस खात्याच्या सुधारणेमुळे **नश्यद्धेत् पोलीस अधिकारिणे** ही धास्ती बरीच कमी होत चालली आहे. आणि पोलीस अंमलदार व रयत यांमध्यें खासगी मित्रभाव ही बराच दिसून येऊं लागला आहे. या पुढें ज्यांस सरकारतर्फे फौजदारी गुन्हे कोर्टांत चालवावे लागतात, अशा कोर्ट प्रॉसिक्यूटरांचा स्वतंत्र वर्ग काढून ज्या प्रमाणें गुन्हे शोधण्यासाठीं सागर येथें लोक तयार होतात, त्या प्रमाणें प्रॉसिक्यूटर्स लोक टाट आणि गुन्हा यांमधील फरक जाणणारे. सार्वजनीक हक्क आणि व्यक्तिशः हक्क यांतील फरक जाणणारे, पीनल कोडमधील भाग १४ भाग १५ भाग १६ आणि विशेषतः भाग १७ खालीं येणाऱ्या गुन्ह्यांत कसकसा सूक्ष्म भेद आहे व त्या भेदांमुळें रयतेस कसकसे हक्क मिळतात यांचें आकलन करण्याचें ज्यांस सामर्थ्य असेल, व जे अशा ज्ञानांत परंगत झालेले आहेत, अशाबद्दल विश्वासजनक पुरावा देतील, अशाच वर्गांतील लोकांस पोलीस खातें नवीन प्रॉसिक्यूटर वर्गांत भरती करीत जाईल तर लोकांच्या बऱ्याच कुरकुरी कायमच्या मिटतील. गुन्ह्यांचा तपास लावण्याची पोटशाखा आणि गुन्ह्यांबद्दल कोर्टांतून शासन देवविणारी पोटशाखा कायमच्या विभागून टाकून उत्तर निर्दिष्ट पोटशाखेंत इतर इलाख्या प्रमाणें L. B. झालेल्या लोकांची भरती करीत गेल्यानें रयतेस सुख होईल, रयत निर्धास्त होईल आणि पोलीस खात्यावर रयतेचा कमी कमी होत जाणारा अविश्वास समूळ नाहींसा होईल. रयतेची ही इच्छा अगदीं नैसर्गीक आहे, परंतु ती तृप्त करणें मात्र प्रबल सरकारपक्षाकडे आहे. आतां सरकारच्या दुसऱ्यां अंगाकडे ह्मणजे सरकारच्या मुल्की व फौजदारी न्याय देणाऱ्या अधिकाऱ्याच्या वर्गवारींत लोकांस कां चिंता असते व त्या चिंतेंत किती भाव मिश्रित झालेले असतात ह्याची कल्पना प्रत्यक्ष ज्या पक्षकारास सरकाराकडे दाद मागण्यासाठीं जावें लागतें, त्या पक्षकारा शिवाय इतरांस त्याच्या चिंतेचें, धास्तीचें अगर व्याधीचें मूर्तिमंत चित्र रेखाटतां येणें शक्य नाहीं. पक्षकार सुशीक्षित नाहींत. त्यांच्या समजुती वेडगळ असतात. पैसे देवून वकील लोकांच्या शिव्या त्यांमुळें खाव्या लागतात. आणि इतकें करूनही आपला पक्ष खरा आहे किंवा नाहीं याची बरोबर मिमांसा होऊन न्याय मिळेल किंवा नाहीं याबद्दल नेहमी संशयचा संशय कायमच असतो. हिंदुस्थानांतील पुराव्याच्या कायद्यांतील ५-६-७ आणि विशेषतः ११ हीं कलमें इतकीं व्यापक आहेत कीं पक्षकारास आपलें ह्मणणें समर्थन करण्यासाठीं वाटेल ती गोष्ट कोर्टापुढें मांडतां येते. परंतु हीं कलमें किंवा पीनलकोडांतील वर निर्दिष्ट केलेल्या भागांतील कलमांमधील फरक अगर पीनल कोडांतील साबे ९५ वें कलम किंवा क्रिमिनल प्रोसिजर कोड मधील २०१-२०५-१०७-१४५ वगैरे कलमांचा यथार्थतः उपयोग करणारे देखील एका लेखणीच्या फटकाऱ्यानें निर्माण होणारे अधिकारी लोकांस न्याय देऊं लागतील, तर लोकांस आपल्या हक्कांबद्दल आणि जीवित किंवा धनार्जन स्वातंत्र्याबद्दल नेहमीं संशय कां वाटूं नये बरें? मुल्कीचा कायदा कोठें सुरू होतो आणि त्याचा व्यापार कोठें बंद होतो, फौजदारी कायदा कोठें सुरू होतो व त्याची मर्यादा कोठें नाहींशी होते, आणि त्याचप्रमाणें दिवाणी कायदे कोणत्या क्षेत्रांत धाव घेत असतात या सहाही रेषा अती अस्पष्ट आणि संमिश्र असून चांगल्या चांगल्या कायदेशास्त्र पंडितांना देखील या कळत नाहींत. या मुळें दर एका जिल्ह्यांत निरनिराळीच पद्धत आणि शिस्त जिल्ह्याधिकाऱ्याच्या अधिकार काळांतन आणि अनिश्चित आढळून येतात. परंतु पद्धत आणि शिस्तीबद्दल हा विचार नाहीं रयतेच्या मानसीक स्वास्थ्याबद्दल हा विचार आहे. आपणास प्रिय असणाऱ्या माणसास अगर ज्याची कामगिरी आपणास पसंत पडते अशा माणसास लागेल तें पारितोषक देण्याचा प्रबल दात्यास अधिकार आहे. परंतु ज्या मनुष्याच्या हातीं रयतेस न्याय देण्याचें काम असेल, अशा मनुष्याची नोकरींत भरती करतांना व्हावी तितकी परीक्षा होत नाहीं. एखाद्यास नोकरी द्यावयाची नसली तर त्यास तूं B. A. नाहींस व नोकरी मागणारा B. A. असेल तर तूं M. A. नाहींस. M. A. असल्यास तूं L. L. B. नाहींस. असें ज्यांच्या हातांत नोकऱ्या देण्याचे आहे ते लोक सांगतात हें खरें आहे. परंतु मुलकी खात्यांत दरसाल भरती होणाऱ्या नायब तहासिल्दारांपैकीं क्वचितच B. A. अगर M. A. अगर L. L. B. असतात. कांहीं बुद्धिवान् लोक चार पांच इयत्ता पर्यंत शिकलेले असून ही L. L. B. पेक्षांही अधिक विचारवंत आणि ज्या कामावर त्यांस नेमलें असेल तें काम न्यायबुद्धीनें करणारे सापडतील. परंतु प्रथमतः भरती करतांना २५ वर्षाच्या हद्दी खालील असणाऱ्या लोकांत लायकी आहे असें मानावें तरी कसें? ह्मणजे शिफारसतत्व किंवा प्रियपात्रोपकारतत्व किंवा दैवतत्व या तत्वांवर मनुष्यांची निवड होते आणि तो नालायक असेल तर ज्या-वळणानें त्यानें नोकरी पटकावली असेल, तेंच वळण त्यास आनोकरीपर्यंत गिरवावें लागतें त्याचे संबंधानें ठीक झालें; पण दरम्यान ज्या लोकांचा दुर्दैवानें त्याच्याबरोबर संबंध पडतो त्या लोकांना कोणत्या विवंचनेंत दिवस कंठावे लागतात याची कल्पना होणें अशक्य आहे. न्याय देणारा गृहस्थ अन्य असेल तर आपलें पूर्ववळण गिरवील इतकेंच नाहींतर प्रथमतः तो ज्या जातीचा असेल त्या जातीवर ज्या प्रकारचा वारा वहात असेल, त्या वाऱ्यानें थंडगार राहण्याचा यत्न करील. जो ज्या जागेवर योग्य नाहीं तो ती जागा स्वार्था करितां पटकावीत असतो. जिकडून स्वार्थ साधेल अशी संधी साधीत असतो. गांवांत मालगुजार आणि रयत यांत वैमनस्यें पाडतो. संभावित व श्रीमान मनुष्यावर फौजदारी किटाळें आणण्याच्या उद्योगांत रहातो. केवळ लोक आपल्या अरेरावीस दबत नाहींत व वर दाद मागतात ह्मणून त्यांस केव्हां पालथे पाडतां येईल या विवंचनेंत असतो. खालीं दडपावें व वर नम्र असावें ह्मणजे आपला स्वार्थ चांगला साधतो हें त्यांस पुर्णपणें माहीत असतें. आणि त्यांत कां त्यांस जातीचे बळ मिळेल, तर मग प्रजेच्या कष्टास पारावारच नाहीं. मग तो अनियामित किंवा मत्त निरंकुश वारणच समजावा. सिंह अगर सिंहळाच भेटेपर्यंत त्याच्या सर्व कृती कुटारी तेथ्या पासून तो हजारो रुपयांच्या इमारतीवर नांगर फिरवीपर्यंत त्यास अमर्याद स्वैराचार करिता येतो. कोणाच्या पदव्या काढून घेववणें, कोणाचे बगीचे कापवणें, कोणाचीं हत्याराचीं लायसन्सें जप्त करणें या गोष्टी त्यांस करतलामलकवत असतात. सारांश ज्यालोकांस सरकार दरबारांत कोणत्याना कोणत्या कमासाठीं जावें लागतें त्या लोकांस ईश्वर करो आणि न्यायप्रिय, सच्छील व विद्वान अधिकाऱ्यांशीं संबंध पडो अशीच परमेश्वरा जवळ करुणा भाकावी लागते. ही विवंचना टळण्याचा मार्ग फार सोपा आहे; पण तो सरकारचे हातीं आहे. हल्लींचें सरकारी वातावरण अशा गोष्टीस आळा घालण्यास फार योग्य आहे. सरकारनें L. L. B. वांचून कोणासही नायबतहासिल्दार नेमावयाचे नाहीं इतकें ठरवून मुल्की खात्यांतील अधिकारीवर्गाच्या जागा यापुढें भरावयाच्या असें ठरविलें तर रयतेवर अनंत उपकार केले असें होईल.

तपास लावणाऱ्या पोलीस ऑफिसरांचे आणि न्याय खात्यांतील कांहीं मॅजिस्ट्रेटांचे (मेथकूट) असल्यावर संभावित लोकांस कां व कशीं संकटें भोगावीं लागतात व या संबंधानें परस्पर वक्रीभवन कसें होत असतें हें पुढें एखादे वेळीं लिहूं.

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत महायुद्धाला विशेष महत्वाचें स्वरूप प्राप्त झालें. ता[illegible] मे रोजी नहलंडशाशीं जर्मनीशीं अ[illegible]

होऊन जर्मन आरमाराला पळून जावें लागलें. या युद्धाची साग्र हकीकत मोठी मनोरंजक व मोठी महत्वाची असली पाहिजे. सध्यां तारेनें आलेली बातमी अगदींच त्रोटक आहे. तींत दोन्ही पक्षाकडे लढाऊ जहाजें, क्रूझरें, वगैरेंची संख्या किती होती वगैरे ठळक गोष्टी सुद्धां दिलेल्या नाहींत. नुसती ब्रिटिशाचीं तीन ब्याटल— क्रूझरें, दोन क्रूझरें, व सहा विनाशक बोटी यांची हानि झाली, सहांचा पत्ता नाहीं, लढाऊ जहाज वगैरे बुडविलें गेलें नाहीं; जर्मनीची हानि मात्र जबर झाली आहे, आठ विनाशक बोटी, एक मोठें लढाऊ जहाज, एक ड्रेडनॉट, तीन ब्याटल— क्रूझरें, एक लाइट क्रूझर, एक पाणबोट, (सबमरीन) वगैरे बुडालीं व कांहीं नादुरुस्त झाली वगैरे माहिती दिली आहे. यावरून जर्मन आरमार पूर्ण तयारीनें बाहेर पडलें होतें व इंग्लंडच्या उत्तर किनाऱ्यावर रोख धरून तें चाललें असतां सदैव जागरूक असलेल्या इंग्रजी आरमारानें त्याला प्रतिबंध करून त्याची दुर्दशा करून सोडली असावी असें दिसतें. आरमाराचे बाबतींत ब्रिटिश राष्ट्रानें आपलें प्रभुत्व कायम राखिलें आहे यांत बिलकुल शंका नाहीं. त्याची शक्ति कसोटीला लावण्याचे प्रसंग जेव्हां जेव्हां जर्मनीनें आणिले, तेव्हां तेव्हां ब्रिटिशांचीच श्रेष्ठता स्थापित झालेली आहे, आणि असे प्रसंग अगदींच थोडे शत्रूकडून घडवून आणण्यांत येतात हेंच त्या श्रेष्ठतेचें उत्कृष्ट प्रमाण आहे.

## भविष्य.

लढाई संबंधाच्या भविष्यांना अंतच नाहीं म्हटलें तरी चालेल. व्हर्डुनच्या लढाईचें अखेरचेंच प्रकरण चित्रगुप्त लिहीत आहे अशी बातमी कितीवेळा तरी आली आणि खोटी ठरली! आतां तिच्यावर विश्वास ठेवण्या इतका भोळा कोणी राहिला नाहीं. तरी कांहीं गोष्टी फार सूचक असतात. मि. हेंडरसन यांनीं व्यापाऱ्यांस उद्देशून भाषण करतांना सांगितलें कीं व्हिटसन टाइडची सुट्टी जुलै अखेर देण्याचा विचार सरकारांत चालला आहे. यावरून कित्येक असें अनुमान काढीत आहेत कीं या पांच चार आठवड्यांतच लढाइचा सोक्षमोक्ष खास होणार अशी प्रधानमंडळाची खात्री असली पाहिजे. जर्मन केसरची सगळी मदार आतां व्हर्डुनच्या लढाईच्या निकालावर आहे. तींत हरल्यास तो तहाचें बोलणें लावील असा कित्येकांचा तर्क आहे. तें कांहीं असो, पण ब्रिटिश रणक्षेत्रांत अधिक चळवळ सुरू असणें, सोफियाची मजबुती चालली आहे अशा खऱ्या खोट्या बातम्या येणें, व्हर्डुनच्या लढाईच्या निकालाकडे केसरची दृष्टी लागून राहणें वगैरे गोष्टींवरून सध्याचा काळ अतिशय महत्वाचा असून लवकरच साऱ्या जगाला थक्क करून सोडणारी अशी कांहीं तरी बातमी येईल असें दिसत आहे येवढें म्हणण्यास हरकत नाहीं.

## [ज]र्मनीची चळवळ.

डाव्या बाजूला ही चळवळ विशेष दिसत आहे. ३०४ नंबरच्या टेकडीवर जर्मनी वारंवार हल्ले करीत असून उजव्या बाजूला व्हॉ किल्ल्यावर ही शत्रूकडून आवेशानें भडीमार होत आहे. त्यांचे हल्ले परतविण्यांत आले आहेत. तथापि शत्रूचें पाऊल तेथें थोडेंसें पुढेंच आहे. सध्या विशेष दृष्टी ठेवण्यासारखें रणक्षेत्र हेंच आहे. येथें केव्हां केव्हां शत्रूला एखादा लहानसा जय मिळतो. पण बहुधा आवेशानें केलेले शत्रूचे हल्ले तितक्याच जोरानें परतविण्यांत येतात.

## इटालियन रणक्षेत्र.

फ्रेंच रणक्षेत्राचे खालोखाल महत्व या रणक्षेत्राला सध्या प्राप्त झालेलें आहे. आस्ट्रीयाचा आवेश टिकला आहे व तो जोरानें हल्ले करून पुढें सरकण्याचा यत्न करीत आहे. पोसिनावर आस्ट्रियानें कित्येक फार निकराचे हल्ले केले, पण ते सगळे इटालियनांनीं परतविले. बेल्मांटचें ठाणें शत्रूनें कितीवेळां तरी घेतलें, पण प्रत्येक वेळीं तें इटालियनांनीं परत काबीज केलें. सध्यां तें इटालियनांच्या हातांत आहे. शत्रूकडून आला, व्हेरोना, व्हिसेंझा वगैरे ठिकाणांवर वरून बांब टाकण्यांत आले. पण त्यापासून विशेष नुकसान झालें नाहीं. जशास तसें या न्यायानें इटालियनांनीं ही शत्रूच्या छावणीवर शंभर बांब टाकले, आणि शत्रूचें बरेंच नुकसान केलें अशी खबर आहे. एकंदरींत येथील स्थिती थोडीशी काळजी उत्पन्न करण्यासारखीच आहे असें आस्ट्रियन लोकांच्या प्रगतीवरून वाटण्याचा संभव आहे. पण हें ध्यानांत ठेवावें कीं शत्रू जसजसे इटालींत घुसतील, तसतशीं त्यांचीं संकटें वाढत जातील. कारण मोठाल्या जडतोफा नेण्यासारखा तो प्रदेश नसल्यामुळें वाघाच्या जाळींत सापडलेल्या हरणाप्रमाणें आस्ट्रियाची गत होण्याचा संभव आहे. आज इटालियन लोकांची थोडी पीच्छेहाट झालेली दिसते खरी; तरी पण त्यांनीं आस्ट्रियाचें येवढें मोठें सैन्य मोठ्या धैर्यानें अडवून धरलें आहे त्यामुळें दोस्त राष्ट्रांना दुसरीकडे युद्ध करण्याचें काम थोडेंसें अधिक सुलभ झालें आहे यांत शंका नाहीं.

## प्रजेचे हक्क काढून घेणारा कायदा.

थोड्या दिवसांपूर्वी इंडियन कान्सॉलिडेटिंग आक्ट मध्यें सुधारणा करण्याचे हेतूनें पार्लमेंटच्या लॉर्डससभेपुढें आलेल्या बिलांतील एका कलमाचा—ब्रिटिश अमलांतील सिव्हिल व लष्करी जागा देशी संस्थानिक व त्यांच्या प्रजा यांना देण्याबद्दलच्या कलमाचा— विचार एका लेखांत आम्हीं केला होता. या बिलांतलें आणखी एक पिलूं हळूंच बाहेर पडलें आहे. सध्या सारख्या अडचणीच्या वेळीं वादग्रस्त अशा कांहीं गोष्टी करावयाच्या नाहींत असें हिंदुस्थानच्या लोकांना सांगण्यांत येत असतें. पण खुद्द स्टेटसेक्रेटरीकडून हा नियम पाळण्यांत येत नाहीं. इतकेंच नाहीं, तर हिंदुस्थानच्या प्रजेचा एक महत्त्वाचा हक्क काढून घेणारें बिल आगाऊ कांहीं एक सूचना न देतां व लोकमत न घेतां एकदम पार्लमेंटपुढें येत आहे याबद्दल सर्व पत्रांतून हल्लीं जोराची टीका होत आहे. या नव्या बिलांतलें ८४ वें कलम असें आहे कीं त्याच्या योगानें कांहीं गोष्टीबद्दल हिंदुस्थानच्या प्रजेला स्टेटसेक्रेटरीवर कोर्टांत फिर्याद सुद्धा करतां येते. पण यापुढें ती करतां येणार नाहीं. या बिलासंबंधानें लिहितांना पायोनियर पत्रानें अशी मखलाशी केली होती कीं खुद्द इंग्लंडमध्यें राजावर फिर्याद करण्याचा हक्क प्रजेला कोठें आहे? आणि तेथें तो नाहीं, तर हिंदुस्थानांत तरी कां असावा? पण हा मुद्दा पुढें आणतांना पायोनियरसारखे पत्रकर्ते इंग्लंडची राज्यपद्धति व हिंदुस्थानची राज्यपद्धति यांच्यांतला भेद विसरतात. इंग्लंडांत राजाचे प्रधानानें केलेल्या कृत्यांबद्दल त्यांना जाब विचारण्याचा हक्क प्रजेला आहे, त्यामुळें भलतें सलतें कृत्य केल्यास आपली व इतर प्रधानांची काय गत होईल हें ओळखून त्यांना नेहमीं काम करावें लागतें. येथें तसा कांहींच प्रकार नाहीं. हिंदुस्थानच्या प्रजेचे हक्काचें संरक्षण करणें हें काम इकडे न्यायकोर्टांना करावें लागतें; आणि म्हणूनच न्यायकोर्टें इकडील कित्येक अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत सलतात. न्यायकोर्टांत फिर्याद मांडण्याचा प्रजेचा हक्कच काढून घेतला म्हणजे अधिकाऱ्यांचा अंमल अगदीं निष्कंटक होईल, त्यांना जाब पुसणार कोण आणि प्रजेची दाद घेणार कोण? अशी स्थिति होईल. म्हणून हिंदुस्थानचे लोकच नव्हेत तर बर्मा चेंबर ऑफ कॉमर्स सारख्या युरोपियन लोकांच्या संस्था सुद्धां या नव्या बिलाच्या विरुद्ध जोरानें ओरड करीत आहेत.

## लढाई नंतरची स्थिति.

लढाइ संपल्यानंतर जर्मनीचा व्यापार विलायतेंत बंद पाडण्याची जोराची खटपट विलायतेंत चालू आहे. नुसत्या विलायतेंतच नव्हे तर ब्रिटिश साम्राज्यांत कोठें ही जर्मन व्यापाराचें पाऊल शिरकूं नये आणि सगळे गिऱ्हाईक आपणांस मिळावें असा म्यांचेस्टरचा अंतःस्थ हेतु आहे युद्ध सुरू होण्यापूर्वी इंग्लंड दरसाल दहा कोट रुपयांचा माल घेत असे, आणि ६ कोटीचा त्याला देत असे. हिंदुस्थान हें इंग्लंडचें मोठें गिऱ्हाईक आहे, आणि हिंदुस्थानच्या कच्या मालाचें मोठें गिऱ्हाईक जर्मनी आहे. तेव्हां अशा गुंतागुंतींतून आपला फायदा करून घेऊन जर्मनीला आंख्न कसें करतां येईल याचा विचार सध्या चालू आहे. पण हा सामान्यदृष्टीचा विचार झाला. व्यापार व उद्योग यांच्या संबंधानें खोल विचार करणाऱ्या दूरदर्शी लोकांचें यां विचाराशीं एकमत दिसत नाहीं. ते म्हणतात का संरक्षक जकात वगैरे सारख्या उपायांनीं जर्मनीसारख्या उद्योगी, मेहनती, काटकसरीनें कारखाने चालवून स्वस्त माल विकणारा, शास्त्रीय ज्ञानांत रोज झपाट्यानें प्रगति करणारा, हरहुन्नरी देश जेरीला येईल असें समजणें हा वेडेपणा आहे. तुम्ही कितीही संरक्षक जकात ठेविली तरी तो कांहीं दिवस नुकसान सोसून मुद्दाम माल स्वस्त विकील, आणि तुमचे कारखाने बंद पाडील, यापेक्षां जर्मनीच्या पायांत जेरबंद घालण्याचा प्रयत्न न करतां स्वतःच्या कारखान्यांना उच्च स्थितीला नेऊन सोडण्याचा प्रयत्न करणें हे अधिक श्रेयस्कर आहे. हिंदुस्थानांत परदेशी मालावरच्या बहिष्काराविरुद्ध हाच मुद्दा नेहमीं पुढें करण्यांत येत असे. पण यावेळीं मात्र इंग्रजपत्रकर्ते तो अगदींच विसरलेले दिसत आहेत हें आश्चर्य आहे.

## आगरकरांची पुण्यतिथि

'सुधारक' पत्राचे उत्पादक कै० आगरकर यांची पुण्यतिथि ता० १७ जून रोजीं वास्तविक आहे, पण तो दिवस न पाळतां ता० २ जुलै रोजीं पाळण्याचें मुंबईच्या कमिटीनें ठरविलें आहे. जयंत्या किंवा पुण्यतिथि त्यांच्या खऱ्या दिवशीं न पाळतां आपल्या सोयीप्रमाणें वाटेल त्या दिवशीं पाळण्याचें ठरविण्यानें कमिटीनें आपली सुधारणेविषयींची हौसच एकाप्रकारें व्यक्त केली आहे असें म्हटलें पाहिजे. आमचे 'जुने लोक वेडे! ते श्रीराम, हनुमान, कृष्ण वगैरे थोर व्यक्तींच्या सन्मानार्थ आपल्या सर्व अडचणी बाजूला ठेवून त्यांच्या जयंतीचा खरा दिवस कधीं चुकूं देत नाहींत. स्वतःची सोय प्रथम पाहावयाची, मागाहून थोर पुरुषांविषयींच्या अंतःकरणांतल्या भावनेकडे दृष्टि द्यावयाची हें सुधारणेचें तत्व त्या बिचाऱ्यांना काय ठाऊक ! आगरकरांच्या पुण्यतिथी निमित्तानें एक सर्व ज्ञातींचें सह भोजनही व्हावयाचें आहे. आमच्या सुधारकांची जीभ असल्या भोजनासाठीं इतकी चटोर कां बनली आहे तें कळत नाहीं. सहभोजनानें बंधुप्रेम वाढत असल्यास भाऊबंदकीचे तंटे तोडण्याच्या या युक्तीचें पेटंट सुधारक मंडळीनें अवश्य घ्यावें; या सहभोजनाच्या व्यवस्थेचा सगळा भार प्रो. गोखले यांच्या भारतसेवकांनीं उचलला आहे असें दिसतें. तें खरें असल्यास 'रिकामा न्हावी भिंतीला तुंबड्या लावी, या म्हणीची सार्थकता तो करीत आहे असें म्हटलें पाहिजे. सर्वंट ऑफ इंडिया सोसायटीला दुसरें कांहीं काम करण्यासारखें नसल्यास या रिकामटेकड्या सर्वंटाना चार दिवस सक्तीची रजा दिलेली काय वाईट?

## प्रेस आक्टाचा नवा बळी.

प्रेस आक्टानें आजपर्यंत पुष्कळ देशीपत्रांचे बळी घेतले. पण त्यानें नुकताच घेतलेला मद्रास प्रांतांतला बळी कांहीं सामान्यांतला नाहीं. मिसेस आनी बिझांट यांना 'न्यू इंडिया' पत्रांतल्या लेखावरून दोन

हजार रुपयांची जामीनकी भरण्याचा आलेला प्रसंग मागच्या प्रसंगांहून निराळ्या प्रकारचा आहे. बिझांटबाई युरोपियन आहेत, सद्वेतूनें कोणती ही चळवळ हातीं घेऊन ती अत्यंत कळकळीनें आणि दाब प्रयत्नानें यशस्वी करून दाखविणाऱ्या आहेत; पण हा त्यांचा लौकिक प्रेस आक्टापासून त्यांचा बचाव करूं शकला नाहीं. मग इतर देशी पत्रकर्त्यांची गोष्ट कशाला? प्रेस आक्टापाशीं वर्णभेद नसला तरी व्यक्तिभेद नाहीं असें मात्र यावरून ह्मणतां येईल कीं नाहीं याची आह्मांस शंका आहे. कारण, न्यू इंडियांतल्या लेखापेक्षां ही सरकारला ज्यास्त चीड आणणारे व हिंदुस्थानांतले सर्व श्रेष्ठ अधिकारी जे व्हाइसराय साहेब त्यांच्या पदावर लॉर्ड हार्डिंज हे आरूढ असतां त्यांच्यासंबंधानें अत्यंत अपमानकारक लेख स्टेट्समन् पत्रांत आले असतां त्या लेखकाच्या केसाला ही धक्का लागला नाहीं. त्यावेळीं प्रेस आक्टचें सामर्थ्य कसें लुप्त झालें होतें तें कळत नाहीं. मिसेस बिझांट यांचे लेख ओजस्वी असतात, व अलिकडे स्वराज्य प्राप्तीची चळवळ त्यांनीं सुरू केल्यापासून त्यांचे संबंधानें सरकारी अधिकाऱ्यांची साशंकवृत्ति असल्याचें ही बाईंना ठाऊक होतें. त्यांनीं पाठविलेल्या तारा मध्यल्यामध्यें दाबल्या जातात अशी तक्रार त्यांनीं अनेक वेळा केली होती. त्यावरून बाईंनीं सावध राहावयास पाहिजे होतें. पण बाईंचें पूर्वचरित्र ज्यांना ठाऊक आहे त्यावरून अशा वेळीं त्या दुर्बळता दाखवून माघार घेतील अशी अपेक्षा कोणींच केली नाहीं, व त्याचा परिणाम जामीन मागणें हा झाला. जामीन भरल्यावर ही आपला क्रम सोडावयाचा नाहीं, पत्र बंद केल्यास कायद्याचा आश्रय करून कोर्टांत भांडावयाचें, वगैरे आपले पुढचे बेत बाईंनीं आगाऊ कळविले आहेत. पण इतक्या थराला गोष्ट जाऊं देण्याइतका गंभीरतेचा अभाव मद्रास सरकार दाखवील असें आह्मांस वाटत नाहीं. बाकी बिझांटबाई वरच्या सध्याच्या प्रसंगाचा परिणाम प्रेस आक्ट नाहीसा होण्यांत किंवा निदान त्यांत सौम्यता येण्यांत जर झाला तर तो हिंदुस्थानावर एक उपकारच होणार आहे यांत शंका नाहीं.

## सौ. काशीताईंची स्पष्टोक्ति.

परवाच्या नाट्य संमेलनांत अनेक विद्वान गृहस्थांचीं भाषणें झालीं. पण सौ० काशीताई कानिटकर यांनीं सध्याच्या नाटकांच्या अवनत स्थितीसंबंधानें जशी स्पष्टोक्ति केली तशी करण्याचें एकालाही धैर्य झालें नाहीं. कसें झालें तरी काशीताईंचें शुद्ध, पवित्र, निष्कलंक स्त्री अंतःकरण ! त्याला सध्याच्या नाटकांतला फाजील शृंगार, व पाचकळपणा कसा खपणार ? सौभद्रांतला कृष्ण रुक्मिणीचा प्रवेश पाहून कुलीन स्त्रियांना काय वाटतें तें सौ० काशीताईंनीं सांगितलें आहे. या वेळीं, डोळे मिटून बसावें लागतें असें त्या ह्मणतात. पण हा प्रवेश आपल्या कंपनी कडून करवितां करवितां ज्यांचा जन्म गेला तरी त्यांत सुधारणा झाली नाहीं असे गृहस्थ नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते ! सौ. काशीताईंचा विशेष कटाक्षही रा. खाडिलकरांच्या नाटकांवरच होता, आणि हीं नाटकें लिहून रंगभूमीवर आणणारे ही अध्यक्ष महाराजच होत ! तेव्हां अशा संमेलनापुढें काशीताईंचें भाषण अरण्यरोदना प्रमाणें निष्फळ झालें तर त्यांत कोणाला आश्चर्य वाटूं नये. असल्या कुमार्गांचा जोरानें निषेध करणें हें काशीताईंचें कर्तव्य होतें तें त्यांनीं केलें, इतकेंच समाधान तूर्त मानलें पाहिजे.

## मान्यान्मानय.

चांगल्या सुवर्णमय दिवसाची आठवण ठेवण्याची पद्धति ह्मणजे सत्काराला योग्य अशा माणसाचा सत्कार करणें होय. ही राजमान्य पद्धती श्रीमान् चक्रवर्ती जॉर्ज साहेब यांच्या वाढदिवसा संबंधानें नेहमीं पाळण्यांत येते. यंदाची त्यांच्या इंडियन राज्यांतील मान्यवर लोकांची यादी दरसाल या रीतीनें वाढतच असते. यंदा ता. ३ जूनच्या वाढदिवसानिमित्त नव्या सन्मान्य गृहस्थांची यादी खूप मोठी प्रसिद्ध झाली आहे. या पदवीदानामध्यें आमच्या प्रांतातून जी मंडळी आदराला पात्र ठरविण्यांत आली आहे त्यांची नामावळी येणें प्रमाणें:—

रा. रा. पदवी

डब्ल्यू. एन. मॉ डेप्युटि कमिशनर जबलपूर केप्यानिअन आय. ई

रे. डाक्टर. पिटर कलेन जबलपूर केसरे हिंद (सोनेरी)

श्री. सौ. हिराबाई (रा रुस्तुमजी फर्दुमजी डे कमिशनर रायपूर यांच्या पत्नी केसरे हिंद (रुपेरी)

हरेंद्रनाथ राय सेक्रेटरी म्युनिसीपालिटी नागपूर राय बहादुर

महादेव यशवंत डोळे एम्. ए. प्रोफेसर कॉलेज जबलपूर रावबहादूर

डाक्टर वासुदेव रामचंद्र भट एल्. अर सी. पी (रावबहादूर) उमरावती

इस्टियाक अली असि. कमिशनर छिंदवाडा खानसाहेब

शेट किसनदास भगवानदास वऱ्हाणपूर राय साहेब

रघुवीरप्रसाद द्विवेदी बी. ए. हेडमास्तर जबलपूर हायस्कूल राय साहेब

दत्तात्रय विठ्ठल सरंजामे ए. अ. कमिशनर उमरावती रावसाहेब

वरील सद्गृहस्थांचे गुण वर्णन करून अभिनंदन करावें; पण कधीं कधीं मुख्या प्रशंसेनेंच त्या त्या पदवीचें स्वारस्य अधीक खुलतें ह्मणून वाचकांच्या आवडीचा आदर या बाबतींत आह्मी करीत आहों

## सिंह बुडाला.

ईजिप्तचे सिंह ह्मणजे लॉर्ड किचनर हे युध्दाच्या खलबतांत ब्रिटिश राष्ट्राचे उजवा हात होते. रशियाशीं खलबत करण्याकरितां हे लढाऊ आगबोटींतून जात असतांना त्यांच्या आगबोटीला शत्रूचा पाणतीर लागला आणि हां हां ह्मणतां सर्व लवाजम्यानिशीं ती आगबोट थोड्या मिनीटांत समुद्राच्या तळास गेली. ही गोष्ट आरमारी युध्दाच्या जयाच्या प्रारंभींच आर्किनीज बेटाजवळ घडली. लढाई ही बुद्धिबळाच्या खेळासारखी आहे. प्यादीमात होण्यापूर्वी राष्ट्राला कितीतरी मोहरे बळी द्यावे लागतात हें सांप्रतच्या युद्धामध्यें ठळकपणें कळून येतें. खारटुमचे लार्ड किचनर हे या महायुद्धाची गोड अखेरी पाहण्यास राहिले नाहींत; पण त्यांचा तो मृत्यू ह्मणजे व्यक्तिशः कर्तव्यनिष्ठेंत पावन होण्याचा अमृतसिद्धि योगच होय. या महायुद्धांत लॉर्ड किचनर यांनीं जी अवर्णनीय प्रेरणा लॉर्ड राबर्ट्स् यांच्या मागून आपल्या देशांत विजेसारखी जागृत ठेविली, तिचेंच सुफळ हें होय कीं राष्ट्राच्या यशःकायेला परिपुष्टी आणणारी युध्दविशारद मंडळी यावेळीं एकसारखी चमकत आहेत. कायदेपंडित व मुख्य मंत्री राजश्री अस्क्विथ हे लॉर्ड किचनर यांच्या मार्गे युद्ध मंत्री झाले आहेत हें पाहून कितीतरी लोकांस प्रसंगोपात विलक्षण गोष्टी करून दाखविण्याची स्फूर्ति येईल. या महायुद्धांत सर्वपरीनें हिंदी राष्ट्राला हातभार लावतां येत नाहीं इतकेंच नाहीं तर लॉर्ड किचनर यांची जागा अशा समयीं आमच्या राष्ट्रांतील अमुक अमुक मोहऱ्यांनीं भरून काढा असें सरकारास ह्मणण्याची देखील सध्या साध्य गोष्ट नाहीं. आमच्या राष्ट्रसंबंधाची लष्करी पद्धती चुकली आहे ही गोष्ट लॉर्ड राबर्ट्स् व लॉर्ड किचनर यांचे मृत्यू निदर्शनास आणीत आहेत. आह्मी जर बावनकशी ब्रिटिश असूं आणि भूगोलदृष्टीचे भेदाभेद कालांतरानें लयास जातील, तर आह्मांस उमेद आहे कीं लॉर्ड किचनर सारखे युध्दमंत्री आमच्या साम्राज्याला हिंदी राष्ट्रांतून लाभल्याशिवाय राहणार नाहींत. कै. लॉर्ड राबर्ट्स् किंवा लॉर्ड किचनर यांना जगाला हलवून सोडणारी शक्ति येण्यापूर्वी त्यांची कार्यभूमी इंडियाच होती ही गोष्ट आह्मी मोठ्या अभिमानानें सांगत आहें. आजच्या मितीला ब्रिटिश राष्ट्राचा सिंह गेला खरा; पण ईश्वर करो त्या सिंहाच्याच प्रेरणेनें दुसरे सिंह राष्ट्राला लाभोत आणि जर्मनीला बेलज्यम सारख्या अल्पस्वल्प राष्ट्राचें स्वातंत्र्य हिरावून घेणें ह्मणजे ईश्वराच्या घरीं केवढें पाप होतें हें लवकरच कळो.

## स्वराज्याची मोहीम.

### (अहमदनगर येथील राजश्री टिळक यांचा कृष्णार्जुन संवाद)

अहमद नगर जिल्ह्याची प्रांतिक परिषद या महिन्याच्या प्रारंभाला नुकतीच भरली होती त्यावेळीं रा. बाळ गंगाधर टिळक यांनींहि दोन व्याख्यानें दिलीं. लोकांचा समुदाय व उत्साह फार वर्णनीय होते. भगीरथाला गंगेचा अवतार करविण्याला जी तपश्चर्या करावी लागली, तशींच तप राजश्री टिळका सारखे भगीरथ स्वराज्याच्या गंगेसाठीं करीत आहेत. राजकीय योगशास्त्र हे त्यांच्या आयुष्याचें मुख्य गीत होय. आणि लोक समुहाला या योगशास्त्रांत प्रवीण करण्यासाठीं गीतेंतल्या कृष्णार्जुन संवादा प्रमाणें त्यांचीं हीं व्याख्यानें उपयुक्त होत असतात, असा अनुभव येत चालला आहे. इंदुप्रकाशकारासारख्यांनीं त्यांच्या दोषाकडे आपलें अस्त्र फेकलें आहे आणि राजकीय सुधारणा पूर्वी किंवा सामाजिक सुधारणा पूर्वी अशीं कोष्टकें त्यांनीं मांडलीं आहेत. जो लोकमत शिकविण्याचें काम करतो, त्याचे हातपाय अशानें लंगडे होत नसतात. मनुष्य मूर्तीच सर्वच कार्यें दोषमूल असतात अशा दृष्टीनें देखील सर्वांनीं प्रयत्नशील असावें. आणि निदान प्रस्तुतची कार्यवेळा तरी शुद्ध दूषणांनीं परस्परांच्या छळांत न जाईल तर बरें. नगरच्या संभाषणाचा मुख्य विचार असा कीं आमचीं राष्ट्रीय कार्यें सर्व लंगडीं पडतात, याचें कारण आह्माला आमच्याच राष्ट्रापुरती असावी तितकी मुखत्यारी नाहीं. ही हक्कशीच सत्कार्य शिथिलते आणि विचारांचा वृथा गलबला दूर करते. आणि हानीकारक अमंगळ भेदाभेद ही पार लयास नेवून टाकते. हायकोर्टाचे ठराव किंवा सरकारी ठराव व्यक्ती संबंधानें जसे निकाल लावतात तद्वत् स्वराज्याची हक्कशी समाज किंवा राष्ट्र यांचें दैव बनवीत असते.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— मृग नक्षत्रानें अगदी बहार करून सोडली आहे. हा सोन्याच्या चरणाचा पाऊस ३ इंच जवळ झाला असून पेरण्या लवकरच सुरू होतील. हवेंत चांगला थंडोसा येत चालला आहे. व रोगराईही अगदीं क्षीणावस्थेंत आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार डेप्युटि कमिशनर हे पुण्याहून परवा परत आले. त्यांनीं आपल्या बरोबर नेलेल्या २५।३० पुढारी गृहस्थांस पुण्यास लढाईचे सर्व प्रकार समजाऊन दाखविण्यांत आले. हेतु असा कीं त्यांच्या प्रोत्साहनानें लोकांचे गैरसमज दूर होऊन सैन्याच्या भरतीच्या कामाला चांगली मदत होईल.

**आनंद विलास** संगीत नाटक मंडळी आपले लोकप्रिय हातखंडा खेळ येथें करीत असते आणि लोकांनाही यांच्या खेळांची अभिरुची चांगली लागली आहे असें त्यांच्या बाह्य लौकिकावरून दिसतें.


## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, आकोला— वाशीम यांच्या दरम्यान आमचे जे टांगे व स्पेशल टांगे जातात व येतात त्यांच्या संबंधानें चालू भाड्याचे दर बदलून खालील प्रमाणें नवे दर येत्या १५ जून १९१६ च्या तारखेपासून अमलांत येतील.

मेल टांग्याची १ सीट रुपये ४
स्पेशल टांगा रुपये २०

आकोला } पेस्तमजी आणि सन
११-६-१९१६ } मेल कांट्राक्टर

नो. नं. २०९

## खात्रीचा तयार केलेला.

### ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला १॥ रु शेर नं. २ रा २॥ रु शेर ८ दिवसाची पूर्वी मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गूण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता.
रामचंद्र सदाशिव मार्कंडे
उदवनी मोहला नागपूर शहर
नो. नं. २०९

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं १ } S. Clements, एजंट

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें सार्यां व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तार्टे, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शेंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकी गर्भसंबंधें मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्रें यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतांचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, कारितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रियां, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांचा लाल, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकांत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ११ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० प्रो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णै, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

### FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

### A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1.034 | 31,00,950 |
| 1888 | 8668 | 2 63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63,407 |
| 1915 | 64,138 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for hos making provision for those dependent upon him and this can be effected in in way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms Liberal***

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown, Manager, Bombay.

*A. C. Lal,* Branch Secretary, *C. P. Berar & Khandesh*, Nagpur.

N. N. 22

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवात्मजांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No.N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला—सोमवार तारीख १९ माहे जून सन १९१६ इ० [ अंक २४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकीलपत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० २

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

## नोटीस

रा. रा. राजेश्वर हरी ब्राह्मण रा० बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार शिवराम बापजी मानकु व बापु दाजी या तिघांनीं मिळून तुमचे मालकीचे शेत सेर्वे नंबर २३ मु० उमरे येथील रु. १२५० ला तुमचे जवळून विकत घेण्याचे ठरलें. व त्या प्रमाणें त्याच दिवशीं तुह्मास रुपये १०१ इसारें देण्यांत आला. व १५ रुपये स्टांपासाठीं व स्टांप कागदावरील प्रमाणें शेत विक्रीबद्दलची हकीकत लिहीण्यांत आली. पुढें दुसरे दिवशीं नोंदण्याचे पूर्वीं वरील तुमचें शेत आह्मी शेत पाहण्यास गेलो असतां ते फार गांवाला लागून नीसर दिसते. तुमचा आमचा सवदा काळीचा विकण्याबद्दल ठरला होता. परंतु तशी तुमची जमीन नसल्यामुळें आह्मांस सदर्हु सवदा पटला नाहीं. या शिवाय आमच्या तिघांतील बापु दाजीनें हा सवदा करण्यास अजीबात इन्कार केला. ज्या अर्थी सवदा तिघांनीं मिळून घेण्याचा ठरला आहे, व त्यामध्यें एक इसम निघून गेला. त्या अर्थी तो सवदा मला एकट्याला कायद्यानें बांधू शकत नाहीं. त्या शिवाय सवदा ठरलेल्या शर्तीप्रमाणें नाहीं. करतां सदर्हु व्यवहार रद्द समजला जावा व तुह्मास आमचे कडून एकशे एक रुपये १०१ तारीख २-६-१६ ला इसाराबद्दल मिळालेले ते ही नोटिस पावल्यापासून समक्ष द्यावे अगर पाठवून द्यावे. कळावें. ही नोटिस दिली सही. मु. आकोला ८-६-१६

सह्या

१ शिवराम बाळाजी द. खुद राहणार बाळापूर हल्लीं मु. आकोला

२ बापजी वा। मानकु पवार रा० बाळापूर हल्लीं मु. आकोला नि. आंगठा

नो. नं. २११

## नोटीस

रा. रा. शंकर विठ्ठल दिक्षित राहणार आकोला (पुलाजवळ)

यांसः—

खालीं सही करणार बळीराम वा। गणपती कुणबी राहणार ताकोड यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमच्यापासून खडकी टाकळी येथील स. नं. ४३ व ताकोड येथील एक नंबर असे दोन नंबर दरसाल ३२५ रुपयानें तुह्मी मला मक्त्यानें दिले आहेत. त्याप्रमाणें सन १९१४ सालीं

११ खंडी कपाशी
१ खंडी जवारी
२०० पेंडी कडबा
१ गाडी कुटार

इ. स. १९१५ सालीं

५ खंडी कापूस
१ खंडी जवारी
१०० पेंडी कडबा

इ. सन १९१६ सालीं

१२ खंडी कापूस
१ खंडी जवारी
२०० पेंडी कडबा
१ गाडी कुटार

या प्रमाणें देत आलों. परंतु तुह्मी याची पावती दिली नाहीं. व मी तुमच्या मुलाप्रमाणें आहे अशा प्रेमळ भाषणानें माझी तुह्मी समजूत करीत आलां. करारा प्रमाणें माझी पक्क्याची तीन वर्षें पुरी झालीं असून अजून दोन शिल्लक आहेत. असें असून तुह्मी यंदाचेसालीं वरील दोन्ही शेतें मला वाहू न देतां ताकोड येथील शंकर महार यांस मक्त्यानें दिलीं आहेत. पण मी त्याचा ताबा होऊं देणार नाहीं. व माझा सोडणार नाहीं. माझा करार पुरा होण्याच्या अगोदर तुह्मी माझा करार मोडून टाकला आहे. व त्यामुळें माझें नुकसान झालें आहे. तरी या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं, नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत कराराप्रमाणें मला शेतें वाहूं द्यावीं. व दरसाल प्रमाणें मी माल देत जाईन. या प्रमाणें तुह्मी न केल्यास माझ्या नुकसानीचा खर्च, व नोटिशीचा खर्च व या बाबतींत होणारा इतर खर्च या सर्वांची जबाबदारी तुमचेवर राहील. व कोर्ट मार्फत खर्च भरून घेतला जाईल. कळावें. ता. ८-६-१९१६

सही

बळीराम गणपती कुणबी राहणार ताकोड निशाणी रेघ

नो. नं. २१२

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटे, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्रमहोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मोरिझम प्रयोग विधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. ३ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

## नोटीस

रा. रा. पाडुरंग गणेश गाईकवाड जात ब्राह्मण राहणार धनोरी बाहदरपूर ता० आर्वी जिल्हा वर्धा

यांस:—

नोटीस देणार बायनाबाई जवजे नारोबा रू़क नाईक जात ब्राह्मण राहणार कारंजा ता० मुर्तीजापूर जिल्हा आकोला.

नोटीस देते ऐसाजे कीं माझा सख्खा भाऊ महादेव धोंडबा किडे याजला तुमचा भाऊ ल्हान नामे रामभाऊ व नारायण धोंडबा किडे या उभयतांनीं ४ दिवसा करितां तुमचे भेटीस नेतो असें ह्मणून येथून घेऊन गेले व त्याला तेथेंच ठेऊन घेतले व त्याला कांहींच बोलतां येत नसून या शिवाय कांहींच समजत नाहीं. तरी तुह्मी त्याजपासून आह्मास कळू न देतां स्थावर जंगमचे बक्षीसपत्र आकोला येथें सबरजिस्टरचे कचेरींत त्याचे पासून तुह्मी नोंदून घेतले व बक्षीसपत्र हक्क नोंदणींत रद्द होऊन पोकळ ठरलें गेले आहे तेव्हांपासून तुमची नीयत बरोबर दिसत नाहीं. ह्मणून मी आपले भावास तुमचे घरून घेऊन जाण्याकारितां ३ तीन ४ चार वेळां आले. तर तुह्मी त्याची व माझी भेट होऊ न देतां इकडे तिकडे लपवा छपवी करतां व ह्मणता कीं आह्मीं कारंजा येथें आणून तुमची भेट करून देतो. त्याला ही ६ महिने झाले आहेत. परंतु अझून आणले नाहीं. करितां माझे भावाचे जीवास कांहीं तरी अपघात कराल असें माझे जीवास वाटते तर माझा भाऊ यांस तुह्मी नोटीस पावले पासून आठ दिवसाचे आंत चार वेळी समक्ष आणून घालावे. तसें न केल्यास व त्याचे जीवास कमी जास्ती झाल्यास व त्याचे जीवाची जोखीम तुमचेवर आहे व कोर्टांत क़ायदेशीर रीतीनें फिर्याद करून जबाब घेईन या नोटीसीनें कळावे ता० २-६-१६ इ.

दस्तुर तुकाराम रामजी अर्जनवीस राहणार कारंजा

सही

बायनाबाई द. खु.

नो. नं. २१३

वऱ्हाडसमाचार

मिति जेष्ठ वद्य ४ शके १८३८

## इंडियन कान्सॉलिडेशन आक्ट.

इंडियन कान्सॉलीडेशन आक्टमध्यें दुरुस्ती करण्यासाठीं पुढें आलेल्या बिलांतल्या विचित्रकलमांचा जा जों अधिक विचार करावा तों तों या बिलांतल्या कलमांचा मागावा अगोदर हिंदुस्थानांत न लागूं देतां विलायतेंतल्या अधिकाऱ्यांनीं तें एकदम पार्लमेंटपुढें मांडल्याबद्दलचें आश्चर्य दुणावतच जाते. देशी संस्थानिक व त्यांची प्रजा यांचा ब्रिटिश नोकरींत केलेला प्रवेश, व स्टेट सेक्रेटरीवर कोर्टांत फिर्याद मांडून न्याय मिळविण्याचा ब्रिटिश प्रजेचा बुडविलेला हक्क या संबंधानें या पूर्वीं आह्मीं लिहिलेंच आहे. आज आणखी एका कलमाबद्दल लिहावयाचें आहे. यीं कलमानें व्यापारी व पेढीवाले लोकांना सरकारच्या एक्झिक्युटिव्ह कौंसिलांत जागा मिळविण्याचा मार्ग खुला केला आहे. कौंसिलांतल्या जागेची मुदत पांच वर्षांची असल्यामुळें येवढ्या अल्प मुदतीसाठीं अर्थात् आपला दुकानशीं असलेला संबंध त्याला सोडतां येणार नाहीं; पण तो संबंध न सोडतां त्याला इकडे कौंसिलांत ही काम करतां यावें अशी सवलत या बिलानें देण्यांत येणार आहे. अगोदर ज्याच्याशीं सरकारचा नेहमीं संबंध यावयाचा त्या धंद्यांतल्या अर्थात् व्यापारांतल्या माणसाला कौंसिलचा मेंबर नेमणें हें व्यवस्थित राज्यपद्धतीच्या तत्वाविरुद्ध आहे. तशांतून हिंदुस्थानांत तर हिंदी व्यापारी व ब्रिटिश व्यापारी यांच्यामधला विशेष प्रकारचा संबंध हिंदी व्यापाऱ्यांत दिसून येणारा शिक्षणाचा अभाव, ब्रिटिश व्यापाऱ्यांची हिंदुस्थानच्या हिताविषयींची बेपर्वाई वगैरे अनेक गोष्टी या बिलाच्या कलमाच्या तत्वाला अत्यंत प्रतिकूळ आहेत; इतकेंच नाहीं, तर जों पर्यंत मनुष्यस्वभावच स्वार्थैकदृष्टि आहे. तों पर्यंत होईल तितका स्वार्थ साधण्याचें व्यापारी धोरण आणि तें साधण्याची संधी देणारी कौंसिलांतल्या सारखी अधिकाराची जागा यांची सांगड होतां होईल तों सरकारनें घालूं नये हा उत्तम मार्ग आहे. कारण हा संयोग झाला असतां अधिकाराचा दुरुपयोग करण्याचा मोह पडण्याचे प्रसंग सदर कौंसिलावर अनेक येतील-त्यांना तो वश न झाला तरी लोकांना त्याच्या विषयीं शंका घेण्याला कारणें होतील, व एकंदरीनें व्यापारीवर्गांत निष्कारण असंतोष वाढेल. येवढें अनर्थावह व सुव्यवस्थित राज्यकारभाराच्या मूलभूत तत्त्वांशीं विरुद्ध असलेलें बिल हिंदुस्थानच्या लोकांना न कळूं देतां मुकाट्यानें पार्लमेंटपुढें आणण्याची विचित्र कल्पना स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या किंवा विलायतेंतल्या कोणाही अधिकाऱ्याच्या डोक्यांत कशी आली याचें सर्वांना आश्चर्य वाटत आहे. या व अलीकडे घडत असलेल्या इतर कित्येक गोष्टीवरून विलायतेंत युद्धामुळें मुत्सद्यांचीं डोकीं शांतपणानें दूरवर विचार करून एखादी गोष्ट निश्चित करण्याचे कामीं असमर्थ झालीं आहेत कीं काय अशी सुद्धां शंका एखाद्याला येईल. पण तसा कांहीं एक प्रकार नाहीं. हिंदुस्थानचे लोक सध्याच्या काळा वादग्रस्त प्रश्नासंबंधानें चळवळ करणार नाहींत अशी संधी पाहून युरोपियन व्यापाऱ्यांच्या एखाद्या जिवलग व हितचिंतक मित्रानें हें अपूर्व तत्त्व आपल्या सुपीक मेंदूंतून काढून स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या डोक्यांत भरविलें असावें अशी आमची कल्पना आहे. ही खोटी ठरो व असल्या बिलाला मंजुरी न देतां पार्लमेंट दूरवरच्या परिणामाकडे लक्ष देऊन वाटाण्याच्या अक्षता लावो असें आह्मी इच्छितों

## जपानचें उदाहरण.

देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याची गोष्ट निघाली की जपानचें उदाहरण प्रत्येक लेखक पुढें करीत असतो. तेव्हां जपानी सरकार हें उत्तेजन कशा प्रकारें, केव्हां, कोणत्या शर्तींवर देतें व त्याचा औद्योगिक उन्नतीवर काय परिणाम खरोखर घडला आहे याचा तपास करण्याकरितां हिंदुस्थान सरकारनें कलकत्याचे अर्थशास्त्राचे प्रोफेसर मि. हॅमिल्टन यांना जपानला पाठविलें आहे. त्यांचा रिपोर्ट काय येतो व त्यावर हिंदुस्थान सरकार काय विचार करते तिकडे आतां लोकांचे डोळे लागणें साहजिक आहे.

## ह्मैसूरची सांपत्तिक परिषद.

सध्या देशी संस्थानांत अतिशय झपाट्यानें अग्रगामी होऊन श्रेष्ठपद मिळविण्यासाठीं प्रयत्न करणारे संस्थान ह्मणजे ह्मैसूर हें होय. या संस्थानची प्रातिनिधिक सभेची बैठक व दुसरी सांपत्तिक परिषदेची बैठक असे वर्षांतून दोन प्रसंग या संस्थानच्या प्रगतिपर यत्नाची माहिती करून देणारे असतात. या पैकीं गेल्या आठवड्यांत सांपत्तिक परिषदेची बैठक झाली, त्यावेळीं दिवाण सर विश्वेश्वर अय्यर यांनीं केलेल्या भाषणावरून त्या संस्थानांत शेतकी, शिक्षण, व व्यापार या तीन महत्वाच्या शाखांत त्या संस्थानची कशी प्रगति होत आहे त्याची बरीचशी कल्पना करतां येते. फळांची वाढ या विषयाकडे शेतकी खात्यानें आपलें लक्ष लाविलें आहे. फळांतली कीड मारण्याचे शास्त्रीय उपाय बागवानांना शिकविण्यांत येत आहेत; शेतकीचीं सुधारलेलीं आऊतें, गुरांची जोपासना, शेतकी विषयक माहितीच्या कोष्टकांत सुधारणा, शेतकऱ्यांच्या मुलांसाठीं शाळा, व अशा शाळा काढणें ही एक धर्मदायाची गोष्ट आहे असें उदार धनिक खाजगी लोकांच्या डोक्यांत बिंबवून त्यांचें सहकारीत्व संपादन करणें वगैरे अनेक महत्वाच्या गोष्टी गेल्यासालीं शेतकी कमिटीनें केल्या आहेत. व्यापारी संघ निर्माण झाला आहे. ह्मैसूर ब्यांकेचे भांडवल ४० लक्ष रु. होतें तें ९३ लक्ष झालें, व ह्मैसूरच्या व्यापारासंबंधाची माहिती गोळा करण्याचें काम सुरू आहे. औद्योगिक शाखेची चळवळ ही प्रशंसनीय आहे. जागोजागीं यंत्रांची उभारणी होत आहे. चंदनी तेलाचा कारखाना नुकताच काढला आहे, त्या पासून दर महिन्यास २९००० रुपये किंमतीचें चंदनाचें तेल निघेल असा अजमास आहे. कापडाच्या नव्या गिरण्या ही निघत आहेत. व्यापारी रीतीनें यशस्वी होण्यासारखा साबणाचा कारखाना निघाला असून त्यांत फार चांगला साबण तयार होतो. लोखंड, पोलाद, कागद वगैरेंचे कारखाने काढण्याबद्दलच्या प्रश्नांवर विचार चालू आहे. ऊंसाचा रस काढण्याचे कामासाठीं दहा सहकारी मंडळ्या स्थापित झाल्या आहेत. या शिवाय सुधारलेलीं शेतकी आउतें, शास्त्रसिद्ध खतें, वगैरे कामासाठीं सहकारी मंडळ्या व पेढ्या आहेतच. शिक्षणांत प्रगति करण्याचे कामीं ह्मैसूर संस्थान इतर संस्थानच्या मागें नाहीं. सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण हळूं हळूं पुढें पाऊल टाकीत आहे. शेतकरी वर्गाच्या मुलांसाठीं स्वतंत्र शिक्षणक्रम ठरवून दिला आहे रात्रीच्याही शाळा आहेत. उद्योगधंद्यासंबंधाची माहिती गोळा करून पुस्तकरूपानें छापण्याचा क्रम सुरू आहे. ह्मैसूर एकॉनॉमिक जर्नल नांवाचें इंग्रजी व कानडी मासिक ही आपलें काम चांगल्या प्रकारें करीत आहे. सारांश, ह्मैसूरनें प्रगतींत मिळविलेलें श्रेष्ठपद गेल्यासालीं कायम राखिलें आहे यांत शंका नाहीं. इतर संस्थानें ह्मैसूरचें या बाबतींत अनुकरण करतील तर देशी संस्थानांचें रूप हां हां ह्मणतां बदलून जाईल. पण ऐषआराम, पक्षभेद, रयतेच्या हितापेक्षां स्वतःच्या सुखाकडे अधिक लक्ष, नालायक खुषमस्कऱ्यांचा तोंडपुजेपणा, कारस्थाने, आणि खलबतें याच्यामध्येंच ज्यांचे दिवसाचे २४ तास हरहमेष जातात, त्यांना ह्मैसूरसारख्या संस्थानाची रयतेच्या हितासाठीं चाललेली धडपड कशी आवडणार व आवडली तरी त्यांच्या भोवतीं वर सांगितलेल्या अनेक कृष्णसर्पांचे जे विळखे पडलेले आहेत त्यांतून सुटका होईल तेव्हांना ते अशा गोष्टींकडे लक्ष देतील?

## सहकारी चळवळीची प्रगति.

गेल्या दहा बारा वर्षांत हिंदुस्थानांत सहकारी चळवळीचें पाऊल किती पुढें पडलें आहे हें पाहावयाचें असेल तर तें थोडक्यांत कार्टलीं रिव्ह्यूंतल्या मि० यूल्यांक यांच्या लेखांत पाहण्यास मिळेल. सरकारचें पाठबळ एखाद्या गोष्टीला मिळालें, ह्मणजे ती गोष्ट हिंदुस्थानांत यशस्वी होण्यास वेळ लागत नाहीं, अर्थात् त्या गोष्टीच्या चांगुलपणाविषयीं लोक चिकित्सा करीत नाहींत, इतका विश्वास आपल्या सरकाराविषयीं हिंदुस्थानच्या लोकांत आहे, ही गोष्ट सरकारनें अभिमानपूर्वक नमूद करावयास पाहिजे. लोकांचा सरकारचेठायीं इतका विश्वास नसता तर सहकारी चळवळ लोकांच्या हिताची असून ही तिचा इतका प्रसार इतक्या थोडक्या काळांत खात्रीनें झाला नसता. हा प्रसार किती झाला आहे या विषयींचे आंकडे कोणाला ही समाधानकारक वाटण्यासारखे आहेत. गेल्या दहा वर्षांत हिंदुस्थानांत १९००० सहकारी सोसायट्या स्थापन झाल्या व त्यांच्या मेंबरांची संख्या ७४४००० झाली. तीस कोटी प्रजेंत साडेसात लक्ष हें प्रमाण दिसण्यांत अगदीं क्षुद्र दिसतें. पण हिंदुस्थानच्या लोकांचें अज्ञान, शिक्षणाचा अभाव, लोकांची जुन्या चालींना चिकटून राहण्याची प्रवृत्ति, वगैरे गोष्टींचा विचार केला असतां हें प्रमाण बरेंच मोठें आहे असेंच ह्मणावें लागेल. तसेंच हिंदुस्थानचें दारिद्र्य जगांत मशहूर असतां व जवळची शिल्लक दागिन्यांत घालण्याची किंवा जमिनींत पुरून ठेवण्याची जुनीचाल लक्षांत घेतली असतां जवळ जवळ सात कोटि रुपयांचें भांडवल सहकारी पतपेढ्यांनीं जमविलें आहे ही गोष्ट ही अभिनंदनीयच

वाटली पाहिजे. सहकारी तत्त्व शेतकीला लावण्यानें इतर राष्ट्रांचें सांपत्तिक बळ वाढलें आहे ही गोष्ट हिंदुस्थानाला कळूं लागली आहे येवढें तरी यावरून सिद्ध झालें आहे. आणि ही प्रगति कांहीं थोडी नाहीं. आज सावकाराच्या तडाख्यांतून शेतकऱ्यांना सुटण्याचा व्यावहारिक मार्ग सांपडला आहे; हळूं हळूं इतर व्यवसायांतल्या अडचणी ही हिंदुस्थानचे लोक याच महामंत्रानें स्वतः दूर करून घेतील आणि आत्मोद्धाराचा मार्ग पाहून काढतील अशी उमेद बाळगण्यास आतां प्रत्यवाय राहिला नाहीं. ब्रिटिश अमलाचा पाया हिंदुस्थानांत दृढ होण्यास ही या गोष्टीनें पुष्कळ मदत होईल. सारांश, सद्धेतुपूर्वक आणि योग्य मार्गानें लोकांच्या हितार्थ केलेली गोष्ट हिंदुस्थानांत फुकट जात नाहीं, व त्या गोष्टी पासून आपलें हित होत आहे असें एकदां कळल्यावर हिंदुस्थानचे लोक कृतज्ञतापूर्वक तिचा स्वीकार करण्यास कचरत नाहींत, ही गोष्ट सहकारी चळवळीच्या इतिहासावरून उत्तम प्रकारें व्यक्त होते. हिंदुस्थानच्या लोकांना बेमान ह्मणणाऱ्या लेखकांचे डोळे या अनुभवानें उघडतील असा आह्मांस भरंवसा वाटतो.

---

## हिंदी साम्राज्य.

### (श्री जार्ज बादशाहीचा उषःकाल.)

प्रसिद्ध कादंबरीकार रा. रा. हरि नारायण आपटे यांचा "उषःकाल" आह्मी नुकताच वाचला. ही जुनी कादंबरी श्री शिवाजीच्या वेळची खरी. पण त्या परम रमणीय ग्रंथांत जी दैवी दृष्टी प्रस्तुतच्या हिंदी राष्ट्रा संबंधानें ध्वनित आहे ती तर मनाला फार आल्हाद देते. आणि रा. आपटे यांचा त्या विषयीं गौरव करावा तितका थोडाच वाटतो. त्यावेळीं श्री शिवाजीनीं जसा भावी राष्ट्राचा उषःकाल सूचित केला तसाच या हिंदी राष्ट्रांचा भावी तेजोमय काल श्री जार्ज हे सिंहासन वर बसल्या दिवसापासून आपल्या दिव्य वाणीनें व्यक्त करीत आहेत. राष्ट्रें नवीं जुनीं बनतात तेव्हांचा तो कोणताहि क्रांतिकाल मोठा भयावह वाटतो. हल्लींचे जगांतील अपूर्व महायुद्ध साम्राज्याला भेदरून टाकीत आहे. लक्षावधीं लोकांचे प्राण धारातीर्थी पडत आहेत आणि साम्राज्य पुरुष आपल्या सर्व अंगभूत राज्यांची परीक्षा कसोशीनें घेत आहेत. अशावेळीं उत्तमांग ह्मणून जें हिंदी राष्ट्र त्याची ही आत्मसेवा बादशाहीच्या इतकी सत्कारणीं लागत आहे कीं या इंडियाच्या क्षितिजावर जसा दोनशें वर्षांपूर्वीं श्री शिवाजीचा उदय झाला तसाच हिंदी राष्ट्र बनविणाऱ्या श्री जार्ज यांचा नुकताच उदय झाला आहे. अशी प्रचीति मन देत आहे. किंबहुना ते पूर्वींचे साधुसंत लॉर्ड हार्डिंज, श्रीमती बिझांटबाई, रा. टिळक इत्यादि थोर थोर विभूतींच्या वेषांत आपल्या कल्याणदृष्टीनें हा उषःकाल घडवून आणीत आहेत. आणि अरुणोदयाची प्रभा लवकरच सर्वत्र फांकत जाईल. महानद्यांचे पूर जशीं गांवें शहरें पुनीत करून टाकतात, तद्वत इंग्लिश व इंडियन राष्ट्रांच्या जीवननद्या आपआपल्या क्रांतिकारक महापूरांनीं हें हिंदी राष्ट्र पुनीत करून सोडीत आहेत. अशा सुसमयीं येथील राज्यकारभारांतील भेदकारक दोष समूहांचा उच्छेद आपोआप होत जाईल हें सांगण्यापेक्षां इंग्लिश राष्ट्राच्या तोलानें हें भावी हिंदी राष्ट्र ब्रिटिश साम्राज्याची पताका चिरकाल उभी करील. त्रस्त प्रजेचा छल दूर होऊन त्यांची मान खंडना जातिवर्णादि भेदानें होण्याचें बंद होईल. सुराज्याची उत्कृष्ट तत्वें प्रचलित होत जातील आणि प्रजेच्या आकांक्षा ज्ञानामृतानें व अधिकार दानानें अधिकाधिक तृप्त होत जातील. आणि श्री जार्जची ही हिंदी राष्ट्रात्मक अयोध्या गंगावतरणा प्रमाणें आमच्या अनुभवसृष्टींत सांप्रतच्या उषःकाला नंतर लवकरच उतरेल असें भविष्य कोण इतिहासज्ञ करणार नाहीं बरें!

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या दोन आठवड्यांत अनेक महत्वाच्या व संक्षोभजनक गोष्टी घडून आल्या. या मुदतींत जर्मनीशीं एक ठळक आरमारी लढाई झाली. या लढाईची कच्ची हकीकत अद्याप यावयाची आहे. तथापि या चकमकींत दोन्ही पक्षांची जी मोठी हानी झाल्याच्या नव्या नव्या बातम्या तारेनें रोज येत आहेत त्यावरून ही लढाई जंगी झाली असली पाहिजे असें दिसतें. याच मुदतींत लार्ड किचनर सारखा मोहरा महत्वाच्या कामगिरीवर रशियाकडे जात असतां बोट सुरुंगाला लागून नाश पावल्याची अत्यंत शोकजनक वार्ता येऊन तिनें सर्वांच्या मनाला मोठा धक्का दिला. याच मुदतींत जर्मन शत्रूंनीं व्हर्डूनचा नाश पावलेला व्हो नांवाचा किल्ला सर केल्याची खबर थडकली. याच पंधरवाड्यांत रशियानें ग्यालिशियांत धामधूम सुरू केल्याचेंही कळलें. या प्रत्येक गोष्टीला कांहीं विशेष महत्व आहे. लॉर्ड किचनेर यांच्या मृत्युसंबंधानें लिहावें तितकें थोडेंच आहे. त्यांच्या जागेवर कायमची नेमणूक अद्याप कोणाचीच झाली नाहीं. पण कोणी जरी नेमिला गेला, तरी लॉर्ड किचनेर यांच्या नामोच्चारणा बरोबर सर्वांच्या मनांत जो आदरयुक्त प्रभाव पडत असे, तसा प्रभाव स्थापित करण्याचें सामर्थ्य किंवा सुदैव ज्याला लाभलें आहे असा तूर्त तरी कोणी दिसत नाहीं. शिवाय एका क्षणांत परिवर्तन पावणाऱ्या परिस्थितीचें सांगोपांग लक्षण ध्यानांत आणून त्या धोरणानें आपलें वर्तन बदलण्याइतका चाणाक्षपणाही हल्लींच्या ब्रिटिश लष्करी अंमलदारांपैकीं फार थोड्यांत दिसतो. यामुळें लॉर्ड किचनेर यांच्या मृत्यूमुळें रिकामी झालेली त्यांची जागा पूर्णपणें भरून काढील असा कोणीच ठळक इसम सध्यां दिसत नाहीं. आरमारी लढाईसंबंधानें नक्की व संपूर्ण माहिती येण्यास अद्याप कांहीं अवकाश आहे. तथापि आतांपर्यंत आलेल्या बातम्यांवरून येवढी गोष्ट निर्विवाद दिसते कीं लढाईच्या दिवशींची हवा ब्रिटिश आरमाराला प्रतिकूळ नव्हती तरी त्यानें शत्रूला असा चांगला हात दाखविला कीं पुनः बाहेर तोंड काढण्याला जर्मन आरमाराला भीती वाटल्यावांचून राहणार नाहीं. जर्मन आरमाराची झालेली नादुरुस्तीच त्याला कित्येक महिनेपर्यंत बाळंतिणीसारखी निर्भय जागेंत अडकवून ठेवील. या लढाईंत झालेली हानि कबूल करणें शत्रूच्या जिवावर येत आहे, तथापि नाइलाजास्तव रुपयांत चार आणे तरी सत्याचा अंश बोलण्यांत ठेविला पाहिजे ह्मणून ते हळूं हळूं आपल्या हानीची कबूली देऊं लागले आहेत. या आरमारी लढाईंत शत्रूचा पराभव झाल्यापासून ब्रिटिश आरमाराविषयींचा दरारा द्विगुणित झाला असला पाहिजे.

---

## व्हर्डुनची लढाई.

या इतिहासप्रसिद्ध लढाईची नक्की मुदत सांगणें कठीण आहे. तथापि शत्रूनें व्हो किल्ला सर करणें ही त्यांतली एक महत्त्वाची गोष्ट खरी. ता. ४ रोजीं शत्रूंनीं वायव्येच्या बाजूनें या किल्ल्यावर हल्ला सुरू केला, पण त्यांना परत फिरावें लागलें. तेव्हांपासून ज्यास्तच निकराचे हल्ले होऊं लागले. आणि ४८ जड तोफांचा सारखा भडिमार फ्रेंच लोकांवर होऊं लागल्यावर त्या किल्याचा कितीसा भाग शाबूद राहणार तें दिसतेंच आहे. या प्रमाणें नाश पावलेला किल्ला एका आठवड्यांत शत्रूंनीं सर केला. पण त्याकरितां त्याला इतकी जबर किंमत रक्तपाताच्या रूपानें द्यावी लागली कीं ती पाहूनच कोणही व्यवहारज्ञ माणूस आश्चर्य चकित होईल. हा किल्ला हातीं आल्यानें शत्रूचा काय फायदा झाला असेल तो त्याचा त्यालाच माहित! त्या किल्ल्याच्या आसपासच्या जागा व प्रवेशाचीं द्वारें फ्रेंचांच्याच हातांत आहेत. हा किल्ला शत्रूंनीं सर केल्यापासून फ्रेंचांचा मात्र थोडा बहुत फायदा झाला आहे. त्यांच्यावर होणारा तोफांचा भडिमार व पायदळाचा हल्ला बंद पडला आहे.

---

## रशियन चळवळ.

व्हर्डुनचा व्हो किल्ला हातीं घेण्यासाठीं जीवापाड केलेली मेहनत सफळ झाली ह्मणून केसर व त्याचे युवराज यांना गुदगुल्या होत असतील, पण इकडे पूर्वेकडील रणक्षेत्रांत रशियनांनीं जी गडबड उडवून दिली आहे तिनें त्या आनंदांत विरजण घातलें असलें पाहिजे, आणि आस्ट्रियाच्या मदतीला धावून जाण्याची अवश्यकता त्यांना वाटत असली पाहिजे. ही मदत त्यांचे हातून कितपत होईल किंवा पश्चिमेकडून सैन्य हलवून तें त्यांना पूर्वेकडे नेतां येईल कीं काय हा प्रश्न अलाहिदा आहे.

---

## आस्ट्रिया व इटली.

गेल्या तीन आठवड्यांत आस्ट्रियानें जी चपलता दाखविली ती आतां पर्यंतच्या त्याच्या चरित्रक्रमांत अपूर्व तर खरी; पण इटालीयन सैन्याची फळी फोडून इटलीच्या मर्यादेच्या आंत पाऊल टाकण्या पूर्वीं आस्ट्रियानें एकदां शांतपणें विचार करावयास पाहिजे होता. त्यानें नुकत्या मिळविलेल्या विजयानें निरुत्साह पावलेल्या आस्ट्रियन लोकांच्या चर्या प्रफुल्लित झाल्या खऱ्या, पण हा तजेला फार काळपर्यंत टिकणारा नाहीं हें त्यांस समजावयास पाहिजे होतें. इतकेंच नाहींतर आस्ट्रियाला इटालियन लोकांशीं लढण्यांत गुंतवून जर्मनी कांहीं कावा साधीत आहे येवढें तरी त्यांना कळावयास पाहिजे होतें. पण ठेंचा खाल्ल्याशिवाय शहाणपण येत नसतें ही गोष्ट आस्ट्रियासंबंधानें किती खरी आहे तें त्यांना लवकरच दिसून येईल.

---

## आस्ट्रिया आणि रशिया.

रशियाचें सैन्य ह्मणजे हत्तीचें मढें, तें इकडचें तिकडे करण्यास किती तरी काळ लागावयाचा, अशी शत्रूची सामान्यतः समजूत आहे. पण या समजुतीला रशियानें गेल्या आठवड्यांत दाखविलेल्या चपळतेनें मोठाच धक्का दिला असला पाहिजे. गेल्या दहा बारा दिवसांत रशियानें शत्रूच्या तोफा व माणसें इतकीं पकडलीं कीं ती संख्या ऐकूनच आस्ट्रियाचे हातपाय गळतील. शिवाय दोन ठिकाणीं शत्रूची फळी फोडून तो घुसला तें निराळेंच. एका ठिकाणीं ह्मणजे लझक प्रांतांत ४० मैल व बकझाक आणि निस्टरयांच्यामध्यें १३ मैल प्रांत रशियन सैन्यानें आक्रमण केला. जर्मनीच्या भरंवशावर आस्ट्रिया स्वस्थ राहिला त्याचा हा परिणाम त्याच्या मनाला आतां इंगळ्या लावीत असेल. लेंबर्गला आतां रशियनांनीं सर्व बाजूंनीं घेरलें आहे, आणि तें खालीं करून देण्याचा विचार आस्ट्रियाच्या मनाला आतां व्यथित करीत असला पाहिजे. रशियाला आतां मागें हटविण्यास लागणारें बळ आस्ट्रियापाशीं कोठें आहे? आणि बाहेरून कुमक येण्याला ही वाट राहिलेली नाहीं. सारांश, आस्ट्रियाच्या बाजूनें सध्याची परिस्थिति आस्ट्रियालाच एकट्याला नाहीं, तर जर्मनीला सुद्धां चिंतातुर करण्याला पुरेशी आहे असें एकंदरीनें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

## कोर्ट प्रॉसिक्यूटर.

गेल्या अंकांत पोलीस आणि रयत या मध्यें हल्लीं पूर्वीपेक्षां अधिक सौजन्य वागत आहे असें सांगितलेंच आहे. पोलीस कमिशनचा तरी उद्देश हाच होता. त्य धोरणावर पोलीस खात्यांत नवीन आफिसरांची भरती ही होऊं लागली आहे. तरी तपास लावणाऱ्या पोलीस आफिसरांचे अंगी कायद्याचें विशेष ज्ञान नसतें व तें त्यांच्यां असण्याची विशेष अवश्यकताही नाहीं. लोकांच्या शरीराचें आणि मालमत्तेचें रक्ष करून झालेल्या गुन्ह्यांचा बरोबर तपा लावून रयतेस न्याय मिळवून देण्याइतव हुशारी या लोकांत असली ह्मणजे पुरी आ

प्रॉसीक्यूटर लोक रयतेस न्याय मिळवून देण्यासाठीं आणि खऱ्या गुन्हेगारांस शासन देववून रयतेस अपराध पराङ्मुख करण्या साठीं आहेतच. या मुळें तपास लावणाऱ्या पोलीस आफिसरांचे अंगीं कायद्याच्या ज्ञानाची विशेष जरूरी भासेनासी झाली आहे. आणि ह्मणूनच प्रॉसिक्युटर लोक अधिक विद्वान असावे अशी लोक मागणी करूं लागले आहेत. व ही मागणी इतर प्रांतांतील सरकारांनीं मान्य ही केली आहे. या मागणीच्या रास्तपणाबद्दल आतां शंका ही राहिली नाहीं. वरिष्ट कोर्टांत सरकार तर्फे काम चालविण्यासाठीं ह्मणजे फिर्यादी पक्षातर्फे काम चालविण्यासाठीं जे वरिष्ट दरजाचे पब्लिक प्रॉसिक्यूटर असतात, ते या प्रांतांत देखील प्रायः बारिस्टर किंवा L. L. B. च असतात. परंतु हल्लीं लोकांची जी मागणी आहे ती कोर्ट प्रॉसिक्यूटर लोकांसंबंधानें आहे. हे लोक पोलीस खात्यांतील असतात. पोलीस खात्यांतील जिल्हा अधिकारी आजपर्यंत सिव्हिल सर्व्हिस परीक्षेंत हल्लीं नियमित मागणीच्या संख्येच्या खालीं पण नंबरवारीनें जवळ जवळ आलेल्या लोकांनीं भरलेले आहेत त्यांच्या शीलाबद्दल अगर हुशारी बद्दल वगैरे इतर गुणांबद्दल कोणासही शंका अगर भीती बाळगण्याचें कारणही नसतें. परंतु त्यांच्यांत आणि क्रमवारीनें खालील दर्जाच्या आफिसरास मधले दर्जे बरेच असतात व खालील आफिसरांस जिल्हा सुपरिंटेन्डेंटांचे स्वभाव आणि धोरण जसें समजावें तसें समजत नसतें. इंग्रज अंमलदारांचा स्वभाव व धोरण बरोबर समजणें चांगल्या समजुतदार व शहाण्या लोकांसही फार कठीण आहे. यामुळें आत्मनानुमान प्रेक्षणानें त्यांचे परीक्षण करावे लागतें. ह्मणून तें नेहमीं चुकतें. तसेंच दुसऱ्याबद्दल आपण जेव्हां आपलें मत बनावितो तेव्हां त्याच चुका आपले हातून होतात. सामान्य जनतेचें जोंपर्यंत समानशील झालें नाहीं तों पर्यंत एका ढोबळ नियमानें लोक वागतातच असें अनुमान काढतां येत नाहीं. संपूर्ण राष्ट्राचें, विचाराचें वर्तनाचें, आकांक्षांचें आणि दानतीचें जोंपर्यंत एक केंद्रस्थान होत नाहीं तोंपर्यंत राष्ट्रीय शील बनावयाचें नाहीं इंग्रज लोकांचें स्थूलमानानें एकशील आहे. तसें अद्याप या देशाचे बनलेलें नाहीं. व या दृष्टीनें या लेखांत आह्मी लोकांची मागणी सरकार पुढें ठेवीत आहों:—

प्रॉसिक्यूटर लाईन वेगळी काढल्यानें आणि तींत L. L. B. लोकांचीच भरती करीत गेल्यानें रयतेस बरीच मानसीक शांती मिळेल व तिचें अकारण भय नष्ट होईल.

सारांश, रयतेच्या मागण्या मुख्यतः दोन आहेत. पहिली मागणी ही कीं इतःपर प्रॉसिक्यूटर लोक जो कायदा चांगल्या चांगल्या कायदे पंडितास देखील समजण्यास कठीण झाला आहे त्या कायद्यांतील परीक्षांतून उत्तीर्ण झालेल्या लोकांसच देत जाव्या ही. व दुसरी मागणी मुलकी खात्यांतील अधिकाऱ्यांच्या पात्रतेबद्दलची. [illegible]ज पहिली मागणी लोक कां करितात आणि ती कशी न्याय्य आहे हें सांगीतलें. आतां दुसऱ्या मागणी बद्दल पूर्वीं अनेकवार लिहिलें आहे तरी पुढें एखादे वेळीं लिहूं.

## हिंदुस्थानचे मजूर.

हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नतीला प्रतिबंध करणारीं जीं अनेक कारणें आहेत, त्यांतलें एक मुख्य कारण हिंदुस्थानच्या मजुरांत आढळून येणारी अपात्रता हें आहे. हिंदुस्थानांत मजुरीचे दर फार अल्प आहेत ही गोष्ट खरी; पण त्या बरोबर त्या मजुरांचे हातून होणाऱ्या कामाचें प्रमाण ही फार अल्प असतें व जें काम होतें तें हीं चांगल्या प्रतीचें नसतें या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं. असें कां असावें! हिंदुस्थानांत ज्यास्त मजुरी देऊन ही चांगले प्रामाणिकपणानें कामें करणारे मजूर कां मिळूं नयेत हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. त्यांच्या हातून विलायतेंतल्या मजुरासारखें चांगलें अक्कलेचें काम होत नाहीं याला कारण शिक्षणाचा अभाव हें सांगतां येईल. पण प्रमाणिकपणानें त्याच्या हातून काम होत नाहीं. अंग चोरून काम करण्याची संवय त्यांच्या हाडीं मासीं खिळलेली दिसते याला कारण शिक्षणाच्या अभावाखेरीज अन्यत्र शोधलें पाहिजे, आणि खरें स्पष्टपणें बोलावयाचें ह्मणजे तो त्याचा दोष नसून आमच्या एकंदर समाजाचाच दोष आहे हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. मजूर अशिक्षित ह्मणून घटकाभर त्याची गोष्ट बाजूला ठेविली तरी स्वीकृत कार्य प्रामाणिकपणानें करण्याचा गुण सुशिक्षितांत तरी कितीसा दिसतो? आमच्या देशांतली कोणतीही संस्था घ्या. तिचें काम चालढकलीवर करण्याचा प्रघात आमच्या देशांत सार्वत्रिक आढळून येईल. आमचा कापसाचा व्यापार किंवा दुसरा कोणताही व्यापार न चालण्याला हें एक मुख्य कारण आहे. एखाद्या बुकसेलराकडून नुसतें एखादें पुस्तक व्ही. पी. नें मागविलें तर अगोदर तें तो लवकर पाठविणारच नाहीं; पाठविलें तर त्याचें प्याकिंग नीट करणार नाहीं. गिऱ्हाइकाच्या हातांत माल पडण्याच्या वेळींच त्याची जीर्ण स्थिति झालेली आढळून येईल. विलायती व्यापारी ज्यास्त पैसे घेतील, पण मग गिऱ्हाइकाची तब्यत खुष ठेवण्यासाठीं वाटेल तितके श्रम करण्यास चुकावयाचे नाहींत. आमच्या लोकांचें लक्ष माल स्वस्त करण्याकडे असतें, तसें त्या मालाचा चांगुलपणा राखण्याकडे नसतें. हेंच तत्व आमच्या समाजाच्या प्रत्येक व्यवहारांत दिसतें आणि तेंच मजुरींत ही आहे. आमच्या लोकांची अल्पसंतुष्टता ही ही गोष्ट या स्थितीच्या मुळाशीं आहे. चार घटका कशीतरी मजुरी करून पोटापुरतें मिळवावें आणि स्वस्थ हरि हरि ह्मणत बसावें, ही समजूत आमच्या एकंदर समाजांतून निर्मूळ झाल्याशिवाय, आणि ज्यास्त मेहनत करून ज्यास्त पैसे मिळावण्याची महत्वाकांक्षा तेथें स्थापित झाल्याशिवाय इष्ट सुधारणा घडून येणें शक्य नाहीं. सारांश काय तर आमच्या मजुराच्या सध्याच्या शोचनीय स्थितीबद्दल— नव्हे, आमच्या एकंदर औद्योगिक अवनतीबद्दल पुष्कळ अंशानें आमचा समाजच जबाबदार आहे ही गोष्ट विसरतां कामाचें नाहीं.

## रशियाचें उदाहरण पहा!

रशियांनें लढाई चालली आहे तोंपर्यंत तरी आपल्या राज्यांत मद्याच्या विक्रीला सक्त मनाई केली आहे. त्यामुळें मद्याला गिऱ्हाईक न मिळाल्याकारणानें १३० कोटी शेर दारू पडून राहिली आहे. या मालाचें आतां काय करावयाचें असा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हां त्या देशाच्या फडणिसांनीं स्पष्ट सांगितलें कीं तो फेकून द्या. राशियन अधिकाऱ्यांची लोकांच्या नीतिमत्तेच्या रक्षणार्थ अर्थहानि सोसण्याची ही तयारी अत्यंत प्रशंसनीय आहे यांत शंका नाहीं. तुलना करणें गैर होईल या भीतीनें आह्मी ती करू इच्छित नाहीं. पण हिंदुस्थानांत दारूचीं कांहीं दुकानें कमी करा येवढी अल्पस्वल्प स्वरूपाची मागणी सुद्धां दारू पिण्याच्या लोकांच्या स्वातंत्र्याला आड येणारी आहे या सबबीवर फेटाळून लावण्यांत येत असते ही गोष्ट मनांत आली ह्मणजे जंगली व सुधारणेंत अत्यंत मागसलेल्या रशियन राज्यपद्धतींत सुद्धां कित्येक गोष्टी अनुकरणीय आहेत व सुधारलेल्या इंग्रजी राज्यपद्धतींत ही त्याज्य अशा कांहीं गोष्टी आहेत ही गोष्ट स्पष्टपणें नजरेस आल्यावांचून राहत नाहीं. लोकांना मद्यपानाच्या व्यसनांतून मुक्त केल्याबरोबर राशियाचें सामर्थ्य किती वाढलें आहे याची साक्ष प्रस्तुतचें युद्ध उत्तम रीतीनें देत आहे. हिंदुस्थानच्या लोकांची नीतिमत्ता व सामर्थ्य वाढावें अशी आमच्या ही सरकारची इच्छा आहे यांत तिळप्राय शंका नाहीं. पण उत्पन्न बुडेल या भीतीनें मद्यपाननिषेधासारख्या कामीं सरकारी अधिकारी विशेष उत्साह दाखवीत नाहींत. लोकांचें दारू पिण्याचें स्वातंत्र्य नष्ट होईल ही सबब इतकी पोरकट आहे कीं ती आमचे सुशिक्षित सरकारी अधिकारी गंभीरपणानें विचार पूर्वक पुढें करण्या इतके ते खुळे आहेत ही गोष्ट आह्मी कधीं मान्य करणार नाहीं. सुशिक्षित माणसांत जसा द्रव्यलोभ हा दोष केव्हां केव्हां आढळतो, तसा तो सुशिक्षित राज्यकर्त्यांत ही आढळतो असेंच येथें ह्मणावें लागेंत.

## जपानांतली शेतकी.

जपाननें गेल्या ३०।४० वर्षांत सर्व बाजूंनीं आपल्या देशाची जी उन्नत्ति करून घेतली, तिला कारण जपानी सरकारनें राज्य धोरणच असें ठेविलें कीं त्यामुळें लोकांना आपली उन्नत्ति करण्यास प्रोत्साहन मिळालें. ही गोष्ट त्यांच्या शेतकऱ्यांच्या उन्नतीच्या इतिहासावरून अगदीं स्पष्ट दिसते. शेतीच्या बाबतींत जपान सरकारचें धोरण कसें आहे तें पाहण्यासारखें आहे. पडीत जमीन लागवडीखालीं आणण्याचे कामीं शेतकऱ्यांना मदत व उत्तेजन देणें, समुद्राचें पाणी हटवून व बांधांची संख्या कमी करून शेतांचें क्षेत्रफळ वाढविणें; एकाच मालकाचीं लहान लहान शेतें निरनिराळ्या जागीं असतील तर तीं एके जागीं करण्यास त्याला मदत करणें; लहान लहान नद्या व ओढे यांचें पाणी अडवून शेताला पाण्याचा पुरवठा करण्याच्या सोयी करून देणें, शेतांत सांचणारें पाणी मोऱ्यावाटे काढून देण्यास शिकविणें, शेतकीचे कामीं सुधारलेल्या आउतांचा उपयोग करतां येईल अशा सोयी लहानसान गांवांतून करणें, शेतकी पेढ्या व सहकारी पतपेढ्या यांचें जाळें देशभर पसरणें, शेतकऱ्यांसाठीं प्राथमिक शिक्षण सक्तीचें करून त्या प्राथमिक शिक्षणांत शेतकीचें व्यावहारिक शिक्षण देणें; दुय्यम व उच्च प्रतीचे शिक्षणाबरोबर शेतकीचें ही दुय्यम व उच्च प्रतीचें शिक्षण ज्यांस हवें असेल त्यांस तें मिळेल अशी तजवीज करणें, पोस्टल सेव्हिंग्ज ब्यांकेंतलें भांडवल सहकारी पतपेढ्यांना मिळेल अशी तजवीज करणें, जागोजाग प्रयोगक्षेत्रें उघडणें, आणि तेथें लागणारे शोधांची माहिती लोकांना त्यांच्या भाषेंत करून देणें, पिकांवर पडणाऱ्या किडी पासून व रोगांपासून कसे सावध राहावें तें लोकांना शिकाविणें, रोगीट वनस्पति किंवा धान्याचें बीं देशांत न येऊं देण्याविषयीं जपणें, निरनिराळ्या धंद्यांतल्या लोकांचे संघ बनण्यास मदत करणें, व त्यांच्या अडचणी ऐकून घेऊन त्या दूर करण्यास झटणें, वगैरे या गोष्टींपैकीं कित्येक गोष्टी आमचें सरकार ही इकडे करीत आहे ही गोष्ट कृतज्ञतापूर्वक आह्मी येथें नमूद करतों. तथापि जपानी सरकारचा उत्साह जसा तिकडे प्रभावशाली झाला आहे तसा इकडे आमच्या सरकारचा झालेला दिसत नाहीं. याचें कारण प्रजेनें स्वावलंबी व्हावें असें तत्त्व आमच्या सरकारच्या डोक्यांत शिरलें आहे हें आहे. लोकांनीं स्वावलंबी व्हावें हें आह्मी ही मान्य करतों. पण केव्हां? स्वावलंबनावर विसंबून राहतां येईल असें सामर्थ्य तिचे अंगांत आल्यानंतर. हें सामर्थ्य प्रजेचे अंगीं येण्यास जपानी सरकारानें स्वीकारलेला मार्ग खरोखर प्रशंसनीय आहे.

## केसरच्या दहा आज्ञा.

जर्मनीचे बादशहा केसर यांनीं आपल्या प्रजेनें पुढील दहा आज्ञा पाळण्याविषयीं फर्माविलें आहे:—

१ ज्याच्या पासून जर्मनीला लाभ होणार नाहीं असा एक ही पैसा खर्चूं नये.

२ कोणताही परदेशी माल आणूं नये. जो कोणी आणील त्याच्या जर्मन रक्तांत कांहीं दोष आहे असें समजण्यांत येऊन तो जातिभ्रष्ट समजला जाईल.

३ जर्मनींत उत्पन्न झालेलेंच धान्य खावें. त्या धान्याशिवाय इतर धान्यानें जो आपला देह पुष्ट करील तो अस्सल जर्मन समजला जाणार नाहीं.

४ जर्मनीची फळफळावळ गोड, जर्मनीचें पाणी गोड, जर्मनीचें धान्य गोड, जर्मन पोषाख चांगला, सारांश, जर्मनीचें ह्मणून जेवढें कांहीं दिसेल तें गोड व सुंदर मानून ध्यावें.

५ ज्या देशाशीं जर्मनीचा व्यवहार बंद आहे त्या देशांतून कोणताही माल आणूं नये.

६ सध्याच्या युद्धसमयीं अशा रीतीनें वागावें, असे पदार्थ खावे, असा पोषाख करावा, व अशाप्रकारें राहावें कीं तेणें करून जर्मनीच्या प्रजेपैकीं कोणाचा ना कोणाचा तरी फांयदा होईल.

७ तुमच्या पैशानें शत्रूचा यत्किंचित् ही फायदा होत नाहींना हें पाहण्याची विशेष खबरदारी घ्या.

८ कोणतीही जिनस घेणें झाली तर ती स्वदेशी आहे कीं परदेशी आहे हें प्रथम पहा

९ चैनीचे पदार्थ परदेशी तर कधींच घेऊं नका. जर्मन चित्रांनींच तुह्मी आपलीं घरें शृंगारा. घरांत जिकडे तिकडे सगळ्या जर्मन वस्तु दिसल्या पाहिजेत.

१० या दिवसांत जो मनुष्य परदेशीं जाईल तो देशद्रोही समजला जाईल. जो आत्महत्या करील त्याच्या संततीचें रक्षण कोणाही जर्मनानें करूं नये.

## शास्त्रीय ज्ञानाची अवश्यकता.

सर ई. रे ल्यांकेस्टर नांवाचे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ लंडन टाइम्स पत्राला लिहितात कीं सध्या इंग्लंडला जर कशाची विशेष जरूरी असेल तर ती शास्त्रीयज्ञानाची आहे ग्रीक व ल्याटिन या मृतभाषेचें ज्ञान ह्मणजे केवळ विद्वत्तेला भूषण आहे. त्या ज्ञानाचा व्यावहारिक उपयोग कांहीं नाहीं. पण शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग लढाई, व्यापार, उद्योगधंदे, कला, वगैरे सर्व गोष्टींत होण्यासारखा असून देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास तर या सारखी अचुक गुणकारी दुसरी मात्राच नाहीं. सिव्हिलसर्विसच्या परीक्षेत शास्त्रविषयाला अधिक मार्क ठेवून चांगल्या शास्त्रज्ञांना सिव्हिलियन करून पाठविलें पाहिजे. तसें आपण करूं तरच आपला निभाव लागेल, लोकांची कर्तृत्वशक्ति व संपत्ति वाढेल व आपला उत्कर्ष आणि स्वातंत्र्य कायम राहील. ज्या इंग्लंड देशांत शेकडों शास्त्रीय शोध लागत आहे व यंत्रांच्या जोरावर असंख्य कारखाने इंग्लंडच्या संपत्तींत भर घालीत आहेत, त्या देशाविषयींचे जर हे उद्गार, तर मग जेथें शास्त्रज्ञानाचा ओनामा ही तीस कोट प्रजेला शिकविला जात नाहीं अशा हिंदुस्थानाविषयीं त्यांनीं काय ह्मटलें असतें? हिंदुस्थानांत आज हजारों वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें निघत आहेत. पण त्यांत शास्त्रीय विषयांचीं कितीशीं आहेत? देशी विद्वानावरचा हा कलंक दूर करण्याचें सरकार मनावर कधीं घेणार? लोकांनींही सुगम शास्त्रीय ज्ञानाची छोटीं छोटीं पुस्तकें काढून शास्त्रज्ञानाचा प्रसार कां करूं नये?

## दारूची धुंदी.

### ( पान स्वातंत्र्याचा महिमा )

सरकारापाशीं आह्मी स्वातंत्र्य मागत असतों. पण आतां वेळ अशी येत चालली आहे कीं आमचें पानस्वातंत्र्य काढून घ्यावें आणि दारूची धुंदी अगदीं पराकाष्टेच्या निकृष्टावस्थेला पोचवावी असा सरकाराकडे अर्ज करण्याचा हा काल विशेष महत्वाचा आहे. लोकांना जसें वियादान द्या ह्मणून आपण सरकारपाशीं ओरड करतो त्या पेक्षांही अधिक ओरड लोकांमध्यें फैलावत चाललेल्या दारू पिण्याच्या व्यसनाला अगोदर आळा पडला पाहिजे असें आह्मास वाटतें. समाजाचीं बंधनें जितकीं जोरदार तेजस्वी व हुकमतवाली असावयाला पाहिजेत तशीं तीं आवां असूं शकत नाहीत. दारू पिणाऱ्यावर बहिष्कार टाकण्याचें सामर्थ्य समाजामध्यें तीव्रसें नाहीं. आणि समाजाला झुगारून देण्याइतकी ही मद्यपानाची स्वतंत्रता जाग्रत व प्रखर ठेवण्या इतकी प्रत्येक मद्यपी माणसामध्यें लालसा जळत्या दिवटी प्रमाणें पेटत राहणारी आहे. विवेच्या बाजूनें किंवा उपदेशाच्या बाजूनें मद्यपानाचें व्यसन कमी करण्याचे सर्व प्रयत्न आज पर्यंत फसले आहेत. आणि ही मोहनी इतकी विलक्षण आहे कीं तिच्यापुढें विद्वान काय किंवा पुराणवेत्ता काय सारखेच हार जातात. इतकेंच नाहीं तर मनुष्य हा दारूचा पेला हातीं घेतल्यावर त्या घटकाभर सौख्यासाठीं आपलें सर्वस्व हरण्यास सिद्ध होतो. एवढा हा अनुभव हजारो वर्षांचा डोळ्यापुढें जागृत असूनही सरकारची पद्धति मनुष्य स्वभावाला अगदीं तिळांजली देते. आणि आपलें तत्वज्ञान हरिकथा प्रमाणें नेहमी सांगत असते. या सरकारी तत्वज्ञानाचा मुख्य सिद्धांत असा कीं सरकार दारू होईल तितकी महाग करील ह्मणजे आपोआपच या व्यसनाला कांहीं मर्यादितपणा येईल. पण हे सर्व तत्वाचे बोल बहुतेक प्रत्यक्ष अनुभवापुढें फिके पडतात. आणि राष्ट्रीय मद्यपानाचा जेथें प्रश्न येतो, तेव्हां सरकारी तत्वज्ञानाच्या मंदिरांतले हे सिद्धांत आजपर्यंतच्या इंग्रजी इतिहासांत कांहीं अंशानें देखील खरेपणाच्या प्रचितीस चढलेले नाहींत. वेड्या करितां सरकारी इस्पितळें व रोग्याकरितां दवाखाने आहेत; पण हातांत दारूचा पेला घेऊन रोगी व वेडा बनणाऱ्या माणसाच्या हातचा पेला झुगारून देण्याकडे सरकारचे विचार अद्याप वळत नाहींत हें राष्ट्राचें अवशिष्ट पापच होय. या गोष्टी ब्रिटिश इंडिया संबंधानेंच नव्हेत तर ग्रेटब्रिटनलाही सारख्याच लागू पडतात. ब्रिटिश राज्यपद्धतींत ही मोठीच उणीव होय. इंडियांतील लोक स्वराज्याला पात्र नाहींत किंवा हातीं शस्त्र धरण्याला ही ते लायख नाहींत. पण मद्यपानासंबंधानें ते अगदीं सत्पात्र, स्वतंत्र ठरतात. दारू पिणें हा प्रत्येकाचा दिलखुषीचा सवदा आहे. व तेवढ्या स्वातंत्र्यापुरता तो पूर्ण श्रीमानही आहे. असें हें भाग्य सरकारच्या पदरीं लोक आपण होऊन कधीं ही अर्पण करणार नाहींतच; पण तें हिराऊन घेण्या इतक्या बंदीशाळा सरकारानें स्थापित कराव्या असा आमचा मागणा आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— पेरणीला योग्य असा पाऊस होऊन आज दोन तीन दिवस उघाडी आहे ही मोठी अनुकूल गोष्ट होय. उष्णकालाचा ताप अगदीं नाहींसा होऊन आरोग्यवर्धक व उत्साहकारक अशी थंड हवा सध्या आहे.

**कोंडमारा**— इंग्रजी ४ थी इयत्ता आपापल्या शाळांतून जे विद्यार्थी पास होतात, पण पुढें हायस्कूलच्या प्रवेश परीक्षेंत आकस्मिक कारणामुळें उतरत नाहींत त्यांस शाळेची कोठेंच सोय नाहीं असा प्रकार झाला आहे. विद्यार्थ्यांची संख्या नियमित असल्यानें हायस्कूलच्या प्रिन्सिपॉलांचाही नाइलाज होतो. तरुण विद्यार्थ्यांचा असा हिरमोड होणें राष्ट्राला अपायकारक होय. विद्यार्थ्यांना श्री सरस्वतीची अमृतपोई चहुफेर खुली पाहिजे. आणि तेथें जाण्याचा व आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यानुरूप विद्यामृत पिऊन राष्ट्र पुरुषाचा तेजस्वी अवयव बनण्याचा प्रत्येक तरुणाचा हक्क आहे. हा हक्क त्यास संपादून देण्यासाठीं आमचे वऱ्हाडचे इन्स्पेक्टर राजश्री डिक्स हे आपली पराकाष्ठा करितील असा आह्मास पूर्ण भरंवसा आहे. व राजश्री जठार हे ही आपल्या जिल्ह्यांतील छात्रसमूह विद्येला कधींही विन्मुख होऊं न देण्याविषयीं पूर्ण तरफदारी घेतल्याशिवाय राहणार नाहींत.

**प्रेस आक्ट**— नागपूरच्या महाराष्ट्र पत्रावर प्रेस आक्टची गदा येईल असा तर्क अलीकडील निवळलेल्या राजकीय वातावरणावरून कोणालाही बांधतां आला नाहीं. या नागपूरच्या साप्ताहिक पत्रानें इतर बाबतींत केलेली लोकसेवा लक्षांत घेऊन सरकारी रोषाला कारणीभूत झालेल्या लेखाबद्दल त्या पत्रकर्त्यास एकवार ताकीद देऊन सरकारला आपला हुकूम मागें घेण्याला चांगली संधी आहे. प्रेसआक्टाचा कडक अंमल या प्रांतांत नाहीं हें आमच्या स्थानिक सरकारला इतकीं वर्षें सुंदर भूषण होतें; आणि त्याला ही एकच अपवादक गोष्ट घडून येत आहे. ती न घडल्यास उभयपक्षीं हितकारक होय.

मद्रासच्या **न्यू इंडिया** या आन्हिक पत्रापासून दोन हजाराचा जामीन घेतल्या कारणानें श्रीमती बिझांट बाइ यांच्या संबंधानें लोकांचा आदरभाव व प्रेस आक्टाचें हिडीस स्वरूप हीं दोन्हीं एकाच वेळीं दिसून येत आहेत. जो प्रेस आक्ट राजद्रोहाला आळा घालण्यासाठीं पास करण्यांत आला, त्याचा प्रयोग आतां राजद्रोहाचा गंधही नसतांना हिंदी स्वराज्य स्थापू पहाणाऱ्या एका मुख्य प्रवर्तक जगविख्यात विदूषीवर होत आहे हें तरी तो कायदा रद्द होण्याचा काल समीप आल्याचें सुचवितें. गेल्या सोमवारीं मद्रासेस प्रेस आक्टाचा निषेध करण्यासाठीं जी लोकोत्तर सभा भरली होती तिच्या हकीकती वरून हें निश्चित आहे कीं प्रेस आक्ट हा सर्व हिंदी राष्ट्राची बेअब्रू करीत आहे. आणि प्रेस आक्टासारखीं त्याज्य व गर्हणीय विघातक शस्त्रें स्वराज्याच्या स्थापनेला कारणीभूत होतील असें आह्मी विद्यमान ब्रिटिश उदात्त राजनीतीच्या आधारें निश्चयानें भविष्य वर्तवीत आहों.

## कापुस— तक्ता— साप्ताहिक— १० जुन १९१६ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष. | कॉटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या. १०-६-१६ पर्यंतचा आठवडा | १।९।१५ पासून | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या. ता. १०।६।१६ पर्यंतचा आठवडा | १।९।१ पासून |
|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालूं साल | ६२ | २००,८८५ | ५८ | १०,३०८ |
| | गुदस्त | १० | १६२,३५६ | २८ | ८,८२८ |
| | तिगस्त | ३१ | १७०,१४६ | ४६ | १७,५६९ |
| यवतमाळ | चालूं साल | १ | ३२,५४२ | १५९ | २४,४६८ |
| | गुदस्त | | ३७,४१७ | ४ | १७,०६२ |
| | तिगस्त | | ५६,१०२ | ....... | १५,५६२ |
| आकोला | चालूं साल | ११९ | २१५,१०५ | ७७ | ८,८४९ |
| | गुदस्त | ३३ | १५३,७६८ | ८० | ९,०९६ |
| | तिगस्त | १६६ | २१५,९५८ | २२२ | ३१,९७७ |
| बुलडाणा | चालूं साल | १०८ | २०१,७८४ | ४३ | ८,४५९ |
| | गुदस्त | ४१ | १५२,००२ | ४३ | ५,००६ |
| | तिगस्त | ७१ | १६६,६७४ | ३२३ | ३४,५८९ |
| एकूण वऱ्हाड | चालूं साल | २९० | ६५०,३१६ | ३३७ | ५२,०८४ |
| | गुदस्त | ८४ | ५०५,५४३ | १५५ | ३९,९९२ |
| | तिगस्त | २६७ | ६०८,८८० | ५९१ | ९९,६९७ |

टीप— चालूं सालच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे १२ जून १९१५ १३ जून १९१४ पावेतों होते.

सी. जी. लेफटवीच
डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर आणि इंडस्ट्रीज मध्यप्रांत

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं १ — S. Clements, एजंट

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें सार्वी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कामिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रेल्वेनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडकें गर्मीसंबंध सुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्रें यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्वतांचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वराल विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य. सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाचो गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु० १६९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ५९० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाला, सकाच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधा अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रेल्वेनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी. — कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
ना० नं० २०

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

### FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* 4½ CRORES

### A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1.034 | 31,00,950 |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63.407 |
| 1915 | 64,738 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms Liberal***

:0 -

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown, Manager, Bombay. or *A. C. Lal,* Branch Secratary, *C. P. Berar & Khandesh*, Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख २६ माहे जून सन १९१६ इ० [ अंक २५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटींशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

## विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरल्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## अस्सल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २६ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० २

# चांदीचींभांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

# कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटे, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्रमहोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचीं वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण-मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बॅंकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यांपैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यांपैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची श्री कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नमुन्याच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नं १ { S. Clements, एजंट

## हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें यांप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र साज, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साधीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट दिसण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया आगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर
नो नं ६

## खात्रीचा तयार केलेला.

### ताजा अनंत मूळ.

नंबर १ ला ३॥ रु. शेर नं. २ रा २॥ रु. शेर ८ दिवसाची पूर्व मागणी केल्यास तांबूस मुळ्यांचा ताजा कुटून अच्छेराच्या वजनानें डब्यांत भरून पाठविला जाईल. गुण व घेण्याची रीत डब्यावर.

पत्ता.
रामचंद्र सदाशिव मार्कंडे
उद्धवनी मोहल्ला नागपूर शहर

वऱ्हाडसमाचार

मिति जेष्ठ वद्य ११ शके १८३८

## हिंदुस्थान आणि स्वराज्य.

सध्यां हिंदुस्थानच्या वातावरणांत जिकडे तिकडे स्वराज्य शब्दाचा ध्वनि ऐकूं येत आहे. अशा वेळीं ब्रिटिश मुत्सद्यांची हिंदुस्थानच्या स्वराज्याबद्दलची काय कल्पना आहे व ती कितपत यथार्थ आहे हें पाहणें अवश्य आहे. हिंदुस्थानचे अंडरसेक्रेटरी लॉर्ड इसलिंगटन यांनीं रूटरच्या एका प्रतिनिधीजवळ हिंदुस्थानच्या सध्याच्या राज्यपद्धतीसंबंधानें बोलतांना संतोषाचे उद्गार काढल्याचें प्रसिद्ध झालें आहे. हिंदुस्थानच्या लोकांना या देशच्या राज्यकारभारांत दिवसें दिवस ज्यास्त घेतलें पाहिजे अशी उदार मतवादी मुत्सद्यांची तरी खात्री होऊन चुकली आहे; पण मॉर्ले—मिंटो यांनीं केलेल्या सुधारणा हिंदी लोकांची स्वराज्याची तहान भागविण्यास पुरे आहेत असें जें अंडरसेक्रेटरी साहेबांना वाटत आहे त्या संबंधानें आमचा तीव्र मतभेद आहे हें आह्मी स्पष्टपणें सांगतों. त्या सुधारणांनीं वर्णभेदाचे खुळाला जबरदस्त धक्का दिला व कधीं काळीं तरी आपले न्यायाचे हक्क आपणांस मिळतील असा विश्वास प्रजेच्या ठायीं उत्पन्न केला ही गोष्ट खरी आहे. पण येवढ्याशा सुधारणेनें त्यांनीं आतां संतुष्ट राहिलें पाहिजे असें जर लार्ड साहेबांस वाटत असेल तर ती मात्र चूक आहे. कायदे कौंसिलांत ज्यास्ती सभासद लोकनियुक्त घेतल्यानें रयतेचीं सर्व गाऱ्हाणीं दूर झालीं व त्यांचे सर्व वाजवी हक्क त्यांना मिळाले असें समजणें ही खोटी समजूत आहे. प्रत्यक्ष अधिकार हातांत आल्याशिवाय आपलीं गाऱ्हाणीं सरकारनें ऐकून घेतलीं येवढ्यानेंच रयतेचें समाधान होणें नाहीं. पण हे अधिकार रयतेच्या पुढाऱ्यांचे हातीं देण्याचें काम इतक्या सूक्ष्मगतींत हिंदुस्थानांत चाललें आहे कीं त्यामुळेंच एकदम सगळें स्वराज्य मागण्याची घाई करण्याची अवश्यकता हिंदुस्थानच्या कांहीं विशिष्ट पक्षाच्या लोकांना वाटूं लागली आहे. लॉर्ड इसलिंगटन ह्मणतात कीं प्राव्हिनशियल सर्विसमध्यें बहुतेक हिंदी लोकच आहेत, व या सार्विसचें काम बरेंच जबाबदारीचें असल्यामुळें हिंदी लोकांनीं यावरच संतुष्ट राहावें. पण प्राव्हिनशियल सर्विस ह्मणजे काय याची कल्पना विलायतेंतल्या लोकांना नसली तरी हिंदुस्थानच्या लोकांना चांगली आहे. शिपायाचें किंवा कारकुनाचें काम करणाऱ्या लोकांचा समावेश या सर्विसमध्यें होतो. वरिष्ठांचे हुकुमाची बजावणी करण्याचें काय तें काम त्यांचेकडे असतें. राज्यकारभाराचें धोरण ठरविण्यांत या सर्विसचें बिलकुल अंग नाहीं. या सर्विसमधल्या लोकांनीं आपलें जें काय बुद्धिचातुर्य किंवा कर्तृत्त्व दाखवावयाचें तें फक्त हुकुमाची बजावणी करण्यांत दाखवावयाचें असतें. लॉर्ड इसलिंगटन यांच्या ह्मणण्याप्रमाणें हिंदुस्थानाला सध्यां स्वराज्याचा जो काय अधिकार मिळाला आहे तो येवढ्यापुरताच आहे. ह्मणजे खऱ्या स्वराज्याच्या अधिकाराची ही केवळ छाया आहे. वरिष्ठप्रतीच्या सिव्हिल सार्विसमध्यें आमचे कांहीं हिंदी लोक आहेत; पण ते इतके थोडे आहेत कीं त्यांचा प्रभाव राज्यकारभारांत दिसून येणें अशक्य आहे. सिव्हिल सार्विसचे दरवाजे हिंदी लोकांना उघडे आहेत ही गोष्ट खरी; पण त्या दरवाज्यांत प्रवेश होण्याचे मार्गांत अडचणी ही तशाच आहेत, आणि या अडचणी हिंदी लोकांनाच आहेत,. युरोपियन लोकांना नाहींत. हिंदी लोकांना परक्या भाषेंत, परक्या देशांत, व परक्या परिस्थितींत अतिशय खर्च सोसून व हजारों मैलांचा जलप्रवास करून ही परीक्षा द्यावी लागते. ही परीक्षा कठीण असते हें लॉर्ड इसलिंगटन स्वतःच कबूल करतात पण हिंदी लोकांच्या अडचणींचा व परिस्थितीचा विचार करतां त्यांना ही कठीणता शतपटीनें भासत असली पाहिजे हें मात्र त्यांच्या लक्षांत येत नाहीं. ही परीक्षा हिंदुस्थानांत झाली असती तर त्यांना न्यायाची वागवणूक मिळाली असें ह्मणतां आलें असतें. पण तसें कोठें आहे? नुसत्या अधिक जागा मिळणें येवढ्यानेंच स्वराज्य मिळालें असें होत नाहीं. जागा व अधिकार दोन्ही मिळालीं पाहिजेत. कायदेकौंसिलांत हिंदी लोकांचा प्रभाव ज्यास्त ज्यास्त दिसून येत आहे असें लॉर्ड इसलिंगटन संतोषपूर्वक ह्मणतात. पण हा प्रभाव कार्यकारी किंवा निष्फळ होणें हें मुख्य अधिकाऱ्यांच्या अर्थात् गव्हर्नरजनरल व त्यांचे मंत्री यांचे मर्जीवर सर्वांशीं अवलंबून आहे हें सांगावयास ते विसरतात. लॉर्ड हार्डींज सारखे सहानुभूतिप्रेरित व उदार मनाचे मुत्सद्दी राज्यशकट हांकीत असले तर ते लोकनियुक्त सभासदांनीं आणिलेल्या योग्य ठरावांचा स्वीकार करून राज्याच्या कारभारांत तदनुरोधानें परिवर्तन करण्यास तयार असतात. पण दुर्दैवानें विपरीत स्वभावाचीं माणसें अधिकारारूढ असलीं तर कायदेकौंसिलांतल्या लोकनियुक्त सभासदांच्या तक्रारी अरण्य रुदितवत् होतात, हें सक्तीचें व मोफत शिक्षणाबद्दलच्या व इतर कित्येक ठरावांच्या परिणामावरून सर्वांना दिसून आलेंच आहे. हिंदुस्थानांत शिक्षणाच्या प्रसाराबरोबर लोकांच्या महत्त्वाकांक्षेचें क्षेत्र ही वाढत चाललें आहे, आणि राजनिष्ठापूर्वक व कायदेशीर चळवळ करून आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करून घ्यावयाच्या असा देशांतील पुढाऱ्यांनीं आपल्या कार्याचा नकाशा ही आखून ठेविला आहे. सरकारशीं सहकारिता ठेवून अधिकार प्राप्त करून घेण्याची ही त्यांची महत्त्वाकांक्षा सरकारी अधिकारी जितकी लवकर पूर्ण करतील तितकें इष्ट आहे. तसें आतांपर्यंत न झाल्यानेंच स्वराज्य मागण्याची घाई करणारा पक्ष हिंदुस्थानांत निर्माण झाला आहे. दिवसेंदिवस प्रबळ होत चाललेल्या लोकमताला मान देऊन त्यांची तहान केव्हां व किती अंशानें पुरवावयाची या प्रश्नाचा निकाल शहाणपणानें करणें हें आतां अधिकाऱ्यांच्या हातांत आहे.

---

## गहूं.

मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून एकंदर ३४९७२७९ एकर जमिनीवर गव्हारा पेरा १९१५-१६ सालीं झाला होता. त्यापैकीं वऱ्हाडांत सरासरी चारलक्ष एकर जमिनीवर गव्हाचा पेरा झाला. मध्यप्रांताच्या मानानें हा पेरा एक अष्टमांश आहे. सर्व ब्रिटिश इंडियांत गव्हाचा पेरा जेवढ्या क्षेत्रावर होतो त्याचें एक नवमांश क्षेत्र हे दोन्ही प्रांत मिळून आहे. मध्यप्रांतात गव्हाचा पेरा १०० एकर क्षेत्रामागें ६ या प्रमाणें वाढलेला आहे. आणि ही वाढ गेल्या १० वर्षांच्या मानानें पाहतां अगदीं थोडी आहे. ह्मणजे जेथें १० वर्षांची सरासरी ३० लक्ष एकरापर्यंत येते तेथें आतां गव्हाची जमीन ३१ लक्ष एकरा पर्यंत झालेली आहे. या वरून असें दिसतें कीं मध्यप्रांतामध्यें जेथें जेथें गहूं पिकण्याचा संभव आहे तेथें तेथें गव्हाचें क्षेत्र बहुतेक पूर्णतेला पोंचलें असून आतां त्या मध्यें अधिक वाढ होण्याचा फारसा संभव नाहीं. वऱ्हाडा संबंधानें मात्र हा प्रकार निराळा आहे. इकडे गहू मध्यप्रांतासारखाच पिकतो; किंबहुना कपाशीच्या पेऱ्याचें वेड लोकांच्या मनांत फायद्याच्या दृष्टीनें जर बुसण्यासारखें नसतें तर गव्हाळीच्या जमीनीचा विस्तार इकडे पुष्कळसा होण्यासारखा आहे. गेल्या १० वर्षां पेक्षां आतां हें क्षेत्र ७ पटीनें वाढलें आहे. लढाई सुरू झाली तेव्हां कपाशीचा भाव फार मंदावला. व गव्हाला भाव फार तेजीचा होता आणि पर्जन्याची ही अनुकूलता चांगली झाली. त्यामुळें चालू सालीं हा पेरा पुष्कळच वाढलेला आहे. यंदाच्या सालीं बुल्ढाणा व आकोला या जिल्ह्यांतील गव्हाचें पीक दुसऱ्या दोन जिल्ह्याच्या पीकापेक्षां सरस आलें आहे. नर्मदेचा खोरा, सातपुडा व वऱ्हाडचे जिल्हे या भागांत जर वेळेवर पर्जन्याची समृद्धी झाली, तर गव्हाचीं पिकें डोळ्याला आनंद देण्याइतकीं सुंदर व विपुल होत असतात. पण या पावसाचा निश्चितपणा लोकांस खात्रीलायक न वाटल्यामुळें शेतकरी होतां होईल तों पावेतों खरीपांच्याच पिकाकडेस धाव घेतो. मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून एकंदर ९४०४७२ टन गव्हाचें उत्पन्न झालें. त्या पैकीं सरासरी एक नवमांश टन गहू वऱ्हाडांत पिकला. मध्यप्रांताच्या मानानें पाहतां वऱ्हाडचें पीक विशेष कसाचें आहे असें दिसतें. कपाशीचें बीं शेतकऱ्यांना चांगलें मिळवून देण्याकरितां जसे सरकारी प्रयत्न चालू आहेत तसे गव्हाच्या संबंधानें नाहींत. गव्हाचें बीं चांगलें दाणेदार ठोसर व कसदार पुरविण्यासंबंधानें सरकारी योजना अवश्य झाल्या पाहिजेत. निदान आमच्या वऱ्हाडांत ही योजना अवश्य पाहिजे आहे. इकडील गहू चांगला नाणवला जात नाहीं याचें ही कारण हेंच होय.

---

## जवस.

हें गळीताचें धान्य हिंदुस्थानांत जितकें उपयोगांत येतें त्यापेक्षां याच्या तेलाचीं रूपांतरें होऊन युरोपांतून व्हार्निसें व पेंट इत्यादि द्रव्यांच्या रूपानें हें तेल स्वभूमीला परत येत असतें. पूर्वी वऱ्हाडांत जवसाच्या पेऱ्याची मोठी मातब्बरी असे. पण आतां हा पेरा अगदीं खालावला आहे. मध्यप्रांतांत १० लक्ष एकर जमीन तर वऱ्हाडांत ७६७७८ एकर जमीन जवसाच्या पेऱ्याखालीं गेल्यासालीं होती. एकंदर उत्पन्न ८२५८३ टन असून त्यापैकीं वऱ्हाडच्या हिस्याला जवळ जवळ ७ हजार टन जवसाचें पीक आमच्या प्रांतीं आलें. उत्तरोत्तर या पिकाचा ऱ्हासच होत चालला आहे. असे गेल्या १० वर्षांचे आंकडे सांगतात. फक्त गुदस्तापेक्षां यंदा थोडीशी सरशी आहे.

---

## महाराष्ट्रीय ज्ञानकोश.

मराठी वाङ्मय गेल्या पंचवीस तीस वर्षांत पुष्कळ वाढलें आहे व त्याच्या वाढीबरोबर त्याची महत्त्वाकांक्षा ही वृद्धि पावत आहे याला उत्कृष्ट प्रमाण इंग्रजींतल्या एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका सारखें प्रचंड ग्रंथरचनेचें काम हातीं घेण्याची अवश्यकता विद्वान् मंडळींस दिसूं लागली आहे हें होय. इंग्रजींत कोणत्याही विषयावर थोडक्यांत सारभूत माहिती पाहिजे असली ह्मणजे एनसायक्लोपीडियांत ती सांपडावयाची अशी खात्री असल्यामुळें व इंग्रजांचें राष्ट्र ज्ञानप्रसाराचे बाबतींत अग्रेसर असल्यामुळें त्या लोकांना एनसायक्लोपीडियासारख्या ग्रंथाचें खरें महत्त्व पूर्णपणें कळत आहे. आमच्या हिंदुस्थानांत हे बंगाली लोक शिक्षणाचे बाबतींत सर्वांच्या पुढें असल्यानें त्यांनाही अशा प्रकारचा ज्ञानकोश बंगालींत असावा अशी इच्छा सर्वांच्या आधीं होऊन वीस वर्षांपूर्वी त्यांनीं 'विश्वकोश' या नांवाखालीं अशा प्रकारचा कोश तयार करण्याचें अवजड व कठीण काम हातीं घेऊन बाबू नगेंद्रनाथ बसु यांच्या संपादकत्वाखालीं तें अनेक वर्षें चालवून अखेर सिद्धीला नेलें. या बंगाली विश्वकोशाचे २० व्हाल्यूम असून प्रत्येकांत सुमारें ८०० पृष्ठें आहेत. येवढें प्रचंड काम तडीस नेल्याबद्दल बंगीय साहित्यपरिषदेनें बाबू नगेंद्रनाथ यांस 'प्राच्यविद्यामहार्णव' अशी बहुमानाची पदवी ही अर्पण केली आहे. या नंतर गुजराथींत 'ज्ञानचक्र' या नांवाचा एक अशाच प्रकारचा कोश तयार करण्यांत आला. या कोशाचें काम एका संपादकाचे देखरेखीखालीं न होतां बक्षीसें लावून निरनिराळ्या लेखकांकडून निरनिराळे व्हाल्यूम लिहविले गेल्यामुळें बंगाली विश्वकोशासारखें तारीफ करण्यासारखें हें काम झालेलें नाहीं हें आह्मी जे त्याचे ६ व्हाल्युम पाहिले आहेत त्यांवरून ह्मणूं शकतों. या कोशाचे किती व्हाल्यूम झाले आहेत तें ही आह्मांस माहीत नाहीं. त्यानंतरचा तिसरा प्रयत्न प्रस्तुतचा मराठी ज्ञानकोशासंबंधानें होत असलेला

हाच असावासें वाटतें. या प्रयत्नाचें अग्रेसरत्व व मुख्य जबाबदारी आमचे प्रांतीय बंधु डा. श्रीधर व्ही. केतकर एम. ए. पी. एच. डी. यांनीं घेतली आहे व त्यांच्याच प्रयत्नानें नागपुरास महाराष्ट्रीय ज्ञानकोशमंडळ नांवाची एक मंडळी स्थापित होऊन तिनें आपलें उद्देश–पत्रक प्रसिद्ध केलें आहे. डा. केतकर यांनीं हातीं घेतलेलें काम जितकें प्रचंड आहे तितकेंच महत्त्वाचें व स्वभाषाभिमानद्योतक असून ज्ञानप्रसाराचे कामीं अवश्यक व उपयुक्त असल्यामुळें तें सर्वांच्या मदतीनें यशस्वी रीतीनें तडीस जाणें योग्य आहे. या कामांत पक्षभेद किंवा मतभेद बाजूला ठेवून ज्याची ज्या विषयांत उत्कृष्ट पारंगतता असेल त्याचेकडे त्या विषयावर लिहिण्याचें काम देणें योग्य आहे. पण डा० केतकर यांनीं तूर्त जी लेखकांची यादी प्रसिद्ध केली आहे तिजवरून पाहतां पक्षभेदाची छाया तींत दिसून येते असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. डा० केतकरांनीं मिळविलेली लेखक मंडळी विद्वान् आहे व कार्यक्षम आहेत, पण त्या नांवांच्या पलीकडे पुष्कळ ठळक विद्वान् मंडळीचीं नांवें आहेत. त्यांचें सहकारित्व मिळाल्याशिवाय डा० केतकर यांचा प्रयत्न पूर्णपणें यशस्वी होणार नाहीं असें आह्मांस वाटतें, व अशा मंडळींचें साह्य मिळून लेखकांची संपूर्ण यादी प्रसिद्ध झाल्याशिवाय योजिलेला 'ज्ञानकोश' सर्वांग पूर्ण होईल अशी खात्री ही लोकांना पटणार नाहीं. ह्मणून डा० केतकर यांना आमची अशी सूचना आहे कीं त्यांनीं प्रथम लेखकांत पक्षभेद न पाहतां सर्वांचें सहकारित्व मिळवून नंतर या कार्यास प्रारंभ करावा. डा० केतकर यांचा ज्ञानकोश वीस भागांत विभक्त होणार असून सर्व भाग मिळून सुमारें १०००० पृष्ठें होतील असा अंदाज आहे. अर्थात् त्या मानानें शंभर रुपये किंमत अल्प आहे. डा० केतकर यांचा हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे व महाराष्ट्र भाषाभिमानी गृहस्थ हस्तें परहस्तें त्यांच्या कार्यास हातभार लावून मराठी वाङमय पुष्ट करण्यास साधनीभूत होणाऱ्या या ग्रंथसमूहास आश्रय देतील अशी आह्मांस उमेद आहे.

## सरकार आणि मुद्रणस्वातंत्र्य.

मद्रासच्या न्यू इंडिया प्रेस पाशीं मद्रास सरकारनें जामीनकी मागितल्याबद्दल मद्रास इलाख्यांत मोठी खळबळ उडालेली दिसते. गेल्या आठवड्यांत या बाबतींत मद्रास सरकारच्या या कृत्याचा निषेध करून प्रेस आक्ट रद्द करण्याविषयीं सरकारास विनंति करण्याकरितां एक जंगी जाहिर सभा ही भरली होती. मुद्रणस्वातंत्र्याच्या आड येणारा [illegible] प्रेस आक्ट हा सर्वांनाच सारखा नडणा [illegible] असल्यामुळें इतर प्रांतांतल्या वर्तमानपत्र [illegible] रांनीं ही आपली सहानुभूति दर्शविली, [illegible] मुंबईच्या प्रेस असोसिएशनच्या तर्फे या सं [illegible] धांत लवकरच जाहिर सभा व्हावयाची आहे. पण खेदाची गोष्ट आहे कीं [illegible] मद्रासच्या पुढारीमंडळींपैकीं फारच [illegible] गृहस्थ मद्रासच्या सभेला हजर होते याला कारण त्यांना प्रेस आक्ट हवा आहे असें नसून ज्या विशिष्ट संस्थेवर आज प्रेस आक्टचा घाव पडला आहे त्या संस्थेची कार्यपद्धति त्यांना कबूल नाहीं असें सांगण्यांत येतें. मिसेस ॲनी बिझांट यांची कार्यपद्धति त्यांना कबूल नव्हती तर त्यांच्या विषयींच्या सहानुभूतिपर उद्गारां पुरती त्यांनीं आपली असंमति फार तर दाखवावयाची होती. पण सर्वसाधारण असें जें प्रेस आक्टचें संकट त्याचा निषेध करण्यांत सर्वांनीं एकदिलानें सामिल व्हावयास पाहिजे होतें. सदर सभेंत झालेल्या भाषणांवरून पाहतां मद्राससरकारावर जी तीव्र टीका झाली ती ही कितपत योग्य होती या विषयीं शंका येते. या बाबतींत अमृतबझार पत्रिकेनें जो स्वतःचा अनुभव प्रसिद्ध केला आहे तो पाहिला तर कदाचित् मद्राससरकार अगदीं निरपराधी ही असण्याचा संभव आहे. अमृतबझार पत्रिकेकडून जो पांच हजारांचा जमीन घेतला तो बंगालसरकारनें स्वतःच्या बुद्धीनें घेतला नसून आसाम सरकारच्या आग्रहावरून प्रेरित झालेल्या हिंदुस्थान सरकारच्या शिकवणीवरून बंगाल सरकारला तो घ्यावा लागला असें पत्रिकेच्या संपादकाचें ह्मणणें आहे. यांत तथ्य किती आहे तें आह्मांस ठाऊक नाहीं, पण जर कांहीं असलें तर प्रेस आक्टचा निषेध करणारांनीं आपल्या टीकेचा रोख कोणावर धरला पाहिजे व कोठें दाद मागितली पाहिजे तें यावरून चांगलें दिसून येईल. पत्रिकेजवळ जामीन मागितला व तिनें तो मुकाट्यानें दिला ही गोष्ट तिचे संपादक प्रौढीनें सांगतात; पण मुकाट्यानें अन्याय सहन करण्याची संवय हीच आमच्या राष्ट्रास आतांपर्यंत विघातक झालेली आहे हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. अमृतबजार पत्रिका, केसरी सारख्या पुढारी ह्मणविणाऱ्या पत्रांनीं जर स्वतःची कातडी बचावण्यासाठीं राष्ट्रहितास विघातक सहनशीलता स्वीकारली नसती, व त्याच वेळीं देशभर चळवळ उडवून देऊन आकाशपाताळ एक केलें असतें तर मिसेस ॲनी बिझांट यांचा मार्ग अधिक सुलभ झाला असता. पण जें धैर्य वरील पत्रकारांनीं त्यावेळीं दाखविलें नाहीं तें आतां बिझांटबाई दाखवीत आहेत, आणि त्याबद्दल त्यांचा गौरव न करतां उलट कित्येक लोक त्यांना दूषणें लावीत आहेत हें आश्चर्य आहे.

## बंगाली पलटण.

बंगाली स्वयंसेवकांची पलटण तयार क [illegible] ाची सूचना रंगरूपास येत आहे हें [illegible]. आह्मांस संतोष वाटतो. श्रीमंत राजे [illegible] व जमीनदार यांच्याकडून या [illegible] योग्य प्रोत्साहन मिळत आहे. ज्यांचे २५० तरुण या पलटणींत भरती सेल. [illegible] तयार झाले आहेत. देशासाठीं दोन [illegible] करण्याची बुद्धि बंगाली लोकांत जीवीत [illegible] ालेली दिसते. कोणत्याही प्रकारची अर्पण के [illegible] घालतां सरकार पाठवील त्या काह्मणवी अ [illegible] जाण्यास इतके लोक तयार व्हावे तेथेची जा [illegible] भाग्योदयाचें सुचिन्हच ह्मटलें पाहिजे. माणें या [illegible] ची सरकारला येवढीच विनंति आहे कीं आह्मी आपली योग्यता व लायकी स्थापित केल्यावर तरी आह्मांस लष्करांत अधिकाराच्या जागा द्या. ही मागणी अगदीं वाजवी आहे आणि आज नाहीं उद्यां सरकारला ती मान्य करण्याची बुद्धि होईल अशी उमेद आहे. ही पलटण लष्करी कामगिरीवर बाहेर देशीं जाईल. पण याशिवाय [illegible] ांतल्या देशांत शांततेच्या रक्षणासाठीं दुसरी एक अशीच पल्टण उभारण्याचा बंगाली लोकांचा विचार असून तो त्यांनीं लष्करी अधिकाऱ्यांना कळविला आहे. अशा वेळीं हिंदुस्थानांतल्या लाखों लोकांच्या साह्याचा फायदा घेण्याविषयीं मि. चर्चिल यांनीं कॉमन्स सभेंत केलेली सूचना, व हिंदुस्थानांत लष्करी शिक्षण देऊन हिंदी पलटण तयार करण्या विषयींची सर कृष्ण गोविंद गुप्त यांनीं केलेली विनंति या दोन्ही गोष्टी अत्यंत समयोचित झाल्या आहेत. सध्या उभारलेल्या पलटणींतल्या लोकांना आपल्या मागें आपल्या कुटुंबाचें कसें होईल अशी चिंता वाहावी लागूं नये ह्मणून प्रत्येक शिपायाच्या आयुष्याचा विमा एक हजार रुपयास उतरून विम्याचे हप्त्याचे पैसे सदर पल्टण उभारणाऱ्या मंडळीच्या फंडांतून देण्याचें ठरलें आहे. इतकेंच नाहीं तर सरकार ह्मणेल तर या पलटणीचा सगळाच खर्च सोसण्यास ही मंडळी तयार आहे. पण हा सगळा खर्च सोसावा लागल्यास सदर मंडळीच्या मनांतून आणखी पलटणी उभारून सरकारला साह्य करण्याचें आहे त्याला अडचण येईल असें मंडळीचें ह्मणणें आहे. या पलटणीला हत्यारें पुरविण्याचा, रोजच्या खुराकाचा व जाण्यायेण्याचा येवढाच काय तो खर्च सरकारच्या अंगावर पडणार आहे. बाकीचा सगळा खर्च सोसण्यास मंडळी तयार आहे. याहून आणखी स्वार्थत्याग कोणता पाहिजे? या उपर ही मंडळीची विनंति मान्य करून सरकार पलटणीचा स्वीकार करणार नाहीं तर त्यांची मर्जी ह्मणून स्वस्थ बसणें भाग आहे. हिंदुस्थान युद्धाप्रीत्यर्थ कांहींच स्वार्थत्याग करीत नाहीं असें ह्मणणाऱ्या वावदूकांचीं तोंडें आतां तरी बंद होतील काय?

## जर्मन व्यापाराची हानि.

ब्रिटिश सरकारानें जर्मन व्यापाराचा कोंडमारा केल्यामुळें त्या राष्ट्राची केवढी हानि झाली आहे याची कांहींशी कल्पन[illegible] अमेरिकेशीं असलेल्या जर्मनीच्या व्यापारा[illegible]ता लच्या आंकड्यांवरून करतां येईल. १९[illegible]ूचना सालीं जर्मनीनें १८६,०३५,२५४ गेलो चा व्यापार अमेरिकेशीं केला होता काशीबाई सालीं तो १६६,४०६,७१४ एक मुलगा आला, व १९१५ सालीं त[illegible] प्रेमानें पातळ जाऊन तो ३९,९६७, [illegible]ीत होत्या व आला! या युद्धानें जर्मन [illegible]ीत होत्या. त्यांचे प्रजेच्या पोटावर कसा [illegible]वे अनाथ अर्भकास तें यावरून दिसून [illegible] इस्टेट देऊन त्याचे उद्योगधंदेवाले, का[illegible] [illegible]ाय केली आहे. बाई डो- बादशहाला [illegible] [illegible]णून सांगत होत्या 'आमची' पाहिजेत. का[illegible] रामेश्वर ही मुलें आहेत. लढाईवर गे[illegible] [illegible]वतों चाळीस मुलींचीं लग्नें [illegible]रतु काय करावें ? लग्न झाल्या इतकेंच नाहीं, तर पुष्कळ कारखान्यांना कच्चा मालच मिळत नाहीं. तो माल लष्करी कारखान्यांकडे जातो. उदाहरणार्थ, म्यांगनीज धातू पोलादासाठीं लागते. ती सगळी तोफा ओतण्याच्या कारखान्यांत जाते. अशा रीतीनें कारखानदार, मजूर, व्यापारी, सर्वांच्याच पोटावर पाय देऊन चालू ठेवलेल्या युद्धापासून जर्मन केसरला कशाच्या प्राप्तीची अपेक्षा वाटत आहे हें त्याचें त्यालाच माहित !

## जर्मनींत अन्नाची तूट.

जर्मनीला दिवसेंदिवस अन्नाची भयंकर तूट भासत आहे असें विधान इंग्रजी पत्रांनीं केलें ह्मणजे तें द्वेषमूलक व खोटें आहे असें पुष्कळांना वाटतें. पण जर्मनीपाशीं अन्नाचें अखंड भांडार असणें शक्य आहे काय ? जर्मनीची सध्याची स्थिति किती भयंकर आहे त्याची कल्पना पुढील वर्णनावरून करतां येईल. जर्मनींत मांसाचा भाव गेल्या साळच्या सत्रापट झाला आहे. घोड्यांचें मांस सुद्धां महाग झालें आहे. मांसाची इतकी दुर्मीळता झाली आहे कीं [illegible]च्या बद्दल खारविलेले मासे खाण्याविषयीं लोकांचीं मनें वळविण्याचे शिकस्तीचे प्रयत्न चालले आहेत, हे मासे नॉर्वेमधून आणविण्याची जर्मन सरकारची जंगी खटपट आहे. पण ब्रिटिश सरकारनें अगोदरच [illegible] तेथें खरेद करून टाकिल्यामुळें ते यां मिळण्याची मारामार पडली आहे. शाळा मुलांना पिण्याला दूध मिळत नाहीं स्कूलस् तीं दुबळीं होत चालली आहेत या वर्गांत दूध आणविण्याची तजवीज [illegible] चची व पालपण तीं यशस्वी न झा[illegible]ील पत्त्यावर आपल्या मुलांना घेऊन [illegible]ाविल्यास देऊं. राहूं लागल्या आहेत. गुरां [illegible]रेश्वर गणेश ठकार हीं मिळत नाहींत. [illegible] वकील आकोला होऊन सरकारनें [illegible] लोण्याचा पुरवठा [illegible]

## जाहेर नोटीस

लोण्याबद्दल चरबी जज सा. कोर्ट खामगांव करूं ह्मटलें सर्टिफिकीट नं. २ सन १९१६ आहे. शेवसर्टिफिकीट मिळणें बद्दल अर्ज काढण्यात [illegible] अर्जदार

[illegible]मद नजरोदीन वा महमद समसोदीन रा. बोथ ता. खामगांव

मयत महमद समसोदीन वा महमद बुरानोदीन रा. बोथ ता. खामगांव याचे जिनगीचे वारसाचे सार्टिफिकीटा बद्दल अर्ज

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार यानें सक्सेशन सार्टिफिकीट मिळण्याचा अर्ज आमचे कोर्टांत ता. १०-६-१६ रोजीं केला आहे. त्याची चौकशीची ता. ५-८-१९१६ नेमली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं हरकत असेल त्यानीं सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें.

आज ता. २१ माहे जून सन १९१६ इ आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिलें.

R. N. Trivedi
Sub Judge
Khamgao

N. N. 219

लढाई करणें ब्रिटिश सरकारला अशक्यच झालें असतें. मि. ब्रुक्स तर असें ही ह्मणतात कीं हिंदुस्थानानें या वेळीं केलेल्या मदतीला पूर्वकालीन इतिहासांत तुलनाच नाहीं. हिंदी लोकांची राजनिष्ठा, राजाविषयींची पूज्य भावना, बेलज्यमवर जर्मनीनें केलेल्या अत्याचाराबद्दल तीव्र नैतिक तिरस्कार, तहनाम्याला कागदाचा कपटा जर्मनीनें ह्मटल्याबद्दल हिंदी राजांना वाटत असलेली चीड, वगैरे गोष्टी अगदीं अपूर्व होत्या. हालंडच्या लोकसंख्येच्या दुप्पट व आयर्लंडच्या तिप्पट प्रजेवर राज्य करणाऱ्या निजामसरकारानें एकदम ६० लक्ष रुपये युद्धाच्या खर्चासाठीं दिले; ह्मैसूरच्या महाराजांची उदारता ही कमी नव्हती; डेन्मार्कहून मोठ्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या शिंदेमहाराजांनीं स्वतःच्या खाजगी खर्चाच्या रकमेंतून इस्पितळी जहाज उभे केलें व शिवाय २२॥ लक्ष . दिले; दुसऱ्या अनेक राजांनीं पैसे देऊन शिवाय जातीनें लष्करी नौकरी केली; फार काय, पण प्रसंग अनुकूळ दिसेल तेव्हां धाड घालण्यास न चुकणाऱ्या सरहद्दीवरील टोळ्यांच्या सरदारांनीं सुद्धां राजनिष्ठेचे संदेश व मदत पाठविली. तिबेटांतल्या लामांनीं ब्रिटिश विजयासाठीं प्रार्थना केल्या. स्त्रियांनीं रात्रंदिवस मेहनत करून शिपायांचे कपडे शिवले हें सगळें व्यर्थच काय? आणखी मदत ती कशी असते?

—————

## [...]स ऑफ इंडिया सोसायटी.

१२ जून रोजीं पुण्यास सर्वंटस
[...]डिया सोसायटीचा वाढदिवस
[...]यांत आला, त्यावेळीं त्या
[...]चे सभासद हजर होते व
[...] गोष्टी संबंधानें चर्चा
[...] तीन नवे सभासद
[...]ले. त्यापैकीं मध्य-
[...]पेल सुप्रसिद्ध पुढारी
पा[...]केळकर हे एक
थोडें ज्यांना माहिती
अगदीं[...] रा. ब.
सारांश, मिळाल्यानें
आवेश व बरोबर
सध्या रण[...] यांच्या
संचार करीत [...]यांचे

**झरनो[...]न**

रशियानें झरनो[...]
शियामधल्या त्याच्या
अध्याय संपला असें [...]
कान्यांचें मत आहे. रशि[...]
काबीज करण्याचा नसून
नाश करण्याचा आहे असें
दृष्टीनें झरनोविझ शहर घे[...]
महत्व नाहीं. पण हें शहर
शत्रूची मोठीच नाउमेद होऊन
सटले आहेत ही गोष्ट कोणाच्या[...]
कबूल करवणार नाहीं. लक्षक हे
ही शत्रूनें खालीं केलें आहे व [...]
ते पळून गेले आहेत. लॅंबर्गची ही अ[...]
नाहीं उद्यां तीच स्थिति होणार आहे.
मध्यंतरीं ब्रॉडी हें आणखी एक शहर
रशियाला घ्यावें लागेल; आणि सध्याच्या

पडून त्यांचा उत्साह खऱ्या देशकार्यालाच लागेल अशी आह्मी उमेद बाळगतों. आह्मांस खात्री आहे कीं ना. गोखले यांच्या मागें त्यांनीं घालून दिलेल्या वळणानें कामास सोसायटीला लावण्याचें सामर्थ्य ना. केळकर यांचे अंगीं आहे त्याचा उपयोग करण्याची संधी मिळाल्यास ते लवकरच सदर सोसायटीचे मुख्य चालक होतील व सोसायटीला योग्य मार्गाला लावतील.

—————

## राष्ट्र शील.

(आमच्या एका सन्मान्य मित्राकडून)

हल्लींच्या समाजाच्या विदीर्णावस्थेंत राष्ट्र शील नसल्यामुळें प्रत्येक मनुष्याच्या गुणवर्मांवरून त्या मनुष्याबरोबर वर्तन करावें लागतें. मनुष्य ह्मटला ह्मणजे त्यास भाषा ही असावयाचीच. त्यास थोडीफार विचार करण्याची शक्ती असावयाचीच. त्यास लहानसा समाज करून त्या समाजास आपलीं बरीचशीं सुखदुःखें अर्पण करण्याची बुद्धि असावयाचीच. तो समाज स्थापन करतो हें प्रथमतः समाजाहितासाठीं नसून आत्माहितासाठींच असतें. त्यास सहानुभूति, फायदा, स्वसंरक्षण इत्यादींची जसजशी अधीक उणीव भासूं लागते, तसतसे तो लहान लहान संघ बनवूं लागतो. त्याच्या सर्व समाजाचे हेतू, आकांक्षा, यत्न, जोम, उत्साह, परस्परांना किती मर्यादेपर्यंत सहाय्य करावयाचें, व कोणत्या उदार अगर अनुदार गोष्टींत तें करावयाचें नाहीं हें धोरण इत्यादीवर समाजघटना अवलंबून असते. या गोष्टी स्वतंत्र नसून घटक आहेत. परस्परांचा परस्परांवर विश्वास आहे किंवा नाहीं हें पाहिल्याशिवाय कोणत्याही दोन व्यक्ती एकमेकांशीं संबंध ठेवणार नाहींत. प्रत्येक मनुष्य आपल्या सुखलाभासाठीं यत्न करील हें तर उघडच आहे; पण श्रमविभाग तत्वामुळें त्याला आपल्या उद्योगाचा भाग देऊन त्याच्याबद्दल दुसऱ्यापासून सुखसाधन मिळवावें लागतें. ज्याच्याशीं त्यास व्यवहार करावा लागतो ते जितके सत्यसंध, प्रामाणिक, सदसद्विवेकी असतील, तितका यास वंचनेपासून रक्षणाचा मार्ग अधीक सोपा आणि सुकर हें उघड आहे. पण या पेक्षां देखील समाज रचना आणि समाज व्यवहाराची गोष्ट हजारों पटीनें नाजूक, परस्पर संलग्न आणि गुंतागुंतीची आहे.

राजकीय सुधारणा कोणास नको आहेत असे नाहीं. परंतु जोंपर्यंत आपल्या सर्व समाजाची समान बुद्धी झाली नसेल, तोंपर्यंत राजकीयस्वातंत्र्य किंवा राजकीय हक्क मिळाले तरी देखील ते लाभप्रद न होतां उलट [आ]पलेंच घर आपणास बाधक होणारें आहे.
[...]ाप आपल्यांत विश्वासलब्ध पुढारी नाहींत.
[...] प्रश्नाच्या मूळाशीं हा प्रश्न कोणी
[...] केला हा वाद प्रथमतः उपस्थित
[...]श्न उपयुक्त आहे किंवा अनुपयुक्त
[...]कोणीच पहात नाहीं. व बहुतेक
[...]सन ;व्यक्तिशः गालिप्रदान[...]
[...]नी भयंकर ढासळत चालली
[...]आपल्या पुढाऱ्याचे पहिलें
[...]कीं लोकांत प्रथमतः
[...]शक्ती कशी उत्पन्न
[...]विचार होऊन खल
[...] तो साध्य झाल्या

शिवाय सांप्रतची अवस्था अशीच चालणार हें उघड आहे.

हल्लीं हिंदू लोकांत तर अनंत जाती आहेतच; परंतु उद्योग धंद्यावरून नवीन नवीन विभाग पडले आहेत. सरकारी नोकरांचा वर्ग निराळा. त्यांत ज्याच्या हातून दुसऱ्याचें कांहीं काम होतें अशांचा वर्ग निराळा. सरकारच्या प्रत्येक खातेवारीच्या मानानें एकेक निराळा वर्ग समाजांत घुसला आहे. रेल्वे, व्यापारी कंपन्या इत्यादि सार्वजनीक परदेशस्थ कंपन्यांत नोकरी करणारांचे निरनिराळे वर्ग. या देशांतीलच खाजगी व्यापाऱ्यांकडे अगर दुकानदारांकडे असलेल्या नोकरांचा वर्ग आणि स्वतः मालक लोकांचा वर्ग इत्यादी वर्ग समाजांत नवीन उत्पन्न झाले आहेत.

जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती हा सिद्धांत प्रत्येकाच्या स्वभावा संबंधीं झाला. पण प्रत्येकांत व्यक्तित्व प्राप्त होण्याला व त्याच प्रमाणें जातित्व हीं प्राप्त होण्याला कांहीं सामान्य गुणांची अवश्यकता आहे. साधारण युरोपियन घ्या. त्यांत सत्यनिष्ठा, उद्योगप्रियता, तितिक्षा हे गूण असावयाचेच. थोड्या अधिक प्रमाणानें षड्विकार वृत्तींनीं इतर गुणांत जसें— रागिटपणांत, दुसऱ्या बद्दल असणाऱ्या सहानुभूतींत इ. इ. गुणांत एका व्यक्तीच्या प्रकृतीशीं मेळ बसणार नाहीं, परंतु स्थूलमानानें स्वभावाचें मुख्य धोरण एकच असतें. त्या प्रमाणें आपल्या देशांतील सर्व लोकांचें एक धोरण होणें अगदीं अवश्य झालें आहे. व हल्लींच्या समाजरचनेमुळें तें जास्तच अवश्य होत चाललें आहे. या वेळीं पुढारीवर्ग स्वस्थ राहील तर प्रत्येक क्षणीं अधीक कठीण अवस्था होत जाणारी आहे.

इंग्रज सरकारनें धर्म स्वातंत्र्य दिलें हें देखील अनाठायीं आणि अकालींच झालें असें बऱ्याच लोकांचें मत आहे. धर्माचें खरें रहस्य हें आहे कीं त्यांत धर्मग्रंथांवर वादविवाद ह्मणून सहसा होऊं नयेत. धर्म कृतींत उतरला पाहिजे. सृष्टी रचनेच्या नियमांचे कोठें कोड नाहीं. परमेश्वर आपले सामान्य नियम सृष्टी रचनेच्या द्वारानें न बोलतां न एखादे कायदे कौंसिल नेमतां न बदलतां लोकांना अभिव्यक्त करीत असतो. त्या प्रमाणें प्रत्येक मनुष्याच्या तीव्र अभियोगावर किंवा संवेगावर, श्रद्धेवर मनुष्यास त्याच्या अस्तित्वाचा प्रत्यय येतो. मनुष्यास प्रत्येक दिवस किंवा प्रत्येक क्षण देवता आराधनासाठीं देवानें दिलेला आहे, तो आपलें प्रत्येक कर्म पहात आहे, आपले भोंवतीं जें जे दिसत आहे त्या सर्व सामुग्रीनें एक देव मंदिर उभारलेलें आहे व आपण एका निर्मयाआह्णरुणामय ईश्वराची आराधना करीत आहे[...]एक[...] ज्या रीतीनें प्रसन्न होईल अशाच [...]जवळ [...]पण वागलें पाहिजे असें आपलें [...] दूध [...]सलें पाहिजे. हा दुर्लभ विश्वास [...] वृद्ध मार्[...] शक्तिमानत्वावर भरंवसा [...]श्रीनीं एका [...] उत्पन्न होईल. देव प्रत्येकाचा [...] पांच हजाराचें प्रत्येकाजवळ आहे. तो मतां[...]र्जनाची ही किंवा वेदांत्यांच्या काथ्याकुट[...] [...]णी अ[...] कपणानें प्रसन्न होणारा [...] कृती आणि प्रत्ययावर जें [...] ज्यावर आपला विश्वास [...] क[...]

ज्याचे ठिकाणीं आपली दृढ श्रद्धा जमते तो देव. त्याचा प्रत्यय कृतीनें येतो. वाचाळपणानें त्याविषयीं भ्रामक कल्पना मात्र वाढतील. गतगोष्टीपासून समाधान वर्तमान काल गोष्टींत तितिक्षा आणि भविष्यकालाबद्दल उमेद ज्या धर्मापासून उत्पन्न होत नसतील तो धर्मच नव्हे. व कोणाचा तसा धर्म असेल तर तो त्यानें अवश्य सोडून दिला पाहिजे. देशावर हल्लीं जी संकटपरंपरा ओढवली आहे, तीच सांगत आहे कीं सृष्टी रचनेंतून ज्याचें शहाणपण आणि ज्याची सत्ता अभिव्यक्त झालेली आहे, तोच प्रत्येक व्यक्तीच्या दुःखाचा परिहार करणारा आहे. मनुष्यांत ज्या साहजीक आणि नैसर्गिक मनोवृत्ती उत्पन्न होतात, त्याच संकट समयीं आपणास मदत करतात. यासाठीं धर्मप्राप्ती ह्मणजे ईश्वरप्राप्ती आणि ती वाचाळ पंचविशीनें लाभत नसून क्रियेनें लाभत असते, हें सर्वांस पुन्हा समजूं लागेल तरच आपणांत राष्ट्रीयधर्म आहे असें मानतां येईल. लहान झाडें किंवा लता दुसऱ्या मोठाल्या झाडावरोवर संलग्न होतात किंवा त्यावर चढतात त्या कशासाठीं! उत्तर सोपें आहे. वातावरण क्षुब्ध झाल्यावर वादळास प्रतिकार करण्यासाठीं. याच तत्वावर मोठमोठाल्या विभूतींनीं अल्प ज्ञानीजनाला आपल्यांत मिळून घेतलें पाहिजे. ईश्वरावर अशा प्रकारचा दृढ विश्वास ठेऊन वाढणाऱ्या लोकांच्या शांतीचा भंग होणें शक्य नाहीं. कारण त्यांचा सर्व भरंवसा ईश्वरावर असतो. काळजीचा काळ ह्मणजे वर्तमानकाळ. त्या काळांतून तो आपणास पार पाडील इतकी श्रद्धा असली ह्मणजे पुरे या श्रद्धेच्या योगें मनुष्याचे विचार आपोआप सात्विक होतात. सात्विक विचाराच्या योगानें त्याचे सर्व आहार व्यवहार आपोआप नेमस्त होतात. नेमस्त आहार सेवन करीत गेल्यानें त्यांस शारीरिक व्याधी अगर दूषित मन व्याधी जडणें शक्य नाहीं. भलतेच अभिलाष उत्पन्न होऊन त्याच्या अंतःकरणास हीनत्व येणार नाहीं.

अपूर्ण

—————

## महायुद्धाची प्रगति.

पश्चिम रणक्षेत्रांतल्या जर्मन चळवळीसंबंधानें गेल्या आठवड्यांत दोन परस्परांविरुद्ध अशा बातम्या आल्या. प्रथम आलेल्या तारांवरून असें कळलें कीं पूर्वेकडे राशियानें विशेष गडबड चालविल्यामुळें पश्चिमेकडे शत्रूची चळवळ बंद पडली आहे. तोफांचा भडिमार चालला आहे, पण पायदळाचे हल्ले बंद आहेत. पण ही शांतता खरोखर असलीच तर फार थोड्यावेळा पुरती असली पाहिजे. कारण कीं व्हाइसराय साहेबाकडून प्रसिद्ध झालेल्या पत्रकांत जर्मन शत्रूंनीं म्यूज नदीच्या दोन्ही तीरांवर गडबड केल्याची खबर आहे. जर्मन लोकांनीं फ्रेंचांना त्यांनीं परत घेतलेल्या खंदकापासून हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ झाला, त्याच प्रमाणें नं. ३२० व ३२१ च्या टेकड्यांवर ही शत्रूनें हल्ले केले वगैरे मजकूर व्हाइसराय साहेबांच्या पत्रकांत आहे. झिलेबेकच्या शेजारच्या मुलुखांत शत्रूंनीं

मिळविलेलीं ठाणीं कनेडियन सैन्यांनीं परत घेतलीं. सध्या पुष्कळांना हा प्रश्न येऊन पडला आहे कीं पूर्वेकडच्या रशियाच्या चळवळीचा परिणाम पश्चिमेकडे जर्मनशत्रूच्या चळवळीवर कांहीं होईल कीं नाहीं? शत्रु आपले बेत त्यामुळें फिरवील कीं काय? शहाण्या लोकांचें असें मत आहे कीं जर्मन लोक व्हर्डुनचा नाद त्यामुळें सोडतील किंवा अपली चिकाटी सोडतील हें असंभवनीय आहे. इतकें खरें कीं त्या ठिकाणीं शत्रूची जी प्रचंड हानि झाली आहे तशीच पुढें चालू राहणें शक्य नाहीं शत्रूचें सैन्य केवढें जरी मोठें असलें तरी तें अमर्याद नाहीं. माणसाची वाण त्याला केव्हांना केव्हां तरी पडणारच. शिवाय रशियाचा लेंबर्गवरचा रोख व त्याला विरोध करण्याविषयीं आस्ट्रियाची अपात्रता या गोष्टीचा थोडा बहुत तरी परिणाम जर्मन शत्रूच्या उमेदीवर झाल्याशिवाय राहणार नाहीं. व्हॉन हिंडेनबर्ग यानें आस्ट्रियाची दुर्दशा पाहून रशियाच्या सैन्यावर अनेक ठिकाणीं हल्ले केले, पण त्याच्या जवळ ही सैन्याची कमताई असल्यामुळें ते प्रयत्न निष्फळ झाले

## रशियाचा विजय.

सध्या पूर्व रणक्षेत्रांत ज्याच्या त्याच्या तोंडीं रशियाचे अपूर्व विजय हाच विषय होऊन बसला आहे. आस्ट्रियाची दुर्बलता आतां जशी व्यक्त झाली आहे तशी पूर्वी कधीं झाली नव्हती. लेंबर्गपाशीं चाललेल्या लढाईत रशियानें पुष्कळ शत्रु कैद केले, आणि त्यांत कांहीं जर्मन आफिसर ही आहेत. आस्ट्रियानें या लढाईत कांहीं वेळ जोराचा टिकाव धरला याचें कारण तरी हें जर्मन आफिसरच होत. रशिया नेटानें पुढें पाऊल टाकीत चालला आहे, आस्ट्रिया त्याच्या पुढें टिकाव धरण्यास असमर्थ आहे, व पश्चिमेकडून तिकडे सैन्य पाठविण्याची सोयही नाहीं अशा पेंचांत सध्या जर्मनी पडला असला पाहिजे. अशा स्थितींत पश्चिम रणक्षेत्रांतून आस्ट्रियाच्या मदतीला थोडें बहुत सैन्य पाठविल्या बद्दलच्या तारा अगदींच अविश्वसनीय म्हणवत नाहींत. सारांश, आस्ट्रियाची दुर्बळता, रशियाचा आवेश व जर्मनीची काळजी या तीन गोष्टी सध्या रणक्षेत्रांवर एकसमयावच्छेदेंकरून संचार करीत आहेत.

## झरनोवित्झ घेतलें.

रशियानें झरनोवित्झ घेतलें, येथें ग्यालिशियामधल्या त्याच्या चळवळीचा पहिला अध्याय संपला असें कित्येक लष्करी अधिकाऱ्यांचें मत आहे. रशियाचा हेतु शहरें काबीज करण्याचा नसून शत्रूच्या सैन्याचा नाश करण्याचा आहे असें म्हणणाऱ्यांच्या दृष्टीनें झरनोवित्झ शहर घेतल्याचें फारसें महत्व नाहीं. पण हें शहर घेतल्यानें शत्रूची मोठीच नाउमेद होऊन ते पळत सुटले आहेत ही गोष्ट कोणाच्यानें नाकबूल करवणार नाहीं. लष्कक हे शहर ही शत्रूनें खालीं केलें आहे व तेथून ते पळून गेले आहेत. लेंबर्गची ही आज नाहीं उद्यां तीच स्थिति होणार आहे. मध्यंतरीं ब्रॉडी हें आणखी एक शहर रशियाला घ्यावें लागेल; आणि सध्याच्या रशियाच्या उमेदीवरून तें घेण्याला त्याला फारसे प्रयास पडतील असें दिसत नाहीं.

## जर्मन जनरलचा मृत्यु.

जनरल व्हॉन मोल्टके यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें जर्मनीची फार मोठी हानि झाली आहे. हे त्यांच्या चुलत्यासारखे फार नामांकित योद्धे होते, आणि युद्धाच्या प्रारंभीं जर्मनीला जे लागोपाठ जय मिळत गेले त्याचें बरेंचसें श्रेय मोल्टके यांना आहे. पण पुढें जें अपयश जर्मनीच्या वाट्याला येत गेलें त्यामुळें त्यांचेवर केसरची नाराजी होऊन त्यांना कामावरून दूर करण्यांत आलें होतें. अलीकडे पुनः युद्धाच्या वात तींत बर्लिन येथें भरणाऱ्या लष्करी कौंसिलाला त्यांना बोलावणें असे. पण झालेल्या अपमानामुळें त्यांनीं कधीं मनापासून सल्ला दिली नाहीं, व होतां होईल तों त्यांनीं एकांतांतच दिवस काढले. त्यांच्या अंगीं त्यांच्या चुलत्यासारखेच कित्येक अत्यंत दुर्मिळ व खऱ्या सेनापतीस अत्यंत अवश्यक असे गुण होते.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**:— पर्जन्याचें मापन मृग नक्षत्रानें ८ इंचावर नेलें आणि ही प्रावृट् शोभा आर्द्रा नक्षत्राच्या श्रीनें अधीक रमणीय होत जाईल, तसतशी सृष्टी आपला नवा हिरवा व सुगंधित पोशाख खुलावटीनें वापरू लागेल. खऱ्या कौशल्यानें ऋतु निरामयच नव्हे तर अत्यंत आरोग्यवर्धक व आनंदकारक करतां येण्या सारखा आहे.

रा. रा. ऑर्चर्ड पोलीस सुपरिंटेंडन्ट हे रजेवरून परत येऊन दाखल झाले.

रा. रा. श्री. इनामती शामराव फारेस्टचे एक्स्ट्रा असिस्टंट कॉन्सरवेटर आकोला हे पुढील सोमवार पासून २ महिन्याच्या हक्काच्या रजेवर जाणार असून रा. रा. पांडुरंग नारायण हे मेळघाटाहून येथें येतील

रा. रा. नारायण रंगनाथ तागडे बेंच मॅजिस्ट्रेट तेल्हारा यांस नुकतीच देवाज्ञा झाली आणि हा मृत्यु रा. रा. हरकचंद गुलाबचंद साहु बेंच मॅजिस्ट्रेट यांच्या मरणानंतर १॥ महिन्याच्या अवधींतच झाला. त्यामुळें त्यांच्या सार्वजनीक कामाची व मित्र भावाची चहा असलेल्या इष्ट मित्रांस मोठें कडू वाटेल. आणि सुजवस्तु लोकही ४०-५० च्या आंतच मरण पावतात हें पाहून सृष्टीचे नियम कोण किती उल्लंघितात हें मनोमय समजून घेण्यासारखें आहे.

## पत्रव्यवहार.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

" साधवो नहि सर्वत्र मौक्तिकं न गजे गजे "

अशी किती तरी मानवी रत्नें असतील कीं ज्यांचे बद्दल बाहेरं जगास क्वचितच माहिती असेल. अशा नर रत्नांपैकीं मला सहज नाशीक येथें दोन स्त्रिया—मायलेकी—आढळल्या. त्यांनीं आपले जीवीत खरोखरीच परोपकाररूपी स्थंडिलावर अर्पण केलें आहे. 'जे कां रंजले गांजले त्याशी म्हणवी आपुले, तोची साधू ओळखावा देव तेथेंची जाणावा, या श्री तुकोबाच्या म्हणण्याप्रमाणें या दोन विभूती आहेत. आपल्या आर्यावर्तांत हजारों वेगवेगळ्या धर्म संस्थांची गरज आहे, परंतु आपली धर्माची समजूत निराळी झाल्यामुळें परोपकाराचीं उपयुक्त कामें न होतां उलट ज्याचा शेवट अपकारांत होतो अशी निरूपयोगी कामें होत असतात. 'अनाथ अर्भकांचें पालन' हें अनेक परोपकारी धर्मकृत्यापैकीं एक अत्यंत महत्वाचें कृत्य असून, त्यांची हेळसांड अनेक कारणांनीं कशी होत आहे हें सर्व श्रुतच आहे. परधर्मियांनीं कोणाच्या हेतूनें कां होईना बाल संगोपनाच्या संस्था काढून आजपावेतों मृत्यूचें दाढेंत पडलेल्या अनेक अर्भकांचे प्राण वाचविले आहेत, त्यास शिक्षण देऊन मनुष्यामध्यें आणिलें आहे. परंतु 'परोपकाराय पुण्याय' अशी ध्वजा लावणाऱ्या आमचे आर्य बांधवांनीं अशा संस्था फारच थोड्या काढल्या आहेत. अशा थोड्या संस्था पैकीं 'अनाथ बालाश्रम' नांवाची संस्था विशेषत: वर लिहिलेल्या उभय स्त्रीरत्नांनीं नाशीक येथें काढली आहे. संस्थेंत आणखी चालक आहेत परंतु संस्थेचें जनकत्व या दोघी महाभाग स्त्रियाकडेच आहे. श्रीमती परमपूज्य अंबाबाई रेंदाळकर यांचें वय सुमारें पाउणशें वर्षांचे असावे, व त्यांची कन्या महाभाग श्रीमती काशीबाई रेंदाळकर यांचें वय अदमासें चाळीस वर्षांचें असावे. काशीबाईस वैधव्य त्यांचे वयाचे पांचव्या वर्षी आलें. काशीबाई यांचे एक बंधू कोल्हापूरास चांगले वकील आहेत व एक बंधू येथें मातुश्रीजवळ असून चांगले विद्वान आहेत. हल्लीं आश्रमामध्यें एकंदर चवतीस मुलें आहेत. त्यांचें वर्गीकरण खालीं लिहिले प्रमाणें

| | | |
|---|---|---|
| एक वर्षाचे आंत | — संख्या | ९ |
| दोन वर्षांचीं | — " | ३ |
| पांच वर्षांचीं | — " | ९ |
| चवदा वर्षांचीं | — " | ११ |

यांत २० मुलें वैश्य जातीचीं आहेत. १२ शूद्र—गुरव, कुणबी वगैरे जातीचीं व २ हिंदुस्थानी ब्राह्मणाचीं आहेत. संस्थेमध्यें कामें करणारीं कळकळीचीं माणसें मिळत नसल्यामुळें मुलांची व्यवस्था एकत्र नसून चालकांचे पाहणी खालीं परंतु निराळ्या रीतीनें केली आहे. जसें ९ मुलें एक वर्षाचे आंतील, यांस संगोपन करण्यास योग्य अशा बायांचे स्वाधीन त्यांच्या त्या घरीं ठेवण्या करितां दिलीं आहेत. प्रत्येक मुलाबद्दल दाइनीस पगार दरमाहा ८ रुपये व तेलाकरितां दोन आणे या प्रमाणें देत असतात. आश्रमाकरितां घर पंचवटीस बांधलें आहे. परंतु तेथें सर्व सोई नसले कारणानें इतर सर्व मुलांचें जेवण खाणे रा. रेंदाळकर यांचे घरीं होते व खेळण्यासारख्या मुलांस इतर वेळेस आश्रमामध्यें ठेवतात अनाथ मुलांत मुलगे व मुली आहेत. आश्रमाबद्दलची हकीगत माझे सारखेच एका पाहुण्या विद्वान मित्राकडून ऐकल्यावरून आम्ही उभयता रा. रेंदाळकर यांचे घरीं त्यांस प्रथम सूचना वगैरे न देतां सुमारें चार वाजतां गेलो होतो. आम्ही गेलो तेव्हां श्रीमती काशीबाई दोन अर्भक—मुली—मांडीवर घेऊन एक मुलगा खालीं जवळ बसऊन अत्यंत प्रेमानें पातळ केलेला दूध भात त्यास भरवीत होत्या व त्यांच्या वृद्ध मातोश्री वाढीत होत्या. त्यांचे मातोश्रींनीं एका गुरवाचे अनाथ अर्भकास चार पांच हजाराची इस्टेट देऊन त्याचे विद्यार्जनाची ही सोय केली आहे. बाई डोळ्यांत पाणी आणून सांगत होत्या 'आमची' काशी प्रयाग रामेश्वर हीं मुलें आहेत. मी आजपावेतों चाळीस मुलींचीं लग्नें केलीं. परंतु काय करावें! लग्न झाल्या नंतर जावई बायकास पाठवित नाहींत! दुसरे दिवशीं मुलांस आश्रमांत बगीच्यांत काम करतांना व खेळतांना पाहिलें मुलें अत्यंत आनंदांत होतीं. त्यास अनाथ म्हटलेलें खपत नाहीं.

मुंबई येथील श्रीमंत धनीक लोकांकडून आश्रमास मदत आहे तथापी आश्र मास स्वतंत्र इमारत पाहिजे म्हणून व आश्रमाची कायमची व्यवस्था व्हावी म्हणून पैशाची जरूर आहे. कैलासवासी माजी कलेक्टर जाक्सन साहेब यांचे या संस्थेवर फार प्रेम होते व त्यावेळीं येथील नागरीक जनांची ही मदत होती. परंतु हल्लीं क्षेत्रस्थ मंडळीकडून मदतीची आशा नाहींच परंतु येथें सर्वत्र संचार करणाऱ्या रिकाम्या गतभर्तृकाकडून शरीर मेहनतीची देखील मदत मिळत नाहीं! आपले वाचक या संस्थेस जरूर मदत करतील अशी विनंती करून वर लिहिलेल्या उभय स्त्री चालकास परमेश्वर दिर्घायुष्य व उत्साह देवो अशी प्रार्थना करतों. कळावें. ता.२३-६-१६

पंचवटी चिं. ह. मराठे

## विद्यार्थ्यांकरितां सोय

### (स्टुडंट्स् कोचिंग क्लासेस.)

इंग्रजी चौथ्या इयत्तेंत पास झालेल्या पण सरकारी शाळांतून सोय न झालेल्या विद्यार्थ्यांचे सोईकरितां इंग्रजी पांचवी इयत्ता काढली असून हा वर्ग तारीख १ जुलै १९१६ पासून सुरु होईल शिक्षणाची वेळ संध्याकाळीं ७ ते रात्रीं ९ पर्यंत सध्यां ठेविली आहे. शिक्षण क्रम सरकारी शाळा प्रमाणेंच. मेहेरबान इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स् यांनीं सहानुभूति दर्शविलेली आहे. या वर्गांत येऊं इच्छिणाऱ्यानीं आपली स्वतःची व पालकाचीं नांवें व पत्ता खालील पत्त्यावर कळवावा विशेष माहिती मागविल्यास देऊं.

टॉनहालाजवळ } मोरेश्वर गणेश ठकार
ताजनापेठ आकोला } वकील आकोला

नो: नं० २१८

## जाहिर नोटीस

विद्यमान सब जज सा. कोर्ट खामगांव

सक्सेशन सार्टिफिकीट नं. २ सन १९१६

सक्सेशन सार्टिफिकीट मिळणें बद्दल अर्ज

अर्जदार

महमद नजरोदीन वा महमद समसोदीन मु. रा. बोथ ता. खामगांव

मयत महमद समसोदीन वा महमद बुरानोदीन रा. बोथ ता. खामगांव याचे जिनगीचे वारसाचे सार्टिफिकीटा बद्दल अर्ज

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, वरील अर्जदार यानें सक्सेशन सार्टिफिकीट मिळण्याचा अर्ज आमचे कोर्टांत ता. १०-६-१६ रोजीं केला आहे. त्याची चौकशीची ता. ५-८-१९१६ नेमली आहे. तरी त्या तारखेस ज्याची कांहीं हरकत असेल त्यानीं सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें.

आज ता. २१ माहे जून सन १९१६ इ. आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिलें.

*R. N.* Trivedi
Sub Judge
Khamgaon

N. N. 219

## NOTICE

NOTICE UNDER SECTION 11
OF ACT VIII OF 1890.
Mis. Judicial Case No, 50 OF 1916
In the COURT of the District Judge
AT AKOLA

In the matter of application of Yasin kha son of Haji Nurkha caste Musalman inhabitant of Chondi Tahsil Jalgaon District Buldana for the (1) appointment of a guardian to the (2) Person and property of (1) Hussenkha s/o Abdullakha and (2) Shahanurbi daughter of Abdullakha caste Musalman minors aged 14 years inhabitant of Jalgaon tahsil Jalgaon district Buldana

To (3)

The petitioner above named having applied to be (4) appointed the guardian of the (2) Person and property of the aforesaid minors the 29 th. day of July 1916 has been fixed for the hearing of the application and notice is hereby given that if anybody desires to oppose that application of the petitioner aforesaid he should enter appearance in this Court in person or by a duly authorised pleader of the Court, duly instructed, and able to answer all material questions relating to the application, or who shall be accompanied by some person able to answer all such questions, and he is hereby required to take notice that in default of his appearance on the day mentioned above the application will be heard and determined in his absence.

Given under my hand and the seal of the Court, this 19 th day of May 1916

Seal.

V. M. Kelker
District Judge
Akola W. B. D.

## Wanted.

Representatives in every locality in India, Burma and Ceylon for the sale of our world-renowned "Hairtone" (unique toilet preparaiton) under the system of cash prizes worth Rs. 50,000 among the purchasers of Hairtone. Pay Rs. 50, 40, 30, 25 and 20, besides liberal commission. Cash security required Rs 1000, 700, 500, 400 & 300 respectively. Service at present secured for 6 months. No risk, no trouble. Every honest, energetic man (or woman) may well undertake the work and secure a decent income in leisure hours, without interfering with service or profession if any. Apply for Rules and Regulations to the Hairtone Manufiacturing Co, 155, Bowbazar Street Calcatta.

## जाहिरात

सर्व लोकास जाहीर करण्यांत येते कीं काल गुरुवारीं ह्मणजे ता० २२ जून १९१६ रोजीं रात्रौ आकोला येथें स्टेशनावर जात असतांना आमचें दफ्तर कोठें गहाळ झाले याचा पत्ता नाहीं. दफ्तर लाल रेशमाच्या विणकामाचे असून त्यांत कांहीं खरेदीखताच्या नकला, शेताचे परचे, मयत मनुबाई जवजे बाळकृष्ण इच्या सहीच्या बापू मारोती यांस दिलेल्या तीन पावत्या इत्यादि कागद आहेत. जो कोणी हें दफ्तर आणून देईल त्यांस ५ रुपये बक्षीस देऊं. हें दफ्तर आमचे वकील रा. रा. त्रिंबक नारायण बापट बी. ए. एल्. एल्. बी. यांच्या कडे आणून दिल्यास ते ही परभारें बक्षीस देतील. आकोला २३-६-१६ सही

विठ्ठल बावाजी पातकीडे रा. मुर्तिजापूर जि. आकोला

## जाहीर नोटीस

तमाम सेट साहू कच्छी मारवाडी लोकांस कळविण्यांत येते कीं, शेगांव व पातुर्डा आणि बिस्वा चांदूर या तीन्ही गांवीं हाजी मामद जिवा कच्छी या नांवचें दुकान चालत आहे. या तिन्ही दुकानचा मालक मी खालीं सही करणार आहे. या तीन्ही दुकानचीं कामें करण्यास मी माझे तर्फे महमद आमद रा. पातुर्डा हल्लीं वस्ती वडाळ ता. व जि. जुनागड यांस कुलमुकत्यार नेमले होतें. हल्लीं त्यांस आह्मी कामावरून कमी केले आहे. तरी त्याचेशीं कोणत्याच प्रकारचा व्यवहार आमचे वरील दुकाना संबंधानें करूं नये. केल्यास तो रद्द समजला जाऊन आह्मी जबाबदार राहणार नाहीं. हें सर्वत्रांस कळावें. ता० १५ जून १९१६ इ० सही

हाजी मामद जीवा शेगांव द खु.


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भसंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व मिष्टान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य. सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३९ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५१० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तिडीक, मुत्रांची लाली, सर्काच, पूयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका वटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें अ [illegible] याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

### FUNDS exceed 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

Claims paid 4 1/2 CRORES

### A Novennial Record of Progress.

| Year. | No. of Policies in force. | Existing Assurance Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,034 | 31,00,950 |
| 1888 | 8668 | 2 63,38,000 |
| 1897 | 26,522 | 6 37,26,354 |
| 1906 | 48,147 | 9,45,63 407 |
| 1915 | 64,738 | 12,23,63.755 |

| Year. | Total Income. Rs. | Total Assets. Rs. |
|---|---|---|
| 1879 | 1,30,109 | 1,70,695 |
| 1888 | 11,48,642 | 36,38,694 |
| 1897 | 28,85,976 | 1,3390.729 |
| 1906 | 4884 | 2,84,76155 |
| 1915 | 72,96,901 | 5,25,53900 |

EVERY MAN'S DUTY

is to provide for those dependent upon him and for his own old age. When a man's income is reduced owing to any cause there is all the more reason for his making provision for those dependent upon him and this can be effected in no way better than by a Life Assurance Policy with the "Oriental"

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve Fund divided among the Policyholders every 3 years.
Indian Lives are accepted at the same rates as Europeans.
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms Liberal***

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown, Manager, Bombay. or A. C. Lal, Branch Secratary, C. P. Berar & Khandesh, Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.